इचलकरंजी ICHALKARANJI ▸ वर्ष -४१ ▸ अंक -३४० ▸ मंगळवार,ता.१४ एप्रिल २०२६ ▸ पाने १२ इचलकरंजी आर.एन.आय.रजि.नं.63119/94 ▪ पोस्टल रजि.नं. KLR/78/ 2024-2026

### सोने दरात घसरण; ग्राहकांना दिलासा

मुंबई, ता.१३–

सध्या लग्नसराईचे दिवस सुरू असल्याने बाजारपेठेत सोने-चांदी खरेदीसाठी ग्राहकांची लगबग पाहायला मिळत आहे. गेल्या आठवड्यात वाढलेल्या सोन्याच्या दराने खरेदीदारांच्या चिंतेत भर घातली होती; मात्र सोमवारी आठवड्याच्या पहिल्याच दिवशी सोन्याच्या दरात घसरण झाल्याने ग्राहकांना दिलासा मिळाला आहे.

सोमवारी सोन्याचे दर प्रति तोळ्यामागे ३८० रुपयांनी कमी झाले आहेत. सोन्यापाठोपाठ चांदी दरातही घसरण झाली आहे. प्रति किलो ५००० रुपयापर्यंत दर कमी झाला आहे.

राष्ट्रीय विचाराचे एकमेव निर्भिड दैनिक

# महासत्ता

कोल्हापूर – सांगली – सातारा – बेळगांव

### वाढत्या उन्हामुळे रस्ते निर्मनुष्य

मुंबई,ता.१३–

उन्हाळा यंदा अधिकच तापायला लागला आहे. सध्या शहरात कमाल तापमानात गतवर्षेपेक्षा अधिक वाढ दिसून येत आहे. गतवर्षीच्या तुलनेत यावर्षी तीन ते चार सेल्सिअस तापमान अधिक असल्याचे फेब्रुवारीच्या मध्यापासूनच जाणवायला लागले आहे. हवामान खात्याने सुद्धा यंदाचा उन्हाळा अधिक तापदायक असल्याचे संकेत काही दिवसापूर्वीच दिले आहेत. दुपारी एक दीड वाजताच रस्ते निर्मनुष्य होतानाचे चित्र दिसत आहे. दिवसा कमाल तापमान ३५ ते ४० डिग्री पर्यंत गेल्याचे दिसून येत असून रात्रीचे तापमान अद्यापही १६ ते १८ सेल्सिअस दरम्यान आहे.

www.emahasatta.com e-mail : mahasatta@gmail.com mahasattaadvt@gmail.com किंमत ₹ ५.००

त्रिवार अभिवादन !



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची आज जयंती

## एमपीएससी परीक्षा रचनेत बदल

### संयुक्त परीक्षा योजनेत नव्याने १८ सेवा,९३ संवर्गाचा समावेश

■ मुंबई,ता.१३ (प्रतिनिधी)–

**शासनाच्या विविध पदांवरील भरती प्रक्रिया सुटसुटीत, सक्षम आणि उमेदवारांच्या दृष्टीने सुलभ व्हावी, याकरिता पदभरती प्रक्रियेत सुधारणा करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी देवेंद्र फडणवीस होते. या सुधारणेमुळे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून घेण्यात येणाऱ्या विविध सेवांतर्गत संवर्गांची संख्या १०२ होणार आहे. तर संयुक्त परीक्षा योजनेमध्ये नव्याने १८ सेवांचा आणि ९३ संवर्गाचा समावेश होणार आहे. तसेच केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या धर्तीवर राज्यात निपुण सेतू पोर्टल सुरू करण्यास मान्यता देण्यात आली.**

विकसित महाराष्ट्र २०४७ च्या व्हिजन डॉक्युमेंटनुसार हा कृती आराखडा



तयार करण्यात आला आहे. शासनाचे प्रशासन अनेक संवर्गांमध्ये विभागलेले आहे. यात ३३ विभागांमध्ये, सुमारे ११० आस्थापनांमध्ये ३ हजार ६०० हून अधिक संवर्ग आहेत. या संरचनेत सरळसेवा भरतीसंदर्भात १ हजार ४०० हून अधिक सेवाप्रवेश नियम आहेत. यातून विविध विभागांमधून स्वतंत्रपणे तितक्याच परीक्षा घेण्यात येत होत्या. आता त्याऐवजी परीक्षांची संख्या कमी होऊन उमेदवारांसाठी भरतीच्या पदांची संख्या वाढणार आहे. त्यासाठी अधिक एकसंध, सुलभ, पारदर्शक, परिणामकारक आणि कालबद्ध निवड प्रक्रिया राबविण्यासाठी सुधारणा करण्यात येणार आहे. या सुधारणांमुळे सेवाप्रवेश नियमांमध्ये मोठे बदल होणार आहेत. याशिवाय सेवांतर्गत पदोन्नतीसाठी स्वतंत्र संवर्ग संरचना आणि मृत संवर्गांची पुनर्रचना होणार आहे. सेवाप्रवेश नियमांमधील व्यापक बदल-विविध संवर्गांच्या ५७४ सेवाप्रवेश नियमांमध्ये बदल करून विविध संवर्गांतील विसंगती दूर केल्या जातील. अनुभवाच्या अटींचे सुसूत्रीकरण- समान स्वरूपाच्या संवर्गांसाठी (पान २ वर)

**निवड न झालेल्या उमेदवारांसाठी 'निपुण सेतू' उपक्रम सुरू करण्यात येणार असून उमेदवारांची शैक्षणिक गुणपत्रिका,अन्य स्थानांतरण, दिव्यांग,जात, क्रीडाविषयक प्रमाणपत्रे इत्यादी कागदपत्रे डिजीलॉकरद्वारे पडताळणी केली जाणार आहे.**

### मस्साजोग सरपंच पदासाठी पाच अर्ज

■ बीड,ता.१३–

**जिल्ह्यातील मस्साजोगचे दिवंगत सरपंच संतोष देशमुख यांच्या निधनानंतर रिक्त झालेल्या येथील सरपंचपदाच्या पोटनिवडणुकीत एकूण ५ उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत.**

अर्ज दाखल केलेल्यांमध्ये संतोष देशमुख (पान २ वर)

## यंदा कमी पावसाची शक्यता

■ नवी दिल्ली,ता.१३–

**भारतीय हवामान विभाग (आयएमडी) यांनी आज नैऋत्य मान्सून २०२६चा पहिला अधिकृत अंदाज जाहीर केला असून यावर्षी देशात सरासरीच्या ९२ टक्के पर्जन्य होण्याची शक्यता वर्तवली आहे. हा अंदाज सामान्यपेक्षा कमी पावसाच्या श्रेणीत मोडत असल्यामुळे शेतकरी आणि अर्थव्यवस्थेसाठी चिंतेची बाब मानली जात आहे. नवी दिल्ली येथे आयोजित पत्रकार परिषदेत पृथ्वी विज्ञान मंत्रालयाचे सचिव डॉ. एम. रविचंद्रन आणि हवामान विभागाचे महासंचालक डॉ. एम. मोहापात्रा यांनी हा अंदाज जाहीर केला.**

हवामान विभागाच्या माहितीनुसार, जून, जुलै आणि ऑगस्ट या महिन्यांत पावसाची स्थिती तुलनेने सामान्य राहण्याची शक्यता आहे. मात्र जुलै ते सप्टेंबर या कालावधीत एल निनो



हवामान विभागाचा अंदाज

परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. तरीही भारतीय महासागरातील सकारात्मक परिस्थितीमुळे एल निनोचा नकारात्मक परिणाम कमी प्रमाणात जाणवेल, असेही डॉ. मोहापात्रा यांनी स्पष्ट केले. त्यामुळे मान्सून पूर्णपणे कमजोर न राहता काही प्रमाणात संतुलित राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

पावसाचे मोजमाप करताना आयएमडीने ठरवलेल्या निकषांनुसार, सरासरीच्या ९० टक्क्यांपेक्षा कमी पाऊस अपुरा मानला जातो, तर ९० ते ९५ टक्के पाऊस हा सामान्यपेक्षा कमी समजला जातो. ९६ ते १०४ टक्के पाऊस हा (पान २ वर)

### मे महिन्यात दुसरा अंदाज !

**पावसाचे प्रमाण कमी असले तरी त्याचे वितरण कसे राहते, हे महत्त्वाचे आहे. जूनमध्ये मान्सूनचे आगमन आणि त्याची वाटचाल कशी होते, यावर खरीप हंगामाचे भवितव्य अवलंबून असेल, असे मत कृषी तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे. तसेच अखेरच्या टप्प्यात पावसाचे वितरण कसे राहते, यावर बरेच काही अवलंबून असेल. हवामान विभाग मे महिन्याच्या अखेरीस मान्सूनचा दुसरा सुधारित अंदाज जाहीर करेल, ज्यामध्ये प्रादेशिक पातळीवरील पावसाच्या वितरणाची अधिक स्पष्ट माहिती मिळेल.**

### कल्याण-अहिल्यानगर महामार्गावर भीषण अपघात

## व्हॅनची सिमेंट मिक्सरला धडक; ११ ठार

■ कल्याण,ता.१३–

**कल्याण-अहिल्यानगर महामार्गावर भीषण अपघातात रायते पुलावर सिमेंट मिक्सर आणि प्रवासी वाहतूक करणाऱ्या व्हॅनची समोरासमोर जोरदार धडक झाली.या अपघातात व्हॅनमधील ११ प्रवाशांचा जागीच मृत्यू तर उर्वरित प्रवासी गंभीर जखमी झाले.**



मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, सोमवारी सकाळी ११.१५ वाजताच्या सुमारास ही दुर्घटना घडली. अपघातग्रस्त व्हॅन कल्याण ते मुरबाड या मार्गावर प्रवासी वाहतूक करत होती. पाच आसनांच्या या गाडीत १२ प्रवासी कोंबून भरले होते. ही गाडी सुसाट वेगाने मुरबाडच्या दिशेने जात होती.याचवेळी रायते पुलावर समोरून येणाऱ्या सिमेंट मिक्सर ट्रकची आणि व्हॅनची समोरासमोर भीषण धडक झाली. ही धडक इतकी जोरदार होती की संपूर्ण व्हॅनचा चक्काचूर झाला. यामुळे प्रवाशांना सावरण्याची संधीही मिळाली नाही.

अपघातावेळी मोठा आवाज झाला. तो ऐकताच स्थानिक नागरिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. यानंतर स्थानिकांनी मदतीसाठी हातभार लावला. या घटनेची माहिती मिळताच टिटवाळा पोलीस (पान २ वर)

### भाविकांना ट्रकने चिरडले

## सातजणांचा मृत्यू

गांधीनगर,ता.१३–

**गुजरातमधील सुरेंद्रनगर जिल्ह्यात सोमवारी पहाटे भीषण अपघात घडला.लखतर-विरमगाम हायवेवर पायी चालत जाणाऱ्या भाविकांना बेदरकारपणे धावणाऱ्या ट्रकने जोरदार धडक दिली. या अपघातात सात भाविकांचा जागीच मृत्यू झाला असून अनेक जण जखमी झाले आहेत.**

गुजरातमधील घटना

ही घटना लखतर तालुक्यातील भास्करपारा गावाजवळ पहाटे सुमारे दीड वाजण्याच्या सुमारास घडली. पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, राजकोटहून काही भाविकांचा गट



बहुचराजी मंदिर येथे दर्शनासाठी पायी निघाला होता.हे भाविक रस्त्याच्या कडेला चालत असताना मागून वेगाने येणाऱ्या ट्रकने त्यांना जोरदार धडक दिली.

या भीषण अपघातात सहा भाविक आणि रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या डंपरचा चालक अशा एकूण सात (पान २ वर)

## खरातप्रकरणी ईडीचे छापे

### ११ ठिकाणी चौकशी;६० कोटींचा व्यवहार संशयात

■ नाशिक,ता.१३–

**भोंदू मांत्रिक अशोक खरातच्या अडचणीत दिवसेंदिवस भर पडताना दिसत आहे. एसआयटीच्या चौकशीनंतर आता अंमलबजावणी संचालनालय (ईडी) देखील सक्रिय झाली आहे.**



ईडीने नाशिकमधील त्यांच्या तृप्तबाला निवासस्थानासह विविध ११ ठिकाणी छापे टाकण्यात आले आहेत. सोमवारी पहाटे ६ वाजल्यापासून ईडीचे पथक दाखल झाले असून सखोल तपास केला जात असून खरातच्या अनेक मालमत्ता ईडीच्या रडारवर आहेत.

ईडीच्या पथकात पाच पुरुष आणि दोन महिला अशा सात जणांचा समावेश आहे. या पथकाकडून अशोक खरातच्या घरात तपास सुरू आहे. शंभरपेक्षा जास्त जंगम आणि स्थावर मालमत्तांच्या खरेदी-विक्रीशी संबंधित कागदपत्रांची तपासणी करण्यात येत आहे. तसेच बेनामी संपत्ती आणि आर्थिक (पान २ वर)

### प्रतिभा चाकणकरांची आठ तास चौकशी

**राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्या बहीण प्रतिभा चाकणकर यांचीही तब्बल आठतास चौकशी करण्यात आली. शिर्डी पोलीस ठाण्यात त्या हजर झाल्या असून त्यांचा जबाब नोंदवला गेला आहे. समता पतसंस्थेत त्यांच्या आणि कुटुंबीयांच्या नावावर चार खाती असून त्यातून सुमारे २ कोटी ४० लाख रुपयांचे व्यवहार झाल्याचे समोर आले आहे.**

### चकमकीत महिला नक्षलवादी ठार

■ रायपूर,ता.१३–

**छत्तीसगडच्या कांकेर जिल्ह्यात सोमवारी सुरक्षा दलांसोबत झालेल्या चकमकीत महिला नक्षलवादी कमांडर ठार झाली. ही घटना छोटेबेठिया पोलीस ठाणे हद्दीतील जंगल परिसरात घडली. सदर महिला कमांडरचे नाव रूपी असून तिच्यावर ५ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले होते.**

पोलीस अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, ही चकमक सोमवारी सकाळच्या सुमारास घडली.सुरक्षा दलांची एक टीम नक्षलविरोधी मोहिमेसाठी जंगल भागात गस्त घालत होती. (पान २ वर)

## अमेरिकेकडून 'होर्मुझ'ची नाकेबंदी

■ वॉशिंग्टन,ता.१३–

**इलामाबादमध्ये तडजोडीसाठी झालेल्या वाटाघाटी अयशस्वी झाल्यानंतर, अमेरिका आणि इराण पुन्हा एकदा संघर्षाच्या उंबरठ्यावर उभे ठाकले आहेत. मध्य-पूर्वेत पुन्हा युद्ध सुरू होण्याची भीती वाढली आहे. सोमवार, १३ एप्रिलपासून, अमेरिका अशा कृती करण्यास सज्ज आहे.**



अमेरिकी सैन्याने म्हटले आहे की, ते काही तासांत होर्मुझच्या सामुद्रधुनीतील सर्व इराणी बंदराची नाकेबंदी सुरू करेल. पाकिस्तानमध्ये शांतता चर्चा झाली, पण अमेरिकेने आरोप केला आहे की, इस्लामिक प्रजासत्ताकाने आपल्या अणु-महत्वाकांक्षा सोडण्यास नकार दिला आहे. दरम्यान, इराणच्या परराष्ट्र मंत्र्यांनी आरोप केला आहे की, इस्लामाबादमध्ये करार अगदी जवळ आला होता, पण नंतर अमेरिकेने आपले नियम बदलण्यास सुरुवात केली.अरबी आखात आणि ओमानच्या आखातावरील सर्व इराणी बंदरांसह, इराणी बंदरे आणि किनारी भागांमध्ये प्रवेश करणाऱ्या किंवा तेथून बाहेर पडणाऱ्या सर्व राष्ट्रांच्या जहाजांवर ही नाकेबंदी निःपक्षपातीपणे लागू केली जाईल, असे अमेरिकेच्या सेंट्रल (पान २ वर)

## आशाताई अनंतात विलीन

### शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

■ मुंबई,ता.१३–

**स्वरसम्राज्ञी आशा भोसले यांना साश्रू नयनांनी अखेरचा निरोप दिला. दशकानुदशके भारतीयांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या दिग्गज गायिका आशाताईंच्या पार्थिवावर दुपारी ४ वाजता शिवाजी पार्क येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.**

तब्बल सहा दशकं रसिकप्रेक्षकांना मंत्रमुग्ध करणारा आवाज अनंतात विलिन झाला. आशाताईंच्या जाण्याने केवळ सिनेसृष्टीच नाहीतर, अखखा देश (पान २ वर)



आशताई भोसले यांच्यावर शिवाजी पार्क येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले

| सोने प्रति तोळा | चांदी प्रति किलो |
|---|---|
| १५०४०० रु. | २४०००० रु. |

अंडी ४८५ रुपये शेकडा

हास्यतुषार -सुरेंद्र दास



या महागाईत फ्रिज राहू दे निदान इंडियन माठ तरी आणा..!

### माहितीच्या अधिकारावरून करवीर पंचायत समितीत राडा

#### गर्जना संघटनेकडून कर्मचाऱ्याला धक्काबुक्की;कर्मचाऱ्यांचे ठिय्या आंदोलन

■ कोल्हापूर,ता.१३(प्रतिनिधी)–

**करवीर पंचायत समिती कार्यालयातून माहिती मिळत नसल्याच्या कारणावरून कोरोची (ता.हातकणंगले) येथील गर्जना संघटनेच्या कार्यकर्त्या आणि करवीर पंचायत समितीच्या कर्मचाऱ्यांमध्ये सोमवारी सकाळी वाद झाला.**

संघटनेच्या कार्यकर्त्या दीपाली खरगे यांनी कर्मचाऱ्याची गळपट पकडून धक्काबुक्की केल्याने संतापलेल्या कर्मचाऱ्यांनी काम बंद आंदोलन पुकारले. या घटनेमुळे पंचायत समिती परिसरात सकाळपासूनच तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. याबाबत रात्री उशिराप्रयंत लक्ष्मीपूरी पोलीस ठाण्यात कोणतीही तक्रार दाखल झाली नव्हती.

याबाबच मिळालेली माहिती अशी की, महिला बचत गटांच्या कामासाठी उचगाव येथील संगीता कुंभार, गर्जना (पान २ वर)

## खोतवाडी ग्रामपंचायतीत ७८ लाखांचा गैरव्यवहार



■ तारदाळ,ता.१३(वार्ताहर)–

**खोतवाडी ता.हातकणंगले येथील ग्रामपंचायतीच्या लेखा परीक्षणात सुमारे ७७ लाख ४८ हजार रुपयांच्या आर्थिक गैरव्यवहाराचा प्रकार उघडकीस आला आहे.**

याप्रकरणी संबंधीत आजी-माजी सरपंच, दोन ग्रामपंचायत अधिकारी, अनेक ग्रामपंचायत सदस्य यांच्याकडून रक्कमेची वसुली करण्यासाठी प्रशासकीय यंत्रणेमार्फत तगादा लावण्यात येत असल्याची माहिती मिळत आहे. त्यामुळे खोतवाडी परीसरात एकच खळबळ उडाली आहे.

#### आजी-माजी सरपंचासह अधिकाऱ्यांकडून होणार वसुली

खोतवाडी ग्रामपंचायतीमध्ये गैरव्यवहार झालेल्या रक्कमेची वसुली करण्यासाठी ग्रामपंचायत अधिनियम १९५९ चे कलम १४० नुसार तात्काळ कार्यवाही करून अहवाल सादर करण्याचा सुचना देण्यात आल्या आहेत. यामध्ये (पान २ वर)

### तरसंबळेतील विवाहितेचा मृत्यू

#### नातेवाईकांचा घातपाताचा आरोप ;पती ताब्यात

■ शिरगाव,ता.१३ (प्रतिनिधी)–

**राधानगरी तालुक्यातील तरसंबळे येथे २६ वर्षीय विवाहितेचा मृत्यू झाल्याची घटना उघडकीस आली आहे. सौ.रूपाली प्रविण गुरव असे मृत महिलेचे नाव असून तिच्या मृत्यू मागील कारण अद्याप अस्पष्ट आहे.**



सौ.रुपाली गुरव

दरम्यान, नातेवाईकांनी सासरच्या मंडळींवर घातपाताचा गंभीर आरोप करत संताप व्यक्त केला आहे. सोमवारी रूपाली गुरव यांना राधानगरी ग्रामीण रुग्णालयात मृतावस्थेत दाखल करण्यात आले.घटनेची माहिती मिळताच तिचे माहेर राधानगरी असल्याने नातेवाईकांनी रुग्णालयात मोठी गर्दी केली होती.मृत महिलेच्या आई सरीता पांडुरंग गुरव (पान २ वर)

# शहापूरमध्ये युवकावर कोयत्याने हल्ला

इचलकरंजी,ता.१३–

**बहिणीचा शोध घेऊन नकोस अन्यथा जिवंत सोडणार नाही अशी धमकी देत लाथाबुक्क्यांनी मारहाणीसह कोयत्याने वार करुन जखमी केल्याप्रकरणी दोघांवर शहापूर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अनिल जयसिंग गोसावी व सुरेश जयसिंग गोसावी (दोघे रा. कागल) अशी त्यांची नांवे असून अर्जुन प्रकाश गोसावी (वय २७ रा. साईनगर राधानगरी) याने फिर्याद दाखल केली आहे. ही घटना शहापूर म्हसोबा मंदिर परिसरातील मोकळ्या जागेत शनिवारी दुपारी घडली.**

याबाबत पोलिसांतून मिळालेली माहिती अशी, फिर्यादी व आरोपी हे एकमेकांचे नातेवाईक असून फिर्यादी अर्जुन गोसावी यांनी बहिण मिसिंगबाबत राधानगरी पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. फिर्यादी हे बहिणीचा शोध घेत इचलकरंजीत आले असता अनिल व सुरेश यांनी बहिण कोठे आहे आम्हास माहिती असल्याचे सांगत फिर्यादीला कारमधून शहापूर परिसरात नेले. त्याठिकाणी बहिणीचा शोध घेवुन नकोस, नाहीतर तुला जीवंत सोडणार नाही अशी धमकी देत शिवीगाळ करत लाथा-बुक्यांनी मारहाण केली. तसेच अनिल याने फिर्यादीच्या डोक्यात कोयत्याने वार केल्याने फिर्यादी हे जखमी झाले. या प्रकरणी दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# वाहतुक शाखेच्या पाठीमागील जागेवरील पार्कींग स्टेशन वगळावे

## व्यापारी फेरीवाले संघटनेची मागणी

इचलकरंजी,ता.१३–

**येथील शिवतिर्थाजवळील वाहतुक शाखेच्या मागील बाजुस महापालिकेच्या परिवहन विभागामार्फत शहरी बसचे पार्कींग स्टेशन करण्यासाठी पाहणी करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर कोल्हापुर जिल्हा छोटे व्यापारी फेरीवाले संघटनेच्या शिष्टमंडळाने महापौर उदय धातुंडे यांची भेट घेऊन छोट्या व्यापाऱ्यांनी स्वखर्चाने उभारलेल्या दुकानगाळ्यांची जागा वगळुन स्टेशन उभारण्यासह विविध मागण्या केल्या.**

शहरी बस पार्कींगसाठी परिवहन सभापती, अधिकाऱ्यांनी शिवतिर्थाजवळील वाहतुक नियंत्रण शाखेच्या मागील जागेची पाहणी केल्यावर त्या ठिकाणी छोट्या व्यापाऱ्यांनी स्वखर्चाने उभारलेले दुकानगाळे काढावे लागणार अशी चर्चा सुरु आहे. या व्यवसायावर फेरीवाल्यांच्या मुलांचे शिक्षण, संसार, देणे-घेणे अवलंबून आहे. त्यामुळे दुकानगाळ्यांना कोणताही धक्का लावु नये, दुकानगाळ्यांची जागा वगळुन पार्कींग स्टेशन करावे. तसेच येथील शिवतिर्थ आणि सुंदर बाग येथे छोटे व्यापारी फेरीवाल्यांनी स्वखर्चाने उभारलेल्या दुकानगाळ्यांची मुदत संपल्याने नुतनीकरण करुन द्यावे. विक्री प्रमाणपत्रासाठी आकारलेली फी अन्यायकारक असल्याने रक्कम ठरवण्यासाठी इचलकरंजी शहर पथविक्रेता समितीसमोर चर्चा करुन निर्णय घेण्यासह विविध मागण्यांबाबत चर्चा केली. शिष्टमंडळात दिपक पाटील, मनिष नायडु, राकेश माळी, नितीन परीट, लक्ष्मी कांबळे, अश्विनी कुबडगे यांचा समावेश होता.

# अपघातग्रस्ताच्या कुटुंबियांना १३ लाखांची नुकसान भरपाई

अंबप,ता.१३–

**ट्रकच्या धडकेत महिलेचा मृत्यू झाला याप्रकरणी मयत महिलेच्या नातेवाईकांनी न्यायालयात दावा दाखल केला होता. याप्रकरणी न्यायालयाने विमा कंपनीने १३ लाखाची नुकसान भरपाई देण्याचा आदेश दिला.**

श्रीमती. उमा विश्वजीत तेली या स्कुटरवरुन शेताकडे जाताना अंबप येथे ट्रक (नं. एम.एच-११ - सी. एच. - २८२९) धडकलेने मयत झाल्या होत्या.याप्रकरणी न्यायालयाने विमा कं. एच.डी.एफ.सी. ने मयताच्या नातेवाईकास १३ लाखाची नुकसान भरपाई देण्याचा आदेश दिला.नुकसान भरपाई मंजूर करणेचे काम ॲड. सी. बी. कोरे (रेंदाळकर) यांनी पाहिले.

# पंचगंगेतील केंदाळ काढण्याच्या मोहिमेला सुरुवात

## केंद्राळमुक्त होईपर्यंत मोहीम राबविणार



इचलकरंजी, ता. १३ –

**येथील लोकप्रतिनिधी अणि महापालिका प्रशासनाने सोमवारपासून पंचगंगा नदी पात्रातील केंदाळ काढण्याची मोहिम सुरु केली आहे. या मोहिमेत सोमवारी दिवसभरात नदीपात्रातून मोठ्याप्रमाणात केंदाळ काढण्यात आली. महापालिकेचे स्वच्छता कर्मचारीही या मोहिमेत सहभागी झाले होते. दरम्यान, नदी केंदाळ मुक्त होईपर्यंत ही मोहिम सुरुच ठेवण्याचा निर्धार करण्यात आला.**

येथील पंचगंगा नदीच्या पात्रात गेल्या काही दिवसापासून मोठ्याप्रमाणात केंदाळ वाढल्याने नदीचे पात्र हे खेळाचे मैदान बनले होते. वाढत चाललेल्या केंदाळामुळे पाण्यातील जलचर प्राणी मृत्यूमुखी पडण्याची भिती निर्माण झाली होती.

सदरचे केंदाळ तात्काळ काढण्यात यावी अशी मागणी नागरिकांतून होत होती.सदरचे केंदाळ काढण्याचे काम पै. अमृत भोसले यांच्या नेतृत्वाखाली व्यंकोबा मैदानातील मल्लांनी नदीतील केंदाळ काढण्याच्या मोहिमेला प्रारंभ केला. या मोहिमेसाठी नगरसेवक संतोष शेळके, राजू पुजारी, नागेश पाटील, प्रमोद बचाटे यांच्यासह काही नगरसेवक कार्यकर्त्यांसह केंदाळ काढण्यासाठी नदीपात्रात उतरले होते. श्री वरदविनायक मंदिर आणि नदी घाटाजवळील केंदाळ काढण्यात आले. महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन पथकाचे संजय कांबळे यांच्यासह पथकाने यांत्रिक बोटीच्या सहाय्याने केंदाळ काठावर ढकलत आणल्यावर नदीकाठावरील कार्यकर्ते ही केंदाळ पात्रातून बाहेर काढत होते. महापौर उदय धातुंडे, उपमहापौर अनिल डाळ्या यांच्यासह काही नगरसेवकांनी या मोहिमेची पाहणी केली.



# डॉ.आंबेडकर पुतळा ते आमराई रस्ता कामाची महापौर ,उपमहापौरांकडून पाहणी

इचलकरंजी,ता.१३–

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते आमराई रोड या रस्ता कामाचे ठिकाणी महापौर उदय धातुंडे उपमहापौर अनिल डाळ्या व स्थायी समिती सभापती सतीश मुळीक यांनी प्रत्यक्ष जागेवर जाऊन कामाची पाहणी केली.**

यावेळी मनपा अधिकारी व मक्तेदार यांना रस्त्याचे काम दर्जेदार करण्याच्या सूचना दिल्या. तसेच वापरण्यात येणाऱ्या मटरेल ची खात्री व पाहणी करण्यात आली. तसेच सदरचा रस्ता हा इचलकरंजी शहरातील मुख्य रस्ता असल्याने गुणवत्तापूर्वक रस्त्याचे काम विहित वेळेमध्ये करण्याच्या सूचना करण्यात आल्या. तसेच संबंधित विभागांना खुदाईची व पाईपलाईनचे किंवा अन्य विभागाचे काम लवकरात लवकर पूर्ण करून घेण्याचे आदेश देण्यात आले. रस्त्याचे काम चालू असताना इचलकरंजी शहरातील नागरिकांना कमीत कमी कसा त्रास सहन करावे लागेल याच्यावर भर देण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना व मक्तेदार करण्यात आले.

# वीज सवलत रजिस्ट्रेशनसाठी मुदतवाढ द्यावी

## पॉवरलुम असोसिएशनची मागणी



इचलकरंजी,ता.१३–

**यंत्रमाग उद्योगाची वीज सवलत सुरू ठेवणेसाठी ऑनलाईन रजिस्ट्रेशनसाठीची मुदत सहा महिने वाढवावी, अशा मागणीचे निवेदन दि इचलकरंजी पॉवरलुम असोसिएशनच्या वतीने नागपूरचे वस्त्रोद्योग आयुक्त संजय दैने यांना देणेत आले. यावेळी सहआयुक्त गणेश वंडकर, प्रादेशिक उपायुक्त सौ.उज्वला पळसकर उपस्थित होते.**

२७ ऑक्टोंबर २०२५ रोजी महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग मंत्रालयाकडून यंत्रमाग उद्योगासाठी ऑनलाईन रजिस्ट्रेशन सक्तीचे करणेत आले होते. त्यासाठी सहा महिन्यांची मुदत परिपत्रकामध्ये देणेत आली होती. परंतू सदर ऑनलाईन अर्ज भरण्यामध्ये यंत्रमागधारकांना अडचणींसह त्यामधील जाचक अटी पूर्ण करणे अशक्य होते. याबाबत इचलकरंजी पॉवरलुम असोसिएशनने आमदार राहुल आवाडे यांच्या मार्फत वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांच्याकडे या ऑनलाईन अर्जामध्ये बदल करून सुटसुटीत अर्ज व सर्व प्रकारच्या यंत्रमागधारकांना तो भरता येईल अशा पद्धतीचा अर्ज तयार करून द्यावा अशी मागणी केली होती. त्याप्रमाणे मंत्रालयामध्ये एकूण तीन मिटींग होऊन तसा ऑनलाईन अर्ज ७ एप्रिल २०२६ रोजी उपलब्ध करून देणेत आला. परंतू फक्त इचलकरंजीमध्ये १० हजार ८०० यंत्रमागधारक आहेत. ज्यांचे ऑनलाईन रजिस्ट्रेशन अजून होणार आहे.

उर्वरीत १५ दिवसांत ते होणे अशक्य असल्याने ऑनलाईन नोंदणीस ६ महिन्यांची मुदतवाढ देण्यात यावी. तसेच जे यंत्रमागधारक पोर्टलवर जाऊन सर्व माहितीसह रजिस्ट्रेशन करतील व त्यांना यु.आ.डी. नंबर प्राप्त होईल अशा यंत्रमागधारकांची वीज बिल सवलत अंतीम मंजूरी अभावी बंद करणेत येऊ नये असे निवेदनात म्हटले आहे.

यावेळी इचलकरंजी पॉवरलुम असोसिएशनचे अध्यक्ष चंद्रकांत पाटील, उपाध्यक्ष रफिक खानापूरे, संचालक सतीश कोष्टी, सोमाण्णा वाळकुंजे, चंद्रकांत भोपळे, पांडूरंग सोलगे, दत्तात्रय टेके, किरण पोवार, राजाराम गिरी इ. उपस्थित होते.


Guru Global School
WE CARE WE CREATE
AN ISO 9001:2015 CERTIFIED

GURU GLOBAL PRESCHOOL

ADMISSION OPEN

PLAYGROUP | NURSERY | JUNIOR KG
SENIOR KG | ABACUS | PHONICS
DAYCARE | VEDIC MATHS | HANDWRITING

AWARD WINNING PRESCHOOL

You own your child A strong foundation for life ahead...
Give wings to their creativity and learning

YOUR KIDS DESERVE THE BEST EDUCATION
Now In TARDAL
WE ARE HIRING! 7387320551
Professional Needed
✓ Preschool Teachers ✓ Care Taker ....APPLY NOW



CHANGE IN NAME

My Old Name **Shanta Krishnaji Kamate** Do Hereby Solemnly Declare My New Name as **Pranita Sanjay Harge** For Passport Issuance


# व्यावसायिकाची फसवणूक

सांगली, ता. १३( प्रतिनिधी)–

**रुग्णालयाचे बील भरण्यासाठी म्हणून घेतलेल्या पैशाच्या बदल्यात उच्च प्रतीचे गहू देण्याचे आमिष दाखवून एका व्यावसायिकाची २० हजार रुपयांची फसवणूक करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.**

याप्रकरणी दौलतराव शंकरराव घोरपडे (रा. कलम शंकर व्हीला, रेल्वे लाईन, कलानगर, सांगली) यांनी संजयनगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी संशयित संगाप्पा दोडमणी, विकास संगाप्पा दोडमणी आणि रचप्पा मदार (सर्व रा. उमराणी ता. जत ) यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे.

फसवणूकीचा हा प्रकार दि. २० ऑगस्ट ते दि. २९ ऑगस्ट २०२५ या कालावधीत घडला. घटनेची माहिती अशी, संशयितांनी संगनमत करुन त्यांची आई रुग्णालयामध्ये दाखल असून बिल भरण्याकरिता फिर्यादी दौलतराव यांच्याकडून ३५ हजार रुपये घेतले होते. त्या बदल्यात उच्च प्रतिचा ३८० किलो गहू देण्याचे आश्वासन दिले होते. तसेच त्यावेळी एक किलो गहू नमुना म्हणून त्यांना दिला होता. यानंतर फिर्यादी दौलतराव यांनी उर्वरित गहू देण्याबाबत संशयितांना फोन केला असता त्यांनी प्रारंभी उडवाउडवीची उत्तरे दिली. मात्र नंतर १५ हजार रुपये दिले. शिल्लक २० हजार रुपये लवकर देतो असे आश्वासन संशयितांनी दौलतराव यांना दिले. सदर रक्कमेबाबत विचारणा केली असता संशयितांनी, आम्ही २० हजार रुपये देणार नाही. तुम्हाला काय करायचे ते करा असे दौलतराव यांना सांगितले. त्यामुळे फसवणूक झाल्याचे लक्षात येताच दौलतराव यांनी फिर्याद नोंद केली.



Shri Shamrao Patil (Yadravkar) Educational & Charitable Trust's
**Sharad Ayurved Medical College, Hospital & Research Centre**
Yadrav (Ichalkaranji), Tal- Shirol, Dist- Kolhapur. 416121
Phone: (0230) 2989811, Website: www.sharadayurvedcollege.org

RECRUITMENT

| Sr. No | Department / Subject | Post | No of Post | Qualification |
|---|---|---|---|---|
| 1 | Medical Superintendent | | 01 | MD/MS (Min 10 Years of Experience in any Clinical Subject / Professor in Clinical Subject) |
| 2 | Medical Officer | | 01 | MBBS |
| 3 | Rachna Sharira | Lecturer | 01 | MD in Rachna Sharira |
| | | Reader | 01 | Min 5 Years Teaching Experience in Rachna Sharira |
| 4 | Kriya Sharira | Lecturer | 01 | MD in Kriya Sharira |
| 5 | Dravyaguna Vijnana | Lecturer | 01 | MD in Dravyaguna Vijnana |
| | | Reader | 01 | Min 5 Years Teaching Experience in Dravyaguna Vijnana |
| 6 | Rasashastra evam Bhaishajyakalpana | Lecturer | 01 | MD in Rasashastra evam Bhaishajyakalpana |
| | | Reader | 01 | Min 5 Years Teaching Experience in Rasashastra evam Bhaishajyakalpana |
| 7 | Roga Nidana evam Vikriti Vigyan | Lecturer | 01 | MD in Roga Nidana evam Vikriti Vigyan |
| | | Reader | 01 | Min 5 Years Teaching Experience in Roga Nidana evam Vikriti Vigyan |
| 8 | Agad Tantra evamVidhi | Lecturer | 01 | MD in Agad Tantra evamVidhi |
| | | Reader | 01 | Min 5 Years Teaching Experience in Agad Tantra evamVidhi |
| 9 | Swasthavritta evam Yoga | Lecturer | 01 | MD in Swasthavritta evam Yoga |
| | | Reader | 01 | Min 5 Years Teaching Experience in Swasthavritta evam Yoga |
| 10 | Kayachikitsa | Consultant | 01 | MD in Kayachikitsa |
| 11 | Shalya Tantra | Consultant | 01 | MS in Shalya Tantra |
| 12 | Shalakya Tantra | Consultant | 01 | MS in Shalakya Tantra |
| 13 | Prasuti-StreeRoga | Consultant | 01 | MS in Prasuti-StreeRoga |
| 14 | Kaumarabhritya | Consultant | 01 | MD in Kaumarabhritya |
| 15 | Nurse | | 02 | ANM, GNM |
| 16 | Panchkarma Therapist (Male) | | 01 | Diploma in Panchkarma Therapy |

Note: Please forward your Resume with all details to career@sitcoe.org.in within 15 days after publishing this advertisement.
Date: 14/04/2026

**Shri. Anil Bagane** Executive Director
**Hon. Rajendra Patil (Yadravkar)** Chairman

■ संपादकीय ■

# मतदारसंख्येचं गोलमाल

केंद्रीय निवडणूक आयोगाने आतापर्यंत ज्या राज्यांत आणि केंद्रशासित प्रदेशांत मतदार यादीच्या सखोल पुनरीक्षणाचे काम पूर्ण केले आहे. यामध्ये एकूण पाच कोटी ५८ लाख मतदार अवैध आढळले आहेत. यात सर्वाधिक दोन कोटी पाच लाख मतदार उत्तर प्रदेशातील आहेत. तथापि, टक्केवारीच्या हिशोबात सर्वात जास्त १३.४० टक्के मतदार गुजरात राज्यात कमी झाले आहेत. मात्र या प्रदेशाची लोकसंख्या उत्तर प्रदेशच्या तुलनेत कमी असल्याने मतदारांची संख्या उत्तर प्रदेशच्या तुलनेत कमी आहे, कारण उत्तर प्रदेशात मतदार यादीतून बाहेर झालेल्या मतदारांची टक्केवारी १३.२३ इतकी आहे. निवडणूक आयोगाने हे सखोल पुनरीक्षण दोन टप्प्यांत पूर्ण केले आहे, कारण बिहार राज्यात गेल्या वर्षी झालेल्या विधानसभा निवडणुकांपूर्वीच पुनरीक्षणाचे काम पूर्ण झाले होते. अशा प्रकारे एकूण दहा राज्ये आणि तीन केंद्रशासित प्रदेशांत निवडणूक आयोगाने पुनरीक्षणाचे काम केले. यामध्ये उत्तर प्रदेशची मोठी लोकसंख्या पाहता दुसऱ्या टप्प्यातील काम सर्वात शेवटी १० एप्रिलपर्यंत पूर्ण होऊ शकले. प्रश्न असा आहे की, एकीकडे देशाची लोकसंख्या सातत्याने वाढत असताना दुसरीकडे मतदारांची संख्या कमी का होत आहे? याचे तार्किक उत्तर निवडणूक आयोग असे देत आहे की, मागील विशेष पुनरीक्षणाचे काम २० वर्षांपूर्वी झाले होते आणि या काळात भारताच्या लोकसंख्येमध्ये मोठा बदल झाला आहे. मोठ्या संख्येने लोकांचे गावांकडून शहरांकडे स्थलांतर झाले आहे. लोक उपजीविकेच्या शोधात मोठ्या शहरांकडे जात असतात, मात्र त्यांचे मतदार ओळखपत्र जुन्या पत्त्यावरच राहते. तसेच लोकांचा मृत्यू होऊनही त्यांची नावे मतदार यादीत कायम राहतात आणि मोठी संख्या अशा लोकांची आहे जे जुन्या ठिकाणी मतदार असतानाच नवीन ठिकाणीही मतदार बनतात. पुनरीक्षणात आयोगाने अशा सर्व विसंगती दूर करण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र मतदारांच्या संख्येत घट होण्याचे आणखी एक कारण मानले जात आहे ते म्हणजे निवडणूक आयोगाने पहिल्यांदाच मतदारांच्या नागरिकत्वाच्या तपासासाठी आवश्यक सरकारी कागदपत्रे मागितली. या प्रकरणी आयोगाला देशातील विरोधी पक्षांच्या टीकेचा धनी व्हावे लागले आणि हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयापर्यंत पोहोचले. तिथून मतदारांना काहीसा दिलासा मिळाला कारण न्यायालयाने लोकांच्या आधारकार्डाला त्यांच्या ओळखीचा पुरावा मानण्याचे निर्देश दिले. असे असूनही पश्चिम बंगालसारख्या राज्यात मतदार यादीतून नावे वगळण्यावरून तिथले तृणमूल काँग्रेसचे ममता दीदींचे सरकार निवडणूक आयोगाला लक्ष्य करत आहे आणि निवडणूक आयोग या राज्यात भेदभावपूर्ण पद्धतीने काम करत असून केंद्रातील सत्ताधारी भाजपशी हातमिळवणी करून मनमानी करत असल्याचा आरोप करत आहे. मात्र सर्वोच्च न्यायालयात ममता दीदी आपले आरोप सिद्ध करण्यात अपयशी ठरल्या आहेत. बंगालमध्ये सुरुवातीला आयोगाने ९० लाख मतदारांची नावे उडवली होती, मात्र न्यायालयीन हस्तक्षेपानंतर ही संख्या घटून २७ लाखांवर आली. परंतु हे २७ लाख मतदारही दावा करत आहेत की, त्यांच्याकडे आवश्यक कागदपत्रे असूनही त्यांचे नाव यादीतून बाहेर काढले गेले आहे. त्यामुळे आतापर्यंत ज्या दहा राज्यांत आणि तीन केंद्रशासित प्रदेशांत पुनरीक्षणाचे काम झाले आहे, त्यात पश्चिम बंगालचे प्रकरण पूर्णपणे वेगळे आहे. या प्रकरणात आपल्याला दररोज नवीन वाद ऐकायला मिळत आहेत, जे भारताच्या लोकशाहीसाठी कोणत्याही दृष्टीने योग्य म्हणता येणार नाहीत, कारण लोकशाहीचा खरा मालक मतदारच असतो. निवडणूक आयोग स्वतःला पूर्णपणे 'अराजकीय' ठेवून देशाच्या पक्षीय राजकीय प्रणालीचे नियमन करतो आणि संसदीय लोकशाही प्रणालीची सर्वात मोठी जबाबदारी असलेल्या निवडणुका पार पाडतो. त्यामुळे याची निष्पक्षता सर्व राजकीय पक्षांच्या नजरेत कोणत्याही परिस्थितीत संशयापलीकडे राहिली पाहिजे. मात्र आपण पाहत आहोत की यात घट झाली आहे, कारण गेल्या काही दिवसांत देशातील विरोधी पक्षांच्यावतीने मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात महाभियोग चालवण्याचे प्रस्ताव संसदेच्या दोन्ही सभागृहांच्या विचारासाठी ठेवण्यात आले होते. हे प्रस्ताव जरी फेटाळले गेले असले, तरी विरोधी पक्ष हे प्रकरण लवकरच सर्वोच्च न्यायालयात नेण्याच्या प्रयत्नात आहेत. हा कायदेशीर गुंतागुंतीचा विषय आहे, मात्र जिथे सामान्य मतदाराचा प्रश्न येतो, तिथे त्याच्या मनात ही शंका नक्कीच निर्माण झाली आहे की, कुठे आपला मतदानाचा अधिकार निवडणूक आयोग धोक्यात तर घालत नाही ना? आयोगाचा असा हेतू अजिबात नाही, तो केवळ यादीचे कडक शुद्धीकरण करत आहे ज्याचा अधिकार संविधान त्याला देते. संविधान सांगते की केवळ भारताचा नागरिकच मतदार होऊ शकतो, त्यामुळे याबद्दल आयोग जर पडताळणी करत असेल तर त्यावर आक्षेप घेणे म्हणजे यादी अशुद्ध ठेवण्यासारखेच मानले जाईल.

# महामानवाचे महान कार्य

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय इतिहासातील एक अद्वितीय व्यक्तिमत्त्व होते, ज्यांनी संपूर्ण आयुष्य सामाजिक, आर्थिक, आणि राजकीय समानतेसाठी समर्पित केले. बाबासाहेब केवळ दलितांचे नेते नव्हते, तर ते समतेच्या संघर्षातील एक जागतिक नेते होते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला एका विशिष्ट चौकटीत बंदिस्त करण्याचा प्रयत्न त्यांच्या काळातही झाला, आणि आजही तो सुरू आहे. मात्र, त्यांच्या कार्याची व्याप्ती इतकी विशाल आहे की ती सर्वसमावेशक आहे.**

भारतीय स्वातंत्र्य चळवळीत त्यांचे योगदान असामान्य होते, परंतु स्वतंत्र भारताच्या सामाजिक आणि आर्थिक पुनर्रचनेसाठी त्यांनी जे योगदान दिले, ते त्यांच्या नेतृत्वाचे खरे वैशिष्ट्य ठरते. बाबासाहेबांचा सर्वात मोठा वारसा म्हणजे शिक्षण, संघटन, आणि संघर्षाचा संदेश.त्यांनी वंचितांना जागृत करण्यासाठी दिलेला मंत्र शिका, संघटित व्हा, आणि संघर्ष करा ही केवळ घोषणा नसून, एक जीवनदृष्टी होती. त्यांनी समाजातील प्रत्येक शोषित गटासाठी संघर्ष केला. मग ते सामाजिकदृष्ट्या दलित, आर्थिकदृष्ट्या गरीब कामगार किंवा लैंगिकदृष्ट्या शोषित महिला असोत, त्यांनी नेहमीच असा आग्रह धरला की समाजातील वंचित घटकांनी आपल्या अधिकारांसाठी संघर्ष केला पाहिजे, शिक्षण घेतले पाहिजे आणि आपल्या सामूहिक ताकदीच्या आधारे एक नवा समाज घडवला पाहिजे.बाबासाहेबांच्या नेतृत्वाखाली भारतीय कामगार चळवळीला नवी दिशा मिळाली. १९४२ ते १९४६ या काळात ते व्हाईसरॉयच्या कार्यकारी कौन्सिलचे सदस्य होते. या काळात त्यांनी कामगारांसाठी ८ तासांच्या कामाचा कायदा मंजूर करून घेतला. ही त्या काळातील क्रांतिकारक घटना होती. कारण तेव्हा भारतातील कामगार दिवसाला १० ते १४ तास काम करत होते. त्यांनी महिलांसाठी स्वतंत्र कामगार कायदे तयार करून त्यांच्या कामाच्या तासांवर निर्बंध घातले आणि समान कामासाठी समान वेतनाचा कायदा अस्तित्वात आणला. आज आपण ज्या कामगार विषयक कायद्यांचा आधार घेतो, त्यांची मुळे बाबासाहेबांच्या दूरदृष्टीत आहेत.



भारतीय अर्थव्यवस्थेच्या सुरक्षिततेसाठी भारतीय रिझर्व्ह बँकेची स्थापना करण्यात बाबासाहेबांनी महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांच्या 'प्रॉब्लेम ऑफ रुपी' या ग्रंथात मांडलेल्या आर्थिक तत्त्वांवर रिझर्व्ह बँकेची रचना झाली. जागतिक मंदीच्या काळातही रिझर्व्ह बँकेच्या धोरणांमुळे भारताच्या अर्थव्यवस्थेचे संरक्षण झाले, आणि सामान्य नागरिकांचे आर्थिक नुकसान टळले. बाबासाहेबांच्या आर्थिक विचारांमुळे भारतीय अर्थव्यवस्थेला स्थैर्य मिळाले, ज्याचा आजही लाभ होत आहे.

महिलांच्या हक्कांसाठी बाबासाहेबांचे योगदान अतुलनीय आहे. त्यांनी हिंदू कोड बिल तयार करून महिलांना समान वारसा हक्क, विभक्त होण्याचा अधिकार, आणि विवाहसंबंधी इतर महत्त्वाचे अधिकार मिळवून देण्याचा प्रयत्न केला. परंतु, या विधेयकाला तीव्र विरोध झाला. तत्कालीन सत्ताधारी पक्षातील नेते आणि विरोधक एकत्र येऊन या विधेयकाला विरोध करत होते. राष्ट्रपतींनीही या विधेयकाला मान्यता देण्यास नकार दिला. या प्रकाराने व्यथित होऊन बाबासाहेबांनी कायदेमंत्री पदाचा राजीनामा दिला. त्यांनी स्पष्टपणे आपले मत मांडले की, महिला शिक्षणाशिवाय आणि त्यांना समानता मिळवून देणाऱ्या कायद्याशिवाय समाजाची प्रगती शक्य नाही. त्यांच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्यानंतर महिलांना मतदानाचा अधिकार मिळाला. त्याकाळी जगात सोव्हिएत संघ आणि चीनसारख्या मोजक्या देशांमध्ये महिलांना हा अधिकार मिळाला होता. त्यामुळे भारतीय महिला बाबासाहेबांच्या सदैव ऋणी आहेत.

भारतीय समाजात खोलवर रुजलेली जातीव्यवस्था ही बाबासाहेबांसाठी सर्वात मोठी अडचण होती. त्यांनी जातीव्यवस्थेच्या निर्मूलनासाठी आपले आयुष्य समर्पित केले. 'ॲनिहिलेशन ऑफ कास्ट' या त्यांच्या ऐतिहासिक ग्रंथात त्यांनी जातीव्यवस्थेची सखोल चिकित्सा केली आणि तिच्या विनाशासाठी आवश्यक उपाययोजना सुचवल्या. त्यांचे मत होते की, जात हा एक दैत्य आहे, जो भारताच्या प्रगतीच्या मार्गात अडसर बनला आहे. जोपर्यंत जातिव्यवस्था संपत नाही, तोपर्यंत भारतात खऱ्या अर्थाने प्रगती होऊ शकत नाही.

**दैनंदिनी**

महाड सत्याग्रहाच्या माध्यमातून त्यांनी अस्पृश्यांना पाण्याचा अधिकार मिळवून दिला. या ऐतिहासिक आंदोलनात अस्पृश्य महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. महाड येथे त्यांनी मनुस्मृतीचे दहन केले, कारण त्यांना मनुस्मृती ही असमानतेचा पाया वाटत होती. त्यांचा विश्वास होता की भारतीय समाजातील असमानता नष्ट करण्यासाठी धर्मग्रंथांमध्ये सुधारणा करणे गरजेचे आहे.

बाबासाहेबांनी शिक्षणाला समाज परिवर्तनाचे साधन मानले. त्यांचे मत होते की, शिक्षणाशिवाय वंचित समाजाला प्रगतीची वाट सापडणार नाही. त्यांनी स्वतःच्या आयुष्यातील सर्व अडचणींवर मात करून उच्च शिक्षण प्राप्त केले आणि इतरांना शिकवण्याचा वसा घेतला. त्यांच्या विचारांनी प्रेरित होऊन अनेक दलित आणि वंचित लोक शिक्षणाच्या प्रवाहात आले. त्यांनी कोलंबिया विद्यापीठात केलेल्या संशोधनातून सामाजिक न्याय आणि समानतेचा विचार मांडला, जो आजही मार्गदर्शक आहे.

भारतीय संविधानाच्या निर्मितीत बाबासाहेबांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. संविधान सभेत त्यांनी म्हटले की, आम्ही एका अंतर्विरोधांनी भरलेल्या समाजात प्रवेश करत आहोत. आपण सर्वांना राजकीय समानता दिली आहे,पण सामाजिक आणि आर्थिक असमानता आजही कायम आहे. जोपर्यंत ही असमानता संपत नाही, तोपर्यंत राजकीय समानताही टिकू शकणार नाही.

जोपर्यंत समाजातील प्रत्येक व्यक्तीला शिक्षण, समानता, आणि न्याय मिळत नाही, तोपर्यंत बाबासाहेबांचे विचार आणि कार्य दिशादर्शक ठरणार आहे. अस्पृश्यता, स्त्रीभ्रूणहत्या, लिंगभेद, आणि आर्थिक विषमता या सगळ्यांविरोधात लढताना बाबासाहेबांच्या विचारांचा आधार घ्यावा लागतो.

# शेतकरी मुलांच्या लग्नाचा प्रश्न बिकट

## 'शेती' हवी पण 'शेतकरी नको'ची मानसिकता बदलायला हवी



**कृषीप्रधान देश म्हणून भारताची ओळख आहे. शेतकऱ्याला 'राजा' म्हटले जाते. भाषणांमध्ये, जाहिरातींमध्ये आणि सरकारी कार्यक्रमांमध्ये शेतकऱ्याचा गौरव केला जातो. परंतु प्रत्यक्ष वास्तव मात्र पूर्णपणे वेगळे आहे. आज ग्रामीण भागात शेतकऱ्यांच्या मुलांचे लग्न ठरत नाही, ही अत्यंत गंभीर सामाजिक समस्या बनली आहे. अनेक शेतकरी कुटुंबे मुलासाठी स्थळ शोधताना दारोदार फिरत आहेत. परंतु मुलगा शेती करतो, एवढे एकच कारण पुरेसे ठरत आहे आणि मुलीच्या घरातून नकार मिळत आहे.**

आज समाजात सरकारी नोकरी, शहरातील व्यवसाय किंवा परदेशातील नोकरी यांना प्रतिष्ठा मिळाली आहे. सरकारी नोकराला मुलगी देण्यासाठी अनेक जण पुढाकार घेतात.त्याला सुरक्षित भविष्य, निश्चित पगार, सामाजिक मान आणि स्थैर्य असल्याचे मानले जाते. पण शेतकरी मुलगा कितीही कष्टाळू, प्रामाणिक, शिक्षित आणि जबाबदार असला तरी 'तो शेती करतो'या एका कारणामुळे त्याच्याकडे दुय्यम नजरेने पाहिले जाते. ही मानसिकता अत्यंत धोकादायक आहे.

शेतकऱ्यांच्या मुलांचे लग्न न ठरण्यामागे अनेक कारणे आहेत. सर्वात मोठे कारण म्हणजे शेतीतील अस्थिरता. पाऊस, बाजारभाव, कर्ज, उत्पादन खर्च आणि नैसर्गिक आपत्ती यामुळे शेतीचे उत्पन्न अनिश्चित झाले आहे. एका वर्षी चांगले पीक आले, तरी बाजारात भाव मिळेलच याची खात्री नाही. त्यामुळे मुलीच्या पालकांना शेतकरी मुलाच्या भविष्यात स्थैर्य दिसत नाही.दुसरे कारण म्हणजे समाजात तयार झालेली चुकीची प्रतिष्ठेची व्याख्या. शहरात राहणारा, पगारदार नोकरी करणारा मुलगा 'चांगला' आणि शेती करणारा मुलगा 'मागास' अशी भावना निर्माण झाली आहे. अनेकदा मुलगी स्वतःही शहरातील जीवन, नोकरी, सोयी-सुविधा यांची अपेक्षा करते. शेतीतील कष्ट, गावातील जीवन आणि संयुक्त कुटुंब याबाबत नकारात्मक विचार तिच्या मनात भरवले जातात.याचा परिणाम अत्यंत गंभीर स्वरूपात दिसत आहे. अनेक शेतकरी मुलांचे वय ३०-३५ वर्षांच्या पुढे जात आहे. काहींचे लग्नच होत नाही. त्यामुळे त्यांच्यात न्यूनगंड, एकटेपणा, मानसिक ताण आणि नैराश्य वाढत आहे. गावात टोमणे, नातेवाईकांचे प्रश्न आणि समाजाची उपेक्षा यामुळे अनेक तरुण मानसिकदृष्ट्या खचून जात आहेत. काही ठिकाणी आत्महत्येसारखे टोकाचे प्रकारही घडत आहेत. ही केवळ वैयक्तिक समस्या नसून संपूर्ण ग्रामीण समाजाला पोखरणारी सामाजिक शोकांतिका आहे.

या परिस्थितीसाठी सरकारचीही मोठी जबाबदारी आहे. सरकारने केवळ शेतकऱ्याला 'अन्नदाता' म्हणून गौरवण्यापेक्षा त्याचे जीवन प्रत्यक्षात सुरक्षित आणि सन्मानाचे करणे आवश्यक आहे. शेतीला हमीभाव, पीकविमा, सिंचन, वीज, कर्जमाफी आणि शेतीपूरक उद्योगांची मजबूत व्यवस्था दिली, तर शेतीत स्थैर्य निर्माण होईल. ग्रामीण भागात प्रक्रिया उद्योग, दुग्धव्यवसाय, पोल्ट्री, शेतीवर आधारित छोटे उद्योग वाढवले, तर शेतकरी मुलांना उत्पन्नाचे पर्याय निर्माण होतील.

सरकारने ग्रामीण भागातील युवकांसाठी विशेष विवाह समुपदेशन केंद्रे सुरू करावीत. विवाह जुळवणीसाठी शासकीय किंवा सहकारी स्तरावर विश्वासार्ह व्यासपीठ उभे करणे गरजेचे आहे. जसे बेरोजगारांसाठी रोजगार मेळावे होतात, तसे ग्रामीण युवक-युवतींसाठी सामाजिक परिचय मेळावे आयोजित करता येतील. तसेच ग्रामीण भागात मानसिक आरोग्य आणि समुपदेशन सेवा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे, जेणेकरून नैराश्य आलेल्या तरुणांना आधार मिळेल.पण केवळ सरकारवर दोष टाकून चालणार नाही. समाजालाही स्वतःमध्ये बदल करावा लागेल. शेतकरी मुलगा म्हणजे कमीपणा नाही, तर तो देशाचा पोशिंदा आहे, ही भावना पुन्हा निर्माण करावी लागेल. मुलीच्या पालकांनी मुलाच्या स्वभाव, कष्ट, शिक्षण आणि जबाबदारीकडे पाहिले पाहिजे; फक्त पगाराच्या आकड्याकडे नाही. शेती करणारा मुलगा हा आयुष्यभर कष्ट करणारा, जमिनीशी जोडलेला आणि कुटुंबासाठी जगणारा असतो. त्याची किंमत पैशाने मोजता येत नाही.ग्रामीण भागातील पालकांनीही मुलांना शेतीसोबत आधुनिक शिक्षण, तंत्रज्ञान आणि पूरक व्यवसाय द्यायला हवा. शेती ही तोट्याचीच आहे, अशी भावना मुलांच्या मनात निर्माण होणार नाही, याची काळजी घेतली पाहिजे. आधुनिक शेती, ड्रोन, सेंद्रिय शेती, प्रक्रिया उद्योग, ऑनलाईन विक्री यामुळे शेतीचे चित्र बदलू शकते.

आज शेतकऱ्यांच्या मुलांचे लग्न न होणे ही फक्त एका घराची समस्या नाही. हा प्रश्न उद्या संपूर्ण ग्रामीण समाजाच्या रचनेवर परिणाम करणार आहे. जर शेती करणाऱ्या मुलांना समाजाने नाकारले, तर पुढच्या पिढीत शेती करण्यासाठी कोणी उरणार नाही. त्यामुळे सरकार, समाज आणि कुटुंब यांनी मिळून ही समस्या समजून घेतली पाहिजे. शेतकऱ्याच्या मुलाला सन्मान, आधार आणि आयुष्याचा हक्क मिळवून देणे, ही आजच्या समाजाची सर्वात मोठी जबाबदारी आहे.

■ राम करले, बाजारभोगाव


## स्कायमेटचा धोक्याचा इशारा

**यावर्षी सरासरीपेक्षा कमी पाऊस पडेल असा अंदाज स्कायमेट वेदरने वर्तवला आहे. जून ते सप्टेंबर या महिन्यांच्या कालावधीत एकूण पर्जन्यमान दीर्घकालीन सरासरीच्या ९४ टक्के राहण्याची शक्यता असून उणे अधिक पाच टक्क्यांच्या त्रुटी मर्यादेसह हा अंदाज व्यक्त करण्यात आला असून एकूण मान्सून ९० ते ९५ टक्के राहण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.**

अल निनोच्या प्रभावामुळे यावर्षी सरासरीपेक्षा कमी पाऊस पडेल असेही स्कायमेट वेदरने सांगितले आहे. स्कायमेट वेदरने दुष्काळ सदृश्य स्थितीची शक्यता ३० टक्क्यांपर्यंत पोहचण्याची शक्यता वर्तवली आहे. कृषीप्रधान अर्थव्यवस्था असल्याने भारतात हवामानाचा अंदाज खूप महत्वाचा ठरतो. भारतातील शेती पावसावर अवलंबून असल्याने बळीराजाचे डोळे आकाशाकडे लागलेले असतात. शेतीचं देशाच्या अर्थव्यवस्थेत योगदान १४टक्के असले तरी देशातील ७० टक्के रोजगार हे शेतीवर अवलंबून आहेत. कधी आस्मानी तर कधी सुलतानी संकटाने पिचलेला बळीराजा स्कायमेटच्या या अंदाजाने आणखी निराश झाला आहे.

■ श्याम ठाणेदार

## दैनिक पंचांग(सुर्योदयकालीन ग्रहस्थिती)




**मंगळवार ता.१४.४.२०२६**,विक्रमसंवत २०८२,शिवशक ३५२,शालिवहन शके १९४८,परामवनाम संवत्सरे, उत्तरायणे, वसंत ऋतो,चैत्र मासे, कृष्ण पक्षे,द्वादशी तिथी,२४.१३ नंतर त्रयोदशी तिथी,शततारका नक्षत्र,१६.०७ नंतर पूर्वा भाद्रपदा नक्षत्र,कुंभ रास,शुक्ल योग १५.४० नंतर ब्रह्मायोग,कौलव करण १२.४७ नंतर,तैतिल करण २४.१३ पर्यंत,दिनमान १२.२२,सुर्योदय ६.२२,सुर्यास्त १८.४४ (कोल्हापूरचे) राहू काळ सायं ३ ते ४.३०, डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती,रवि मेष राशीत प्रवेश सकाळी ९.३३ वाजता मध्यम दिवस दुपारी ४.१५ नंतर मृत्यू १६.०७ पर्यंत,खरसुंडी यात्रा, ज्योर्तिलिंग यात्रा खोडशी,कराड.

**ज्यो:केशव पेटकर महाराज-९६०४७०९१५९**

## ✻ राशीभविष्य

**मेष**-तुमच्या स्वत:साठी आज तुम्हाला पुरेसा वेळ देता येईल. प्रकृती चांगली राखण्यासाठी व्यायाम करा.आजच्या दिवशी गुंतवणूक करणे टाळा.

**वृषभ**- शिक्षणाकडे दुर्लक्ष होईल. कामासाठी प्रवास घडेल विवाह जुळेल.कामात यश मिळेल.शिक्षणात प्रगती राहिल.सुवर्णालंकार खरेदी कराल.खर्चाचे प्रमाण वाढेल.

**मिथून**-कामाच्या ठिकाणचे वरिष्ठांचे दडपण तणाव वाढवू शकतो. आजच्या दिवशी तुम्ही आपल्या धनाला खूप सुरक्षित ठेवा. तुमचा मोकळा वेळ मुलांच्या सहवासात घालवा.

**कर्क**- तुमच्यात आज उत्तम स्फूर्ती पाहिली जाईल. तुमचे स्वास्थ्य आज पूर्णतः तुमची साथ देतील. दूरवर राहणारे नातेवाईक आज तुमच्याशी संपर्क साधतील.

**सिंह**-तुमची ऊर्जा पातळी खूप उच्च आहे आणि ही ऊर्जा तुम्ही प्रलंबित कामे पूर्ण करण्यासाठी वापरली पाहिजे. दिवसाची सुरवात चांगली होणार आहे.

**कन्या**- आरोग्य एकदम चोख असेल. कुणी जुना मित्र आज तुमच्याकडून आर्थिक मदत मागू शकतो, त्याला मदत केली तर, तुमची आर्थिक स्थिती चांगली राहिल.

**तुळ**- तुमचे आवडते स्वप्न प्रत्यक्षात येईल. परंतु तुमचा उत्साह नियंत्रणात ठेवा. कारण खूप आनंदी होणे हे कधी कधी समस्येत टाकू शकते. तुमचे वैवाहिक आयुष्य उत्तम.

**वृश्चिक**-संध्याकाळी जरा क्षणभर विश्रांती घ्या.उद्योग व्यवसायानिमित्त केलेला प्रवास दीर्घकाळापर्यंत फायदेशीर ठरू शकेल. तुमच्या कामाच्या ठिकाणी वातावरण चांगले असेल.

**धनु**-उत्स्फूर्तपणे वागण्यावर नियंत्रण ठेवा आणि दुराग्रही स्वभावावर नियंत्रण ठेवा.आज तुम्ही एखादा तारा असल्यासारखे वागा. परंतु फक्त कौतुकास्पद ठरतील अशाच गोष्टी करा.

**मकर**-शारीरिक तसेच मानसिकदृष्ट्या तुम्हाला खचल्यासारखे वाटेल, थोडा आराम करा.सात्विक अन्नसेवन केल्यामुळे तुम्हाला ऊर्जा मिळेल. व्यापारात आज फायदा होईल.

**कुंभ**-प्रदीर्घ काळापासून तुम्ही अनुभवत असलेले आयुष्यातील तणाव यापासून थोडे मुक्त व्हाल.सगळे ताणतणाव दूर ठेवण्यासाठी जीवनशैली बदलायला हवी.

**मीन**-आजच्या दिवशी चार भिंतीबाहेरची रम्य भटकंती, मेजवान्या तुमचा मूड चांगला ठेवतील. आपल्या मनावर खूपच दडपण असेल तर मित्रांशी बोला.दडपण कमी होईल.

## वाचकांचा पत्रव्यवहार

### सुरांची 'आशा'कधीच संपणार नाही



वाद्यांचा स्वर सुरू होतो आणि त्या स्वरांमध्ये गुरफटून आशेचा एक धारदार किरण काना-मनात रुंजी घालतो. स्वरांचा मादकपणा अंगात भिनतो.गीत कोणाचेही असो, संगीतकार कोणीही असो त्यांच्या शब्द-सुरांत भिजून एखादे गाणे जेव्हा आशा भोसले यांच्या आवाजात आपल्या कानांवर पडते,तेव्हा एका विलक्षण प्रतिभेचा साक्षात्कार होतो.हा साक्षात्कार त्यांच्या हजारो गाण्यांमधून पुढेही लाखो वर्षे होत राहणार आहे.त्यांच्या सर्व गाण्यांचा एकत्रित विचार केला तर,एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती म्हणजे आशाताईंची बंडखोरी. ती त्यांच्या स्वभावातून गाण्यांत उतरली असावी. संगीताच्या प्रस्थापित वाटेने जाण्यापेक्षा काहीतरी वेगळे शोधायचे आणि तुफानी करूनही दाखवायचे.हा त्यांचा स्वभाव होता.त्यांना साथ आर डी बर्मन यांची मिळाली.त्यांच्या स्वभावातील रोखठोकपणा आणि फटकळपणा बहुधा त्यातूनच आला असावा. हजारो गाणी गाऊनही त्यांच्या आवाजातील ताजेपणा कधी संपला नाही; त्याचा गोडवा किंवा धारही कमी झाली नाही. आपण एका आयुष्यात ऐकूही शकणार नाही इतकी गाणी त्यांनी एकाच आयुष्यात गाऊन ठेवली. प्रेमगीत, विरहगीत, कॅबरे-डिस्को, गझल, मुजरा, कव्वाली, लावणी, भक्तिगीत ते नाट्यसंगीत''मन ही देवता, मन ही ईश्वर''सारख्या भक्तिरसाने ओथंबलेल्या गाण्यांपासून ते मादकतेने भारलेल्या ''दम मारो दम'' सारख्या गाण्यांपर्यंत त्यांनी सर्व प्रकारची गाणी तेवढ्याच समरसतेने गायली.

त्यांच्या आयुष्यातील आघात आणि अपघातांची मालिका कधीच संपली नाही. अनेक परीक्षा, कसोटीचे प्रसंग आणि संघर्षाचा मार्ग पार करत त्यांनी आपल्या नावाला साजेसा आशेचा किरण बनून या सर्व आव्हानांचा सामना केला. सुरांची ही 'आशा' आता मालवली जरी असली तरी कधी संपणार नाही.

■ दत्तप्रसाद शिरोडकर

## भारतीयांचा सुवर्णसाठा ५० हजार टनावर

भारतीय व्यापाऱ्यांची संघटना असलेल्या असोचॅम (द असोसिएटेड चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री ऑफ इंडिया) च्या अहवालानुसार, भारताकडे जगातील पहिल्या १० मध्यवर्ती बँकांपेक्षाही जास्त सुवर्णसाठा आहे. भारतीय कुटुंबातील आणि विविध मंदिरांतील मिळून एकूण सोने ५० हजार टनावर गेले असून त्याची किंमत अंदाजे ८३० लाख कोटी इतकी आहे. भारतीयांकडील असलेल्या सोन्याची ही किंमत अमेरिका आणि चीन वगळता जगातील कोणत्याही देशाच्या वार्षिक जीडीपीपेक्षाही अधिक आहे.भारतातील ९५टक्क्यांहून अधिक महिलांना सोन्याचे आकर्षण आहे. मंगळसूत्र, कानातील बुगड्या यासारख्या शेकडो प्रकारच्या सोन्याच्या दागिन्यांनी भारतीय स्त्रियांना पुरातन काळापासून भुरळ घातली आहे. तसेच सोने ही एक सुरक्षित मालमत्ता आणि गुंतवणूक मानली जाते. तसेच मंदिरात भाविकांकडून मोठ्या प्रमाणात सोने अर्पण केले जाते. त्यामुळे आपल्या देशात दागिन्यांच्या रूपात मोठ्या प्रमाणात सुवर्णसाठा झाला आहे. दुसरीकडे वर्ल्ड गोल्ड काउंसिलच्या आकडेवारीनुसार मध्यवर्ती बँकांतील सुवर्णसाठा लक्षात घेतला तर अमेरिका या यादीत अग्रस्थानी असून अमेरिकेकडे सर्वाधिक ८१३३ टन सोने आहे.या यादीत भारत जगात ८ व्या क्रमांकावर असून भारताच्या अधिकृत सरकारी तिजोरीत ८८०.३ टन सोने आहे.

■ प्रदीप मोरे

## नियमांचा धाक हवाच

रस्ते अपघातात दुचाकीस्वारांचे प्रमाण सुमारे ५७ टक्के असल्याचे समोर आले. ही बाब गंभीर तर आहेच. वर्षभरात सुमारे पाच लाख जणांवर कारवाई करण्यात येऊनही परिस्थितीत बदल नाही याचाच अर्थ निष्काळजीपणा, कायद्याचा न राहिलेला धाक दिसून येतो. नियम भंग करणाऱ्यांवर अधिकाधिक कठोर कारवाई होणे आवश्यक असून जेणेकरून पुन्हा ते नियम भंग करण्यास धजावणार नाहीत असा नियम हवा. जेव्हा पोलिसांच्या सिट्टीचा धाक आणि कायद्याचा वचक प्रस्थापित होईल तेव्हा आपोआपच हे प्रमाण कमी होईल.

■ विश्वनाथ पंडित

महासत्ता हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक वसंतराव कृष्णाजी दत्तवाडे यांनी तरुण आर्टस् ॲन्ड प्रेस, गट नं. ४४४/२/३-ए , महासत्ता चौक, इचलकरंजी येथे छापून इचलकरंजी, सांगली, कराड व सातारा येथील कार्यालयातून प्रसिद्ध केले. आर.एन्.आय.रजि.नं. ६३११९/९४ मुख्य कार्यालय:'मँचेस्टर भवन' ४४४ /२/३-ए, महासत्ता चौक, इचलकरंजी-४१६११५. , दूरध्वनी क्रं.-०२३०-२४३४३४५ संपादकीय विभाग,२४३४३४३ जाहिरात विभाग, फॅक्स क्र. २४३५५११. विभागीय कार्यालय- मुंबई -दूरध्वनी क्र. २२६२४५६० , पुणे - दूरध्वनी २४४९१०६०, सातारा दूरध्वनी क्र. २३३४०१. कराड -दूरध्वनी क्र. २२४५६४ , इस्लामपूर- २२४११९., सांगली - दूरध्वनी क्रं.२३७३७५५.✻ कोल्हापूर - दूरध्वनी क्रं. २५४५४०१ , गडहिंग्लज - दूरध्वनी क्र.२२२९४९., निपाणी- दूरध्वनी क्रं.२२२१६५., चिकोडी दूरध्वनी क्र.२७३०३१. टीप- पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी जाहिरात प्रतिनिधी श्री. दि. पा. मोमीन यांचेवर राहील. मा. संपादक किंवा व्यवस्थापकीय संपादक यांचेवर रहाणार नाही.

# सखोल मतदार यादी निरीक्षणात गांभीर्याने सहभाग नोंदवा

## कागल येथील मेळाव्यात मंत्री हसन मुश्रीफ यांचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांना आवाहन

कागल,ता.१३(प्रतिनिधी)-

**मतदान याद्यांची सखोल निरीक्षण म्हणजेच एस.आय. आर. मोहीम सुरू आहे.यामध्ये राष्ट्रवादीच्या सर्वच पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी जागरूकपणे व गांभीर्याने सहभाग घ्यावे.एकही पात्र मतदार यादीबाहेर राहणार नाही यासाठी गावनिहाय, प्रभागनिहाय बैठका घेऊन काटेकोर नियोजन करा,असे आवाहन वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी केले.**

या मोहिमेत २०२४ च्या मतदार यादीत ज्यांचे नाव आहे, त्यांचे नाव २००२ च्या मतदार यादीत असणे आवश्यक आहे. २००२ च्या याद्यांमध्ये नावे नसल्यास त्याबाबतचे योग्य ते पुरावे गोळा करा. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने विकसित केलेल्या सॉफ्टवेअरचा वापर करावा. याबाबत काही शंका आणि अडचणी असल्यास तात्काळ संपर्क साधा, असेही ते म्हणाले.

कागलमध्ये मतदार यादी सखोल पुनरीक्षण, पदवीधर मतदार नोंदणी, गोकुळ दूध संघ, पी. एम. सूर्यघर मोफत वीज योजना, मुख्यमंत्री बळीराजा पाणंद / शेत रस्ते योजना याबाबत आयोजित पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या व्यापक बैठकीत मंत्री श्री.मुश्रीफ बोलत होते.

भाषणात श्री.मुश्रीफ पुढे म्हणाले,येणाऱ्या ग्रामपंचायत निवडणुकीत जास्तीत जास्त सरपंच राष्ट्रवादी काँग्रेसचे निवडून येतील यासाठी कार्यकर्त्यांनी लक्ष केंद्रीत करावे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सूर्यघर योजनेचा लाभ घराघरात पोहोचवण्याचे उद्दिष्ट असल्याचे सांगून मुश्रीफ म्हणाले,सबंध जिल्ह्याचे घरगुती वीजबिल शून्यावर आणण्याचा माझा संकल्प आहे. या योजनेसाठी जिल्हा बँकेमार्फत कर्ज उपलब्ध करून दिले जाणार आहे. जिल्ह्यातील प्रत्येक घरापर्यंत ही योजना पोहोचवण्यासाठी



**कागल: येथील राष्ट्रवादी काँग्रेस कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात बोलताना मंत्री हसन मुश्रीफ व्यासपीठावर इतर प्रमुख मान्यवर.**

कार्यकर्त्यांनी सक्रियपणे काम करावे.

मंत्री श्री.मुश्रीफ म्हणाले, कागल विधानसभा मतदारसंघातील सर्वच पाणंद आणि शेत रस्ते पूर्ण करण्यासाठी मी प्रयत्नशील आहे. मुख्यमंत्री बळीराजा पाणंद/शेत रस्ते करण्यामध्ये कागल, गडहिंग्लज व उत्तूर विधानसभा मतदारसंघ सबंध राज्यात अग्रेसर ठरेल. जिल्हा बँकेचे संचालक प्रताप उर्फ भैय्या माने म्हणाले, एसआयआर प्रक्रिया सुरू असून त्याकडे गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे.

यावेळी विवेक जकाते यांनी एस. आर. आय. बाबत मार्गदर्शन केले. जिल्हा परिषद अध्यक्षा सौ. शिल्पाताई खोत यांनीही मनोगत व्यक्त केले.यावेळी जिल्हा परिषद अध्यक्षा सौ.शिल्पाताई खोत, जिल्हा परिषद सदस्या श्रीमती शोभाकाकी फराकटे, सौ. सुवर्णा कांबळे, सौ. शैलजा पाटील, शिरीष देसाई, आजरा पंचायत समितीच्या सभापती सौ.जयश्री गाडे, कागल पंचायत समितीच्या उपसभापती डॉ. इंद्रजीत पाटील, पंचायत समिती सदस्या सौ. सुवर्णा जाधव, दीपक सोनार, सौ.रुपाली आंगज, सौ.सुनीता देसाई, विकास चोथे यांचे सत्कार झाले. कागल तालुका विद्यार्थी राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षपदी तेजस चौगुले व उपाध्यक्षपदी गौरव बोभाटे यांना निवडीचे पत्र देण्यात आले. भरमु जाधव, सौ.मंगल आरबोळे, अरुण गवळी, बसवराज आरबोळे, उत्तम कांबळे यांच्यासह उदय देसाई, विलास देशपांडे, सचिन पाटील आदींनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला.

यावेळी वसंतराव धुरे, रणजीत पाटील, सतीश पाटील, राजेखान जमादार, गडहिंग्लजचे नगराध्यक्ष तुरबतमठ, सविता माने, जि.प. सदस्या शोभाताई फराकटे, इंद्रजीत पाटील, चंद्रकांत गवळी, शशिकांत खोत, प्रकाश गाडेकर यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते उपस्थित होते. स्वागत प्रवीण काळबर यांनी तर प्रास्ताविक भैय्या माने यांनी केले.

### एकाच कवळ्यात फोटो काढूया........

समरजीतसिंह घाटगे यांच्या भाजप प्रवेशावर भाष्य करताना श्री. मुश्रीफ म्हणाले, परवाच त्यांनी भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केलेला आहे. त्यांना मी शुभेच्छाही दिलेल्या होत्या.अनेक चॅनेल आणि मुलाखतींमध्ये त्यांनी माझे दिलदारपणाने कौतुकही केलेले आहे. त्यांनी मुख्यमंत्र्यांना भेटून दोघांनी एकमेकांना कवळ्यात घेतल्यानंतरसुद्धा त्यांचा मला फोन आला होता. मी त्यांना सांगणार आहे, मुख्यमंत्र्याबरोबर माझा, त्यांचा आणि माजी आमदार संजयबाबा घाटगे असा चौघांचा एका कवळ्यात घेतलेला फोटो काढूया.माजी खास.संजय मंडलिकही आले तरी त्यांनाही सोबत घेऊन या तालुक्याचा सर्वांगसुंदर विकास करूया.

## शिव-बसव, डॉ.आंबेडकर जयंतीत साऊंड सिस्टिम वापरावर बंदी-गौडर

निपाणी,ता.१३(प्रतिनिधी)-

**बेळगाव जिल्हा पोलिस अधीक्षकांच्या आदेशानुसार सर्वत्र साऊंड सिस्टिमवर बंदी घालण्यात आली. सण, समारंभ, विविध जयंतींच्या निमित्ताने करण्यात येणाऱ्या मिरवणुकांमध्ये मोठ्या आवाजात साऊंड लावल्याने त्याचा वृद्ध नागरिक, महिला, रुग्णांवर परिणाम होत आहे.**



ही बाब गांभीर्याने घेऊन शिव-बसव आणि डॉ.आंबेडकर जयंती कार्यक्रमाच्या मिरवणुकीत साऊंड सिस्टिम लावण्यावर बंदी घालण्यात आली आहे. नियमांचे उल्लंघन केल्यास संबंधित मंडळांवर कारवाई करण्यात येईल, असा इशारा चिकोडीचे पोलिस उपाधीक्षक गोपाळकृष्ण गौडर यांनी दिली. येथील शहर पोलिस ठाण्याच्या कार्यालयात आयोजित बैठकीत ते बोलत होते.पोलिस उपअधीक्षक गौडर म्हणाले,याबाबत शहरातील साऊंड सिस्टिमवाल्यांची बैठक घेतली असून, त्यांनाही आवश्यक सूचना दिल्या आहेत.

## चिकोडी सीएलई संस्थेचा ९९.५४ टक्के निकाल

चिकोडी,ता.१३(प्रतिनिधी)-

**येथील सीएलई संस्थेच्या पदवीपूर्व कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाने बारावी परिक्षेत ९५.५४ टक्के घवघवीत यश मिळवून प्रगती केली असल्याची माहिती संस्थेचे संचालक मल्लिकार्जुन कवटगीमठ यांनी दिली. ते संस्थेच्या सभागृहात आयोजित बैठकीत बोलत होते.**

कवटगीमठ पुढे म्हणाले, बारावी परीक्षेसाठी ४३९ विद्यार्थी होते. त्यापैकी ४३७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. ३८८ विद्यार्थ्यांना विशेष श्रेणीत यश मिळाले आहे. तर ५३ विद्यार्थी प्रथम उत्तीर्ण झाले आहेत. कला शाखेत ७१ पैकी ७१ विद्यार्थी उत्तीर्ण होऊन शंभर टक्के निकाल दिला आहे. लक्ष्मी कवटगीमठ ५८५ (९७.५), सृष्टी नाईक व प्रियंका निडसोशी प्रत्येकी ५७३ (९५.५), आणि आनंद हरके ५६६ (९४.३३) गुण मिळवून अनुक्रमे क्रमांक पटकावले.वाणिज्य शाखेत १४८ पैकी १४८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. सानिका बस्ते ५८८ (९८), अनदेशा नागटाण ५८५(९७.५), स्नेहा कळींगे ५८२ (९७) गुणासह अनुक्रमे क्रमांक मिळवला. विज्ञान शाखेत २२० पैकी २१८ विद्यार्थी उत्तीर्ण होत ९९.०९ टक्के निकाल लागला.विनय दोड्डमनी ५८८ (९८), अर्पिता बबलेश्वर ५८५ (९७.५), शुभम नाईक ५६९ (९४.८३) गुणासह क्रमांक मिळवले. या उत्तम यशाबद्दल संस्थेचे सचिव जगदीश कवटगीमठ यांनी विद्यार्थी व शिक्षकांचे विशेष अभिनंदन केले. यावेळी प्राचार्य प्रशांत कोंडेबिट्टू यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते.

## कारदग्यात आजपासून बाळूमामांचा वार्षिक भंडारा उत्सव

ढोणेवाडी,ता.१३(प्रतिनिधी)-

**येथे श्री.संत सद्गुरु बाळूमामा यांचा वार्षिक भंडारा उत्सव मंगळवार ता.१४ रोजी सकाळी ११ वाजता बंगाली रोड, वैद्य गल्ली, कारदगा येथे कै.चंदुलाल शेठजी (अकोळ) यांचे चौथे वारस पणतू परेश रमाकांत शहा यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होत आहे.**

ता.१४ रोजी सकाळी ६ वाजता अभिषेक,११ वाजता आरती झाल्यावर सद्गुरु बाळूमामा वालूग मंडळ, कारदगा यांचा वालूग कार्यक्रम, रात्री ८ वाजता श्री महालक्ष्मी महिला भजनी मंडळ यळगुड यांचे भजन सेवा होणार आहे.ता.१७ रोजी अमावास्या निमित्त बाळुमामा मंदिरात सकाळी श्रींच्या पादुकांना व मूर्तीस अभिषेक, प्रा.डॉ.एम.पी.पाटील महाराज कावणेकर यांचे प्रवचन,सामूहिक महाआरती,भजन सेवा व महाप्रसाद त्यानंतर गौरव टोपे,अजित शिंदे, रोहन कुंभार यांचे संगीत भजन झाल्यानंतर श्री कल्लेश्वर भजनी मंडळ यांची भजन सेवा होणार आहे.

# अथणी,कागवाड तालुक्यात पीक विम्याचे प्रस्ताव नाकारले

### कृषी अधिकारी निंगाण्णा बिरादार यांची माहिती

अथणी,ता.१३(वार्ताहर)-

**पंतप्रधान पीक विमा योजनेअंतर्गत २०२४-२५ च्या पावसाळी आणि उन्हाळी हंगामासाठी अथणी आणि कागवाड तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांचे पीक विमा प्रस्ताव नाकारण्यात आल्याचे उघड झाले आहे.**



अथणी तालुक्यात पावसाळी हंगामात ९४३ प्रस्ताव नाकारण्यात आले, तर कागवाड तालुक्यात ३२३ प्रस्ताव नाकारण्यात आले. असे समजले आहे की, उन्हाळी हंगामात एकूण ५७ प्रस्ताव नाकारण्यात आले,अशी माहिती कृषी अधिकारी निंगाण्णा बिरादार यांनी दिली.

पीक विमा नोंदणी तपशील आणि पीक सर्वेक्षण डेटा यांच्यातील तफावतीमुळे हे प्रस्ताव नाकारण्यात आले,असे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे. नाकारलेल्या शेतकऱ्यांची यादी अथणी तालुका सहायक कृषी संचालक कार्यालय आणि अथणी, अनंतपूर, तेलसंगा व कागवाड येथील शेतकरी संपर्क केंद्रांच्या सूचना फलकांवर प्रसिद्ध करण्यात आली आहे.या संदर्भात काही आक्षेप असल्यास शेतकऱ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह पुढे यावे, असे अधिकाऱ्यांनी सांगितले आहे.

पीक नोंदणीची पहाणी (उत्तर), आधारभूत किंमत लाभाची पावती आणि कृषी उत्पन्न बाजार समितीमधील विक्रीची कागदपत्रे सादर करणे अनिवार्य आहे.आक्षेप सादर करण्याची अंतिम तारीख २४ एप्रिल असून,अथणी तालुका कृषी सहाय्यक संचालक निंगाण्णा बिरादार यांनी एका प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे की, कागदपत्रांसह अर्ज त्या तारखेपर्यंत संबंधित कार्यालयांमध्ये सादर करावेत.

# शिक्षणाचे खाजगीकरण हा व्यवस्थेचा चलाख डाव

### डॉ.आनंद मेनसे

मुरगूड,ता.१३(प्रतिनिधी)-

**'राज्यघटनेचा जयजयकार आणि शिक्षणाचे खाजगीकरण हा व्यवस्थेचा चलाख डाव भविष्यात भारतामध्ये मनुस्मृतीची विषमतेवर आधारित समाज उभी करण्यास सहाय्यभूत ठरेल,'असा इशारा प्राचार्य डॉ.आनंद मेणसे यांनी दिला.**

समाजवादी प्रबोधिनी, मुरगूड यांच्या वतीने आयोजित भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मृती व्याख्यानमालेत ''मनुमृती दहन व चवदार तळ्याच्या सत्याग्रह'' दुसरे पुष्प प्राचार्य डॉ.आनंद मेनसे यांनी गुंफले.



अध्यक्षस्थानी मुरगूडचे माजी नगराध्यक्ष नामदेवराव मेंडके हे होते.प्रारंभी ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांना मौन पाळून आदरांजली वाहण्यात आली.प्रमुख वक्ते डॉ.आनंद मेनसे यांनी आपल्या व्याख्यानात सध्याच्या सामाजिक व शैक्षणिक व्यवस्थेवर परखड भाष्य केले.स्वागत व प्रास्ताविक समीर कटके यांनी केले तर आभार बी.एस.खामकर यांनी मानले. याप्रसंगी राजू आमते, सुहास खराडे, शिवाजी चौगले,कॉ.बबन बारदेस्कर, डी.डी.चौगले, एम.टी.सामंत,शरद कुलकर्णी, कीर्तीकुमार जोशी, निखिल वाली, विजय सापळे, सचिन सुतार,राजेश व्हनबट्टे, बाळासाहेब फर्नांडिस, महादेव वागवेकर,सखाराम सावर्डेकर, विश्वनाथ शिंदे,मनाजी सासने, एम. बी. कांबळे, गणपतराव मांगोरे, सर्जेराव अवघडे आदी उपस्थित होते.

## साईनाथ मल्टिस्टेटचा २२८ कोटी ठेवींचा टप्पा पूर्ण-उत्तम जाधव

राशिवडे,ता.१३(प्रतिनिधी)-

**विश्वासु ठेवीदार, सभासदांच्या पाठबळावर साईनाथ मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीने मार्च २०२६ अखेर उत्कृष्ट आर्थिक कामगिरी करत १ कोटी २७ लाखांचा ढोबळ नफा मिळविला आहे. तर २२८कोटींच्या ठेवींचा ही टप्पा पूर्ण केला असल्याची माहिती अध्यक्ष उत्तम जाधव यांनी दिली.**

ठेवीदारांनी संस्थेवर दाखविलेल्या विश्वासामुळे साईनाथच्या विश्वासार्हतेवर शिक्कामोर्तब झाले आहे.ते पुढे म्हणाले की, संस्थेच्या एकूण ठेवी रु.२२८ कोटींच्या पार गेल्या असून, संस्थेची प्रगती वेगाने होत आहे. संस्थेने सुमारे ९१.५ कोटींची गुंतवणूक केली आहे तसेच १४९.३ कोटींचे सुरक्षित कर्ज वितरण करण्यात आले आहे. गेल्या आर्थिक वर्षात संस्थेची एकूण आर्थिक उलाढाल सुमारे रु.४८३ कोटी इतकी झाली आहे. सध्या संस्थेमध्ये २०० हून अधिक पतसंस्था व इतर संस्था सभासद म्हणून जोडल्या गेल्या असून, त्यांना उत्कृष्ट सेवा देण्याचा संस्थेचा प्रयत्न सुरू आहे आणि यापुढेही अधिक दर्जेदार सेवा पुरविण्यात येणार आहेत. संस्थेच्या यशामध्ये मोलाचे योगदान देणाऱ्या सर्व संचालक, कर्मचारी, हितचिंतक आणि सभासदांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले. भविष्यातही संस्था अशाच प्रगतीपथावर वाटचाल करत राहील,असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# शाहू, फुले, आंबेडकरांच्या विचारांची पुस्तके नव्या पिढीने वाचली पाहिजेत-धुमे

गारगोटी,ता.१३(प्रतिनिधी)-

**दोनशे वर्षांपूर्वी शेतकऱ्यांच्या ज्या परिस्थितीचे वर्णन महात्मा फुलेंनी केले होते, त्यात आजही फारसा फरक नाही.जीवनाची दिशा दाखवणारी फुले,शाहू ,आंबेडकर यांच्या विचारांची पुस्तके नव्या पिढीने वाचली पाहिजेत,अशी अपेक्षा सुभाष धुमे यांनी शाहू वाचनालयात बोलताना व्यक्त केली.**

म.जोतिबा फुले यांच्या २०० व्या जयंतीनिमित्त पुरोगामी विचार मंचच्यावतीने व्याख्यानाचे आयोजन केले होते.या व्याख्यानात धुमे बोलत होते. अध्यक्षस्थानी डॉ.सुभाष देसाई हे होते. यावेळी डॉ.सुभाष देसाई यांनी मनोगत व्यक्त केले.

शाहू वाचनालयाचे कार्यवाह टी.बी.पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. मराठा सेवा संघाचे विश्वशाहीर परिषदेचे अध्यक्ष डॉ.राजीव चव्हाण यांनी महात्मा फुले यांच्यावरचा बहारदार पोवाडा सादर



**गारगोटी येथे महात्मा जोतिबा फुले यांच्या जयंती निमित्त व्याख्यानात बोलताना सुभाष धुमे, बाजूस डॉ.राजीव चव्हाण व इतर मान्यवर.**

केला.यावेळी लक्ष्मण शेडगे, विजय शेडगे, सुरेश खोत, डॉ.पांडुरंग गिरी, डॉ.जास्वंदा गिरी, नंदकुमार मोरे, एन.जी.कल्याणकर, धनंजय देसाई, कृष्णा भारतीय, पी.एल.कांबळे, कॉ.राम कळंबेकर व अनेक प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. के.के.भारतीय यांनी आभार मानले.

## पट्टणकोडोली येथे महिला क्रिकेट स्पर्धेचे आयोजन

पट्टणकोडोली,ता.१३(प्रतिनिधी)-

**महिला खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी आणि त्यांच्या कौशल्यांना व्यासपीठ उपलब्ध करुन देण्यासाठी पट्टणकोडोली येथील श्री बिरदेव एज्युकेशन सोसायटीतर्फे गुरुवार ता.२३ ते शनिवार ता.२५ एप्रिल अखेर अनंत विद्यामंदिर या शाळेच्या मैदानावर महिला क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.**

या स्पर्धेत सर्व संघांनी नोंदणी केल्या आहेत. स्पर्धेसाठी साखळी पद्धतीने सामने खेळवले जाणार आहेत. विजेत्या व उपविजेत्या संघांना आकर्षक पारितोषिके व सहभागी खेळाडूंना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येणार आहे.

## आदमापूर येथे हरिनाम सप्ताहास प्रारंभ

मु.तिट्टा,ता.१३(प्रतिनिधी)-

**क्षेत्र आदमापूर (ता.भुदरगड )येथील ग्रामदैवत श्री हनुमान देवस्थान येथे अंखड हरिनाम महासप्ताहास मोठ्या धार्मिक वातावरणात सुरुवात झाली आहे.**

या महासप्ताह प्रसंगी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले आहे.यामध्ये प्रवचन,किर्तन,भजन व सकाळी ७ ते ११ यावेळेत ज्ञानेश्वरी ग्रंथाचे पारायण व बाळुमामांच्या विजय ग्रंथाचे वाचन होते.या ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्यात महिला-पुरुष व युवक भाविकभक्तांची उपस्थिती असते.ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्यात वर्षानुवर्षे ज्ञानेश्वरी ग्रंथ वाचकांची संख्या वाढते आहे.यावर्षी ५५ वाचकांनी या पारायण सोहळ्याप्रसंगी उपस्थिती दर्शविली आहे.



तोरणहळी:येथील मारुती मंदिराला भेट देताना मंत्री हसन मुश्रीफ व इतर मान्यवर.

## तोरणहळी मारुती मंदिराला मंत्री हसन मुश्रीफ यांची भेट

चिकोडी,ता.१३(प्रतिनिधी)-

**विधान परिषद सदस्य प्रकाश हुक्केरी व आम.गणेश हुक्केरी यांनी तोरणहळी भागाचा सर्वांगीण विकास केला आहे.तोरणहळी श्री मारुती मंदिराच्या विकासासाठी हुक्केरी पिता पुत्रासोबतच मी देखील हातभार लावल्याची माहिती महाराष्ट्र राज्याचे मंत्री हसन मुश्रीफ यांनी दिली.त्यांनी तालुक्यातील तोरणहळी येथील श्री मारुती देवस्थानाला भेट देऊन बोलत होते.**

ते म्हणाले आम.गणेश हुक्केरी व आम.प्रकाश हुक्केरी यांनी तोरणहळी मंदिराच्या निर्मितीसाठी व शनी मंदिराच्या उभारणीसाठी भरीव निधी दिला आहे. या मंदिराच्या विकासात त्यांचा मोठा वाटा आहे.या जागृत मंदिराला कर्नाटक महाराष्ट्र राज्यातील अनेक भक्त येत असतात. मला देखील या मंदिरामुळे चांगला अनुभव आला आहे.अनेक संकटातून श्री मारुतीने पार केले आहे.त्यामुळे प्रत्येक अमावस्या व महत्त्वाच्या दिवशी भेट देऊन दर्शन घेतो.या मंदिरात दीपस्तंभासाठी मी वैयक्तिक ३० लाख रुपयांचा निधी दिला असून त्याचे बांधकाम सुरू असल्याचे नामदार मुश्रीफ यांनी सांगितले. यावेळी कुमार पाटील, बसवराज माळगे, किशोर पवार यांच्यासह देवस्थान कमिटीचे पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

## भक्तीनेच भगवंताला जाणून घेता येते-साठे महाराज

कोगनोळी,ता.१३(प्रतिनिधी)-

**संसारावरील प्रेम काढून देवाला प्रेम अर्पण करायचं. शुद्ध प्रेम देवाला आवडते. सर्वस्व प्रेम देवाला अर्पण करणं हिच खरी भक्ती होय. भक्तीनेच भगवंताला जाणून घेता येते असे विचार बोरवडे (ता.कागल) येथील विनायक साठे महाराज यांनी व्यक्त केले.**

कोगनोळी (ता.निपाणी) येथील मुरलीधर मंदिरामध्ये श्री सद्गुरु पूर्णानंद महाराज यांच्या द्विजन्मशताब्दी महोत्सवानिमित्त आयोजित किर्तन सेवेत ते बोलत होते.

याप्रसंगी हरिदास आंबी यांनी मृदंगसाथ केली. सतिश काजवे (निपाणी),शिवाजी यादव (हणबरवाडी), सुरदास गायकवाड महाराज, शाम पाटील, मुकुंद वठारे आदींनी गायनसाथ केली.यावेळी उद्धव काजवे महाराज, शाहीर संभाजी माने, भरतेश शिंदे, प्रकाश कागवाडे, बिरु कोळेकर, संभाजी जगदाळे, राजू वठारे, सुतार-वरणगेकर यांच्यासह कोगनोळी पंचक्रोशीतील वारकरी व भाविक उपस्थित होते.

# भारतीय जनता पार्टीच्या विचारांची समाजाला खरी गरज

## नाथाजी पाटील; व्हनाळी येथे निवासी कार्यशाळा संपन्न

साके,ता.१३(वार्ताहर)-

**भारतीय जनता पार्टी हा सामाजिक विचारांचा पक्ष आहे. कार्यकर्ता हा पक्षाचा कणा आहे. प्रशिक्षणार्थी कार्याची वैशिष्ट्ये हि एक सक्षम समाज घडवण्यास मदत करते. निस्वार्थीपणे संघटन करून पक्षाची विचारधारा घेऊन काम करणारा हा पक्ष आहे. म्हणूनच भारतीय जनता पार्टीच्या विचारांची आज समाजाला खऱ्या अर्थाने गरज असल्याचे प्रतिपादन भाजपचे जिल्हाध्यक्ष नाथाजी पाटील यांनी केले.**

व्हनाळी (ता.कागल) येथे आयोजित पंडित दिनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान अंतर्गत दोन दिवसीय निवासी कार्यशाळेच्या समारंभात ते बोलत होते.अध्यक्षस्थानी माजी आम.संजयबाबा घाटगे हे होते. गोकुळचे संचालक अंबरीषसिंह



**व्हनाळी (ता.कागल) येथे भारतीय जनता पार्टी निवासी कार्यशाळेस मार्गदर्शन करताना जिल्हा अध्यक्ष नाथाजी पाटील समोर उपस्थित जनसमुदाय.**

घाटगे,शाहू ग्रुपचे अध्यक्ष समरजितसिंह घाटगे,अखिलेशराजे घाटगे, बाजार समितीचे चेअरमन नानासो कांबळे, जि.प.सदस्या सुयशा घाटगे, जि.प.सदस्य काकासो सावडकर, सभापती सुवर्णा पाटील,तानाजी कुरणे, प.स.सदस्य दतात्रय दंडवते, भुषण पाटील,दिग्विजय पाटील प्रमुख उपस्थित होते.

नाथाजी पाटील पुढे म्हणाले, भाजप पक्षाची विचारधारा जनसामान्यांसमोर येणे आवश्यक आहे. केंद्र आणि राज्य सरकारच्या लोककल्याणकारी योजनांचा लाभ शेवटच्या घटकांपर्यंत पोहचवण्या साठी सदस्यांनी सक्रिय राहावे. वर्षभर सामाजिक उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन त्यांनी केले.या निवासी कार्यशाळेत विविध सत्रांचे आयोजन करण्यात आले होते.यामध्ये भारतीय जनता पार्टीचा इतिहास आणि विकास,पंडित दीनदयाळ उपाध्याय मानव एकात्मवाद विचार, सोशल मीडियाचा प्रभावी वापर आणि जनसंपर्क,केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी योजनांची माहिती शिवाजी बुवा, महेश जाधव, डॉ.विनायक परूळेकर, रणजित मुडूकशिवाले यांनी दिली. या निवासी कार्यशाळेची सुरुवात राष्ट्रगीताने करण्यात आली तर समारोप वंदे मातरम गीताने करण्यात आला.

या कार्यशाळेस विजया निंबाळकर,डॉ.सी.के.चौगले, सुनिता घराळ, स्नेहल पाटील, पंडित दंडवते, संजय पाटील,राघु हजारे,दिलीप कडवे, रणजित मुडूकशिवाले, उत्तम पाटील,सुरेश मर्दाने, शरद पाटील, ज्ञानदेव पाटील आदी उपस्थित होते. स्वागत मंडळ अध्यक्ष अमर पाटील यांनी केले.सुत्रसंचालन सागर लोहार यांनी तर आभार महावीर पाटील यांनी मानले.

### निधन वार्ता

## तुकाराम देवेकर

कूर,ता.१३(प्रतिनिधी)-

बसरेवाडी (ता.भुदरगड) येथील कै.तुकाराम बसु देवेकर (वय ८८) यांचे निधन झाले.



त्यांच्या पश्चात मुलगा, सूना, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने परिसरातून हळहळ व्यक्त होत आहे.

## शिवाजी पाटील

कोगनोळी,ता.१३(प्रतिनिधी)-

सुळगाव येथील रहिवाशी शिवाजी दौलू पाटील (वय ५५) यांचे निधन झाले.



त्यांच्या पश्चात पत्नी,दोन मुले, मुलगी, सून, नातवंडे, जावई असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने परिसरातून हळहळ व्यक्त होत आहे.

# छोट्या जाहीराती

**पहिल्या पंधरा शब्दास ७५ रू, पुढील प्रत्येक शब्दास ७ रू, शब्द मर्यादा ५० पर्यंत**

## * खरेदी विक्री *

**बिटल जातीचे बोकड** व गाबन शेळी विकणे आहे. आझादनगर, तारदाळ. संपर्क–९९७५७०८१६५

**कबनूरमध्ये** रूई रोड, लक्ष्मी मंदिरलगतच, कांचन इंगवले रेसिडेन्सीमध्ये प्रांत ऑर्डर असलेले १२००, १४००, २४०० स्क्वे. फूटचे प्लॉटस् विकणे. संपर्क–९८९०९०४७५३, ८८३००२०१४५

**शेड विकणे–** ७२X३० (२२०० स्क्वे. फूट) स्टेशन रोड, व्यंकटेश कॉलनी, हनुमान मंदिरमागे, जवाहरनगर, इचलकरंजी. संपर्क–९८५०९४९०८०

**तिळवणी,** मुकबधीर विद्यालयसमोर आतील **२** DF रोडला ४२०० SF शेती ले–आऊट झालेला रिकामा प्लॉट अर्जंट देणे आहे. किंमत– रू. ६५० Plsf. 9922242565

**चालू स्थितीतील कॅफे** सेटअपसहित त्वरीत विकणे आहे. शहराच्या मध्यभागी सुंदर बागेजवळ, इचलकरंजी. संपर्क–९०२८७५११९३

**माणकापूर–कसनाळ** गावालगत इचलकरंजीपासून ७ किमी अंतरावर १० गुंठे प्लॉट, लाईट, पाणी, रस्ता, कंपौंडसहीत १४ लाखात विकणे आहे. संपर्क–९२७०१३३६७७

**टू बीएचके फ्लॅट विकणे आहे.** ग्राऊंड फ्लोअर १ नं. फ्लॅट, मँचेस्टर प्लाझा, संजय गांधीनगर, सांगली नाका. संपर्क–९४२२४२५४४१.

**जुने व नवीन पॉवरलूम** घेऊ व देऊ, तसेच फवारा कांडीमशिन डक्टींग घेऊ व देऊ. संपर्क–८३१७२९१००८

**१८३० स्क्वेअर फूट एनए जागा** विकणे आहे. जुना चंदूर रोड, गणेश गल्ली, इचलकरंजी. संपर्क–९९६०८५८९८२

## * व्यवसाय *

**घर बसल्या व्यवसाय करा.** ऑनलाईन/ऑफलाईन प्रॉडक्ट मार्केटिंग, पॅकिंग करा मशीन रॉ मटेरियल घ्या, महिना चांगले इन्कम. ८२०८००१७२०

## * शैक्षणिक *

**डिप्लोमा इन फॅशन–** डिझायनिंग ३ व ६ महिने १ वर्ष ड्रेस, ब्लाऊज मेकिंग कोर्स ज्योती फॅशन डिझायनिंग इन्स्टीट्युट. मो. ८३२९३९२९२३

## * आरोग्य विषयक *

**मानसिक आजार–** व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या, स्किझोफ्रेनिया, बायपोलर, मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ.सी.डी. मंत्राचाळेपणा. इ. मानसिक आजारसाठी दारू, तंबाखू, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री. इ. व्यसनमुक्तीसाठी शिघ्रपतन, नपुंसकता, विर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिंक समस्यांसाठी व वृध्द लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रूषा केंद्र व नातेवाईकांशिवाय ॲडमिट करण्याची सोय. निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज (सांगली) संपर्क–८०८३६०८०८३, ९९२२६४६५६६

## * विवाहविषयक *

**आजच लग्न करून घ्या,** सर्व समाजाचे २ लाखाहून अधिक स्थळे उपलब्ध. लग्न तुमचे मध्यस्थी आमची. रवी चव्हाण सर व्हॉटसअप–७८४१८९४३५३

**मॅरेज ब्युरो डॉट कॉम,** कोल्हापूर आमची वैशिष्ट्ये महाराष्ट्रातील नंबर एक विवाह कंपनी, सर्व जाती धामियांसाठी भरपूर स्थळे, ४ लाखाहून अधिक तुमच्या जवळील स्थळे वयानुसार, शिक्षणानुसार, अपेक्षेनुसार, फिल्टर उपलब्ध, लग्न होईपर्यंत सहकार्य केले जाईल. सिमीत कालावधीची अट नाही. संपर्क–संजीवनी चौगुले–९६६५३७४४५४ (नाव नोंदणी मार्फत)

## * नोकरी विषयक *

**पिझ्झा आऊटलेटमध्ये** किचन टिम मेंबर हवे आहेत. अनुभवींना प्राधान्य. संपर्क–७२७६११७३९०, ८४२१४०८१९७

**महिला** Project Assistant आवश्यक पात्रता Graduate Ms. Word ज्ञान चांगला टायपिंग स्पीड काम Data Entry Sampling कालावधी. ३ महिने (Half Day) मानधन रू. ४०००/ – प्रति महिना. संपर्क–९९२२६१०५७९

**घरकामासाठी** अनुभवी मावशी पाहिजे. वेळ– स. १० ते सायं. ७, आकर्षक पगार, संपर्क–८९५११८७३२२, ९८२२०६९५००

**पाहिजेत.** फिनिश कापड चे सँपल फोल्डर तयार करणेसाठी अनुभवी पार्ट टाईम किंवा फूल टाईम लेडीज/जेंटस पाहिजेत. कापड मार्केट, इचलकरंजी. संपर्क–९२८४०३७५०१

**कामगार पाहिजे.** वाळू डेपोमध्ये कामगार पाहिजे. संपर्क–९६२३१७७४४५

**ड्रायव्हर पाहिजे.** घरगुती कामासाठी अनुभवी निर्व्यसनी ड्रायव्हर पाहिजे. संपर्क–९०९६१९१०७१, ८९९९०५७७२९

**इलेक्ट्रीशियन पाहिजेत.** इलेक्ट्रीकल कंट्रोल पॅनल वायरिंगसाठी आयटीआय इलेक्ट्रीशियन पाहिजेत. आकर्षक पगार (अनुभवावर आधारित) संपर्क–सिंकव्होल्ट इलेक्ट्रीक, यड्राव. ८४४६३१५१३१

**नामांकित फांड्रीमध्ये** हेल्पर आवश्यक. ८ तास ड्युटी मिळेल– जागा १०, आठवडा पगार. पत्ता– लक्ष्मी इंडस्ट्रिज, हातकणंगले. फोन–९३२५७८४०४७

**नामांकित कंपनीमध्ये** CNC/VMC ऑपरेटर पाहिजेत. जागा २+२=४ एकूण. पीएफ+ईएसआयसी+बोनस सुविधा उपलब्ध. संपर्क–८४२१४०८९९४, इचलकरंजी.

**फूड कंपनीमध्ये** प्रोडक्शन आणि क्वॉलिटीसाठी अनुभवी बी. टेक फूड टेक्नॉलॉजी कॅडीडेट हवा आहे. तसेच ऑफिस कामासाठी रिसेप्शनिस्ट पाहिजे. कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक. सुरेखा मार्केटिंग, राजमाने हायस्कूलजवळ, रूई. संपर्क–७७४४८३८३३४

**वर्कशॉपमध्ये** कामगार भरती चालू आहे. VMC ऑपरेटर–४, टर्नर–२, हेल्पर–३, महिला–२. फूल/पार्ट टाईम, आकर्षक पगार. संपर्क–८३२९१०४२२३, ९८३४१८१०१६, विक्रमनगर, जवाहर सायझिंगजवळ, इचल.

**व्हीएमसी ऑपरेटर,** वर्कशॉप सुपरवायझर जॉब इन्स्पेक्टर लेथ मशिन व ड्रील मशिनवर कामगार पाहिजेत. अमेय इंडस्ट्रिज, शहापूर–इचलकरंजी. ९७६५४०९३९७

**युपीव्हीसी विंडो मार्केटिंगसाठी** अनुभवी मार्केटिंग एक्झीक्युटिव्ह पाहिजेत. संपर्क–श्री विंडो टेक, फोन–९१७२९८९६७१

**साध्या सायझिंगसाठी** खरड दिवाणजी–१, वार्पर–२, बॅकसायझर–२ पाहिजेत. संपर्क–९६६५७०९३७७, ९०११७३५३८४

**कामगार पाहिजे.** मार्केटिंग ऑर्डर व डिलेव्हरीसाठी इचलकरंजी व हातकणंगले तालुक्यासाठी अनुभवी सेल्समन हवा आहे. गरजूंनी संपर्क साधावा. ९४०३५०७२९२

**पेट्रोल पंपावर** पेट्रोल व डिझेल सोडण्यासाठी कामगार पाहिजे. नदीवेस नाका, इचलकरंजी. मो. ९३५६६७०७४६, ९५४५४८४३१७

**मिल स्टोअर्स दुकानात** अनुभवी शिकाऊ कामगार पाहिजे. नारायण पेठ, इचलकरंजी. संपर्क–९७६२२६८९९३, ९४२२०४३७४३

**अनुभवी सिक्युरिटी गार्ड पाहिजे.** पार्वती/खंजीरे इंडस्ट्रिज–१० वी / १२ वी, डे–नाईट, वय–२५ ते ५०. फोन–९४२३२८४८३३, ८२०८५०५४७२

**रेडिमेड कापड दुकानामध्ये** शिकाऊ किंवा अनुभवी सेल्समन पाहिजेत. आकर्षक पगार, नटराज ड्रेसेस, शॉपिंग सेंटर, इचलकरंजी. ८५५२००३२६४

**बारमध्ये कामासाठी** शिकाऊ किंवा अनुभवी कामगार पाहिजे. पेठवडगाव येथे रहाणेची + जेवणाची सोय. संपर्क–८३२९९५९१२१

**हेल्पर पाहिजेत.** हेल्पर कामासाठी पुरूष/मुले कामगार पाहिजेत. वय–१८ ते ५०, शिक्षण– १० वी, १२ वी झालेले, लिहायला–वाचायला येणे आवश्यक. प्रत्यक्ष भेटा. पत्ता– विन्सर वर्क वेअर, नाईट कॉलेजजवळ, इचलकरंजी. संपर्क–९८८१७५६०५२

**सेल्समन पाहिजेत.** मंडप डेकोरेशन शोरूममध्ये सेल्समन कामासाठी मराठी, कन्नड भाषा येणारे, संभाषण कौशल्य आवश्यक. B.Com, BBA, Tally Operating. प्रत्यक्ष भेटा. पत्ता– विन्सर वर्क वेअर, नाईट कॉलेजजवळ, इचलकरंजी. मो. ९८२२५४३९४३

**स्टोअर किपर पाहिजेत.** स्टोअर किपर कामासाठी कमीत कमी २ वर्ष अनुभव, टॅली येणे आवश्यक. B.Com, BBA, B.A. प्रत्यक्ष भेटा. पत्ता– विन्सर वर्क वेअर, नाईट कॉलेजजवळ, इचलकरंजी. मो. ९८८१७५६०५२

**नामांकित कंपनीमध्ये** कामगार व वेल्डर पाहिजेत. मुले, आकर्षक पगार, पीएफ+ईएसआयसी सुविधा. शिक्षणाची अट नाही. संपर्क–९६५७१४१०५८, ८६५७१७१७१७

**रेडिमेड कापड दुकानसाठी** अनुभवी/शिकाऊ लेडीज/जेंटस सेल्समन पाहिजे. महालक्ष्मी कापड दुकान, हत्ती चौक, इचलकरंजी. ९८५०८५८६०२

**कपड्याच्या दुकानात** अनुभवी सेल्समन पाहिजे. आकर्षक पगार व कमिशन दिले जाईल. संपर्क–८३९०५३४१४३

**ऑफिस क्लार्क –** १२ वी पास मुलगा/मुलगी स्थानिक संगणकीय ज्ञान. भेटा– आनंदी गॅस एजन्सीज, मंगलमुर्ती टॉकीजसमोर, इचलकरंजी.

**ऑफिस कामासाठी** मुली पाहिजेत. १२ वी, ग्रॅज्युएट संपर्क–९३५६०४८५६०

**पाहिजेत.** नवजीवन डेअरी व बेकरीसाठी मार्केटिंग मॅनेजर–०१ जागा, ड्रायव्हर व सेल्समन २ जागा. मार्केटिंग एक्झीक्युटिव्ह BBA/ MBA- २ जागा. टेलीकॉलर– १ जागा. ९६५७०२८८८०

**पाहिजे.** गारमेंटमध्ये प्रोडक्शन आणि क्वॉलिटी चेकिंगसाठी लेडीज सुपरवायझर पाहिजे. शिलाई मशिनचे ज्ञान आवश्यक. स्टेट बँकेजवळ, सांगली नाका. ८४५९२०४०८१, ९७३०७९२६७७

**नामांकित** प्री–प्रायमरीमध्ये शिक्षक आणि मावशी पाहिजेत. (अनुभवींस प्राधान्य) संपर्क–९३५६०४८५६०

**इचलकरंजीमध्ये** पॅथॉलॉजी लॅबसाठी ब्लड कलेक्शनसाठी व लॅब टेक्निशियन हवी आहे. संपर्क–८८९००८३६३६

**बिल्डींग मटेरियल** शोरूममध्ये जेंटस/लेडीज कामगार पाहिजे व कॉम्प्युटर ऑपरेटर लेडीज पाहिजे. संपर्क–९५०४१११७७१, शहापूर.

**साध्या सायझिंग युनिटमध्ये** १ सायझर, २ वार्पर, २ बॅकसायझर, खरड दिवाणजी, १२ माग मलमल क्वॉलिटीवर १२ तास कामगार पाहिजेत. संपर्क–९०११७३५३८४

**फार्मासिस्ट पाहिजे.** अनुभवी– पगार–१००००/– संपर्क–९३२५८४०१४८, इचलकरंजी.

**इलेक्ट्रॉनिक दुकानात** कामाकरिता सेल्समन पाहिजे. अनुभवी किंवा शिकाऊ. मॉडर्न इलेक्ट्रॉनिक्स, सम्राट अशोकनगर, आवळे मैदानशेजारी, इचलकरंजी. ९८९०५४७०७८

**VMC/** लेथ मशिनसाठी कामगार पाहिजे. फूलटाईम/पार्टटाईम चालेल, रात्रीसुध्दा चालेल. ९८५०८६६४४२

**जिंदाल ॲल्युमिनियम ग्लास** कामासाठी हेल्पर कामगार पाहिजेत. खोतवाडी, शहापूर, तारदाळ भागातील लोकांना प्राध्यान्य. पत्ता– यड्राव फाटा, पवनस् हॉटेलजवळ, खोतवाडी. संपर्क–९८८१८६२९१९, ८६६८५११७७८

**कामगार पाहिजे.** प्लंबिंग कामासाठी शिकाऊ/अनुभवी. संपर्क–९५९५७६४८४८, इचलकरंजी.

**पाहिजे.** गोडाऊन डिस्पॅचसाठी अनुभवी दिवाणजी पाहिजे. संपर्क–९०२१६७१६५८

**५ वर्षाचा अनुभव असलेला** निर्व्यसनी अनुभवी ड्रायव्हर पाहिजे. संपर्क–वर्धमान हौसिंग सोसायटी, महावीर जैन मंदिरसमोर, रांवका सदन, इचलकरंजी. भेटणेची वेळ– दु. ३ ते ७

**इचलकरंजी व सांगलीमध्ये** प्युअर व्हेज रेस्टॉरंटसाठी पार्टटाईम/फुलटाईम वेटर आणि शिकाऊ कामगार पाहिजे. संपर्क–८४८४००२२८९, ७०५७४७०२१७

**ज्वेलरी शोरूममध्ये** कॉम्प्युटर ऑपरेटर, काऊंटर सेल्समन+सेल्सगर्ल सुशिक्षित बी.कॉम शिक्षण, आकर्षक पगार+बोनस आपल्या संपूर्ण माहितीसाठी त्वरीत संपर्क करावा. श्री. जिनेंद्र ज्वेलर्स, इचलकरंजी. ९४२१२०३९५१

### त्वरीत पाहिजेत

**नामंकित कंपनीमध्ये मशीन शॉपसाठी**

**प्रोडक्शन सुपरवायझर**

**मेन्टेनन्स सुपरवायझर**

**फायनल इन्स्पेक्टर**

**CNC, VMC, HMC, SPM, DM ऑपरेटर**

**(पगार - अनुभवानुसार मिळेल)**

**१० वी, १२ वी, ITI, DIPLOMA, B.A., B.Com., B.Sc. फ्रेश मुले चालतील**

**9168343462 / 7378652196**

**किराणा दुकानात** पार्टटाईम/फूलटाईम पॅकिंग काम करणेसाठी मुलगा/मुलगी पाहिजे. संपर्क–९९२२८२३२३४, मोरे बझार, येलाज मळा.

**सिकसेम कंपनीमध्ये** ऑफिस कामासाठी मुली पाहिजेत. वय– २० ते ३० शिक्षण १२ वी पुढे. कामाची वेळ– सकाळी ८ ते ६. संपर्क–९९२०९४३८९५, इचलकरंजी.

**Front-End Developer** नेमणे आहे. ASP.NET चे ज्ञान आवश्यक. संपर्क.7776999755, 9822778346

**Fast-Growing** Hospital/ Laboratory Equipment Distributor is looking for the Following Professionals office Coordinator (Female)-01 Position Eligibility. Any Graduate with Relevant Experience or Fresher may apply. Contact-9850333396

**शिकाऊ/अनुभवी** कामगार पाहिजे. संपर्क– अप्सरा ड्रेसेस, शॉपिंग सेंटर, जनता चौक, इचलकरंजी.

**कॉम्प्युटर कामासाठी** व कॉलिंगसाठी मुली पाहिजेत. सहारा एंटरप्राईजेस. संपर्क–९७४३२५५५८०, ९५९५२५७०७०

**पाहिजेत.** स्टोअर असिस्टंट व बिलींग करीता–३, कोणत्याही शाखेचा पदवीधर, अनुभवी, बेकरी मधिल मेंटेनन्सकरिता–३, आयटीआय फिटर/इलेक्ट्रीशियन, अनुभवी बेकरी प्रोडक्शन करीता मुले/महिला अनुभवी. फोन–९७६६२५६६५५

**हॉटेलमध्ये** तंदुरी हेल्पर पाहिजे. संपर्क–९५९५६०४७४७

**पाहिजेत.** शिकाऊ/अनुभवी मुले व वायरमन, टॅली ईआरपी मध्ये काम करणेसाठी अनुभवी अकौटंट पाहिजे. MS. Office ज्ञान आवश्यक. संपर्क–सोसायटी इलेक्ट्रीक–९४२११००५५५, ९९२२९४२४२४

**रेडिमेड कापड दुकानात** सेल्समन हेल्पर पार्टटाईम/फुलटाईम पाहिजेत. आकर्षक पगार+इएसआय+कमिशन. संपर्क–९८६०८०८६८६, ८४८४८९०१३६

**खंजिरे इंडस्ट्रिज प्रोसेसमध्ये पाहिजेत.** १) स्टोअर किपर असिस्टंट–जागा–२. २) ऑफिस बॉय–जागा–१. ३) अकौटंट–जागा–१. संपर्क–७०२०९४३६५०

**१० वी च्या मुलाचे पर्सनल** कोचिंगसाठी शिक्षक हवा आहे. (मराठी मेडियम). संपर्क–९३२६६५५९९३, ८८३०७५३४१४, इचलकरंजी.

**सुवर्णसंधी (Work From Home)** वाढत्या महागाईमध्ये एक्स्ट्रा इन्कम कसे घेऊ शकतो? घरबसल्या कामाची सुवर्णसंधी. नोकरदार, गृहिणी, विद्यार्थी इतर सर्वांसाठी घर, मोबाईल/ऑफिसमधून काम करा. वय १८+ संपर्क–७२७६५६६८६४.

**यड्राव (पार्वती इंडस्टिज)** नामवंत कंपनीत खालीलप्रमाणे जागा भरणे आहे. १) CNC/VMC/HMC Operator (जागा–१०) पगार–१५५०० ते १६०००. २) सुपरवायझर (जागा–३) ३) Setter/Programmer (जागा–२) **४)** Productaion Incharge (जागा–२) **५)** Line Inspector (जागा–५) **६)** Helper (जागा–१०) ७) Office boy (जागा–२) ८) Housekeeping Ladies (जागा–५) वरील सर्व जागा त्वरीत भरणे आहेत. ईएसआयसी, पीएफ व बोनस इतर सर्व सुविधा आकर्षक पगार मिळेल. संपर्क–९१३०३९१९०७, ८७८८३२८२२८

**गाड्यांचे शिट कोचिंग कामासाठी** कामगार पाहिजे. संपर्क–सुरभी कोचिंग, कॅबसन हॉटेलसमोर, स्टेशन रोड, इचलकरंजी. ८९८३९९१८१०, ९७३०३३४६९८.

**वेटर पाहिजे**– पार्ट टाईमसाठी. संपर्क– ८८०६४८४९१९, ९५९५२७४५२७, इचलकरंजी.

**Academic Tellycaller** पाहिजेत अनुभवनींना प्राधान्य. पार्ट टाईम/फुल टाईम पेमेंट ७ हजार ते १२ हजार (On Skills) संपर्क. प्रेरणा अकॅडमी, ९७६२२७०३७०.

**अर्जंट ड्रायव्हर पाहिजे.** कोणतेही शारीरिक व्याधी नसलेला निरोगी, निव्यर्सनी. ज्यांना ऑटो गियर ३० एसयूव्ही सिडान चालवण्याचा अनुभव तसचे पुणे व मुंबई गाडी चालवण्याचा अनुभव असणाऱ्यांनी खालील नंबरवरती संपर्क साधावा. संपर्क– ९१५८९१३६९९.

**शिक्षक पाहिजे–** पाचवी ते दहावीसाठी सेमी इंग्रजी ॲकॅडमीसाठी मॅथ्स, सायन्स, हिंदी, इतिहास–भूगोल विषयासाठी अनुभवी शिक्षक पाहिजेत. संपर्क–९८२२०३७७७८, ९६२३३१९९६६.

**शिकाऊ–अनुभवी** सीएनसी व्हीएमसी ऑपरेटर पाहिजेत. भेटा– इंटू सीएनसी शॉप, दाते मळा, हॉटेल थाळी हाऊसमागे. मोबाईल ९३७०१४३०३५.

**त्वरीत पाहिजेत–** अनुभवी/शिकाऊ LASER M/C OPRETOR, हेल्पर्स–४, शिटमेटल वेल्डर–१, Auto Cad Designer भरणे आहे. भेटा– परफेक्ट लेसर्स, कोरोची, ८७९३५४४४९७, ९३२६१०७६४४

**परमीट रूम व बारसाठी मॅनेजर** व वेटर पाहिजे. संपर्क–७५८८६२०५०५, ९८५०५९६९६५.

**नामांकित कंपनीमध्ये** लिफ्टमधून मालाची/बॉक्सची वाहतूक करणे तसेच बॉक्स उचलणे–ठेवणे व इतर कामासाठी मुले पाहिजेत. पात्रता– १२ वी पास. कामाची वेळ– सकाळी ९ ते १, दुपारी २ ते ७, मो. ७८४१९१३३५५, ८१४९९६२०९१.

**नामांकित फौंड्रीमध्ये कामगार भरती.** १८ इंची टेबल ग्राईंडर ऑपरेटर –५, ४ इंची कटर ऑपरेटर–५, ७ इंची कटर ऑपरेटर–३, हेल्पर – ५, ईएसआय फंड सुविधा. संपर्क–८८३०३२४१३३, ९८२२४४४५७२.

**आयटीआय इलेक्ट्रॉनिक्स** मुले पाहिजेत. युपीएस इन्व्हर्टर मेन्टेनन्ससाठी पगार १५,०००/– पासून पुढे अनुभवीस प्राधान्य. गोमटेश एंटरप्राईजेस–९४२२५८२५१०

**शिकाऊ कामगार पाहिजेत.** पगार १० ते १६ हजार रू. संपर्क–७०२०९४३६६१–किरण कवडे.

**CA फर्ममध्ये** B.Com, I, II, III शिकणारी तसेच संगणक व टॅली ज्ञान असणारी मुली पाहिजेत. t 9326141599@gmil.com

**नामांकित जाहिरात कंपनीमध्ये** लेडीज/जेंटस पाहिजेत. कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक. संपर्क–९८२२६६९५४८, ९८२३९६५००५

**कापड दुकानात कामगार पाहिजे.** पगार–१२ ते १५ हजार. प्रत्यक्ष दुकानात येऊन भेटावे. सुंदर बागेजवळ, जे.पी. संघवी. संपर्क–८८८८८८८२४३, ९४२२४१४३८५

**VMC-** ऑपरेटर, टर्नर व हेल्पर पाहिजेत. फिक्स पगार, १० ते २० हजार. कोरोची. प्रोग्रॅम व सेटींग शिकवले जाईल. संपर्क–९४२३२९०४०७

**जेंटस कामगार पाहिजेत.** टू व्हीलर आवश्यक. संपर्क–९६३१३१६०३०

**पाहिजेत.** इचलकरंजी जनता बँकेजवळ ऑफिस कामासाठी १००+ जागा अर्जंट भरती. वय, शिक्षणाची अट नाही. मुली/महिलांना सुवर्णसंधी. संपर्क–९६६५३७४४५४

**बारमध्ये कामासाठी वेटर** व साफसफाईवाला पाहिजे. समक्ष भेटा. मो. ९७६७४९९५४०, इचलकरंजी.

**डॉमिनोज पिझ्झा** डिलेव्हरी बॉय पाहिजे. आकर्षक पगार, ड्रायव्हिंग लायसन आवश्यक. संपर्क–८३९०३६१११४, ७८४१०५४१०८

**झोले बझार कबनूरमध्ये** नोकरीची संधी, सॉफ्टवेअर डेटा एंट्री व अनुभवी सेल्स स्टाफ आणि मॅनेजर हवेत. संपर्क–९५५२१२२३४५, ८६८६१२२३४५

**कॅफेमध्ये कामासाठी** मुले पाहिजेत. संपर्क–हेवन पिझ्झा, सुंदर बागेजवळ, इचलकरंजी. फोन–९८२२५८०५६६, ८५३०३९५९६०

**कोरोचीमधील नामांकित अकॅडमीमध्ये** ५ वी ते १० वी वर्गासाठी सर्व विषयासाठी शिक्षक भरणेचे आहे. संपर्क–७०२०४६९०२५

**पार्वती–शहापूर, तारदाळ** इंडस्ट्रिज करिता सिक्युरिटी गार्ड भरती ८ तास, १२ तास. संपर्क–९८५०९४५२२६, ९५११७५९६७६

## * भाड्याने देणे/घेणे *

**३ खोल्या सिमेंट पत्रा** असलेली भाड्याने देणे. (फक्त फॅमिलींसाठी) जवाहरनगर, इचलकरंजी. संपर्क–९९६०६२२४०८

**पहिल्या मजल्यावर** ६०० स्क्वे. फूट हॉल भाड्याने देणे आहे. नारायण पेठ, इचलकरंजी. संपर्क–९७६२२६८९९३, ९४२२०४३७४३

**ऑफिसकरिता** ८०० स्क्वे. फूट जागा भाड्याने देणे आहे. इंडस्ट्रियल इस्टेट, ईदगाह मैदान मागे. संपर्क–७२१८१२१११७, इचलकरंजी.

**३ बीएचके** सर्वसोयीनियुक्त भाड्याने देणे. इंदिरा कॉलनी, कोळी डॉक्टर दवाखान्याजवळ, दगडी पाण्याच्या टाकी शेजारी, कबनूर. संपर्क–९२७०७४५६१२

**गाळा भाड्याने देणे.** शाहू कॉर्नर, सेवा लॉजसमोर, इचलकरंजी. फोन–८०८७४४२०८७

**भाड्याने देणे.** ४५० स्क्वे. फूट दुमजली, दवाखाना, हॉटेल इ. साठी उपयुक्त इमारत/नारायण टॉकीज, मोरे डेंटल क्लिनिकसमोर, इचलकरंजी. फोन–९८९०९६१४५०, ९५१८९०९३८८

**सर्व सोयीनियुक्त** मोक्याच्या ठिकाणी नदीवेस नाकारोड, रेणुका मंदिरशेजारी ३८०० स्क्वे. फूट जागेत १८०० स्क्वे. फूट बांधकामसहित हॉटेलसाठी (शाकाहारी) किंवा अन्य व्यवसायासाठी भाड्याने देणे आहे. संपर्क–८६६८६२०९२३, ९३५६१९२०७५

**१ बीएचके** भाड्याने देणे आहे. सांगली रोड, टीव्हीएस शोरूममागे, संभव रेसिडेन्सी, संपर्क–७४४७६५७६७६, ९६०४६१७७८४

**सर्व सोयीनियुक्त** पूर्णपणे फर्निचर, २४ तास पाणी असलेला २ बीएचके फ्लॅट भाड्याने देणेचा आहे. पत्ता– श्री. बिल्डींग, भोने माळ, हॉटेल मेघदूतशेजारी, इचलकरंजी. संपर्क– समीर–९८३४६७८२३०

**गाळे भाड्याने देणे.** शहापूर चौकाजवळ, हॉटेल, कोणत्याही कामासाठी उपयुक्त. प्रशस्त गाळे, पार्किंगसह. संपर्क–९९७५५७२७२१

**घर गहाणवट देणे.** तांबे माळ कॉर्नर, इचलकरंजी येथे २ बीएचके सर्व सोयीनियुक्त भेटणेची वेळ– ४ ते ६. संपर्क– ९०२८९०८८५२

**भाड्याने देणे.** बेसमेंटमधील १०X १६ चे २ गाळे रोडटच भाड्याने देणे. डॉ. साखरपे रोड, डॉ. पठाणजवळ, इचलकरंजी. ९९२१२९९३२३

**आतील बाजूस** असलेले आरसीसी हॉल, ऑफिस कामासाठी भाड्याने देणे आहे. तीनबत्ती चार रस्ता चौक, शाहू हायस्कूल रोड, इचलकरंजी. फोन–७३८५९००९०९

**जनता बँकेपासून** जवळच आरसीसी २०० स्क्वे.फूट सर्व सोयीनींयुक्त दुकानगाळा, ऑफिस किंवा व्यवसायासाठी भाड्याने देणे. आर. पी. रोड, पद्मा लॉंड्री, बिरदेव बँकेजवळ, इचलकरंजी. ७२४९४९०९६२.

**दुकानगाळा भाड्याने देणे** चांदणी चौक, गावभाग इचलकरंजी. मोक्याच्या ठिकाणी १ मोठा व १ लहान दुकानगाळे. संपर्क –९५७९५७४६१९.

**गोडाऊन भाड्याने देणे.** १५७० स्क्वे. फूट संडास बाथरूम पोटमाळा ऑफिस सर्व सोयीनियुक्त तीनबत्ती चौक, इचलकरंजी. फोन–८६६८५१०९९१

**१ बीएचके** फ्लॅट भाड्याने देणे– शाकाहारी कुटुंबासाठी. सर्व सोईनीयुक्त, कापड मार्केटच्या मागे, इचलकरंजी. भगतसिंग बागेजवळ, ८६६८५१०९९१.

**खोल्या भाड्याने देणे.** तारदाळ–संगमनगर, पार्वती इस्टेटसमोर, इचलकरंजी. ९१७२७१७१११

## * बोअरवेल *

**राज बोअरवेल–** आमच्याकडे ४।।। व ६।। इंची बोअरवेल तसेच आर्थिंगची कामे माफक दरात काम मिळेल. ९६०४०३५६८७, ९४२०३५३६८७

**श्री साई बोअरवेल–**आमच्याकडे योग्य दरात बोअर मारून मिळेल. ४१/२'' व ६''. ९९२२७७२०३६, ९८८१३५५८१३.

## * यात्रासहल *

**१० मे काशी,** आयोध्या, प्रयागराज, वैष्णोदेवी, वाघाबॉर्डर, अमृतसर, दिल्ली, नेपाळसह बसने २२ दिवस कोजागिरी ट्रॅव्हल्र्स–९४०३९५३४१२, ९४२०५९२५२४

**ओम गणेश ट्रॅव्हलर्स–** चारधाम यात्रा काशी, नेपाळ, आयोध्यासह ५ मे, ३० दिवस प्रवास, निवास–भोजनासह ३०,५००/– संपर्क–नंदकुमार शिंदे, मोठे तळे, इचलकरंजी. मो. ९८८१३४६६५४

## * कर्ज विषयक *

**कर्ज प्रकरण कितीही** ह्रअडचणीतील व कितीही कोटीचे असलेतरी कर्ज प्रकरण केले जाईल. फोन दुपार २ नंतर करणे. मो. ७७९८७५७७६६

## * बांधकाम *

**वॉटर प्रुफिंग तोडफोन न करता** टेरेस, भिंतीला ओल लिकेजस् वॉटरप्रफिंगची कामे मटेरियल मजुरीसह खात्रीने करून मिळेल. संपर्क–७९७२९३४८२१, इचलकरंजी.

## वाचकांसाठी निवेदन

**दै.महासत्ता** वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द होणाऱ्या खरेदी–विक्री, नोकरीविषयक, भाड्याने देणे–घेणे, कर्ज, गुंतवणूक, व्यवसाय, आरोग्य विषयक व इतर सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहीरातदाराने दिल्यानुसार प्रसिध्द केला जातो. प्रत्येक जाहीरातीच्या आशयाची सखोल शहानिशा करणे शक्य नसल्यामुळे यातील कोणत्याही माहितीच्या सत्यतेबाबत **दै.महासत्ता** व्यवस्थापन हमी घेऊ शकत नाही. याची वाचकांनी नोंद घ्यावी. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पुर्ततेसंदर्भात कोणतीही जबाबदारी **दै.महासत्ता** वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक अथवा मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया नोंद घ्यावी. **व्यवस्थापक**

# हुतात्मा कारखान्यात कोणताही आर्थिक गैरव्यवहार नाही :पाटील

वाळवा,ता.१३(वार्ताहर)–

**पद्मभूषण क्रांतिवीर डॉ.नागनाथअण्णा नायकवडी हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्याचा कारभार चोख असून कारखान्यात कोणताही आर्थिक गैरव्यवहार नाही, असे कारखान्याचे कार्यकारी संचालक शिवाजी पाटील यांनी सांगितले.**

ते म्हणाले, कारखान्यातील साखर निर्मिती, साखर विक्रीची, मोलॅसिस निर्मिती व त्याच्या वापराची व साखर गोडाऊन मधील साखर साठयाची वेळोवेळी मालतारण कर्ज देणाऱ्या बँकेकडून व संबंधीत शासकीय विभागाकडून तपासणी होत असते. साखर निर्मिती, साखर साठा व डिस्टीलरीकडे वापरल्या जाणाऱ्या मोलॅसिसचे रेकॉर्ड चोख आहे. ऊसाचा दर व साखरेचा विक्री दर यामध्ये मोठी तफावत रहात असल्याने साखर कारखानदारीचा आर्थिक मेळ बसत नाही. साखर उद्योग हा आर्थिक संकटातून मार्गक्रमण करत आहे हे सर्वश्रुत आहे. राज्यातील साखर उद्योगा पुढील समस्या संदर्भात मुख्यमंत्री यांनी २४ मार्च २०२६ रोजी आयोजित बैठकीत सरकारने ५०० रुपये प्रति टन अनुदान द्यावे, कारखान्याच्या कर्जांचे दीर्घकालीन पुनर्गठन करून त्यास २ वर्षाचा विलंबअवधी आणि १० ते १२ वर्षाचा परतफेड कालावधी करावा. तसेच गेल्या ८ वर्षात ७ वेळा एफआरपी वाढली. एफआरपीमध्ये २६ टक्के वाढ झाली. याउलट ३१०० रुपये असलेल्या एमएसपीमध्ये वाढ झालेली नाही. एफआरपी दर हा साखरेच्या विक्री दराशी निगडित असावा, जेणेकरून साखरेच्या एम एसपीमध्ये व एफआरपीमध्ये तफावत राहून कारखान्यांना आर्थिक तोटे सहन करावे लागणार नाहीत. त्यावर मुख्यमंत्री यांनी मुख्य सचिवांना साखर उद्योगाला आर्थिक मदत देण्यासंदर्भातील प्रश्नाचा अभ्यास करण्यासाठी राज्यस्तरीय समिती स्थापन करण्याचे निर्देश दिले आहेत. कारखान्याने घेतलेले कर्ज हे एफआरपीप्रमाणे ऊस दर देण्यासाठी, तोडणी वाहतुकीची रक्कम व इतर देणी देण्यासाठी वापरलेले आहे. कारखान्याचे कर्जाचे हप्ते नियमित असून कर्जाचा कोणताही हप्ता थकीत नाही. लेखा परिक्षकांच्या अहवालावर कारखाना व्यवस्थापन आपली बाजू प्रादेशिक सह. संचालक साखर यांच्या समोर मांडून त्यांच्या आक्षेपांचे निरसन करेल.

# बायोमेट्रीक हजेरीसाठी दंडवत आंदोलन

शिरगाव ता. १३ (प्रतिनिधी ) –

**राधानगरी तालुक्यात ग्रामपंचायत स्तरावर बायोमेट्रीक हजेरी प्रणाली लागू करावी, या मागणीसाठी गेले अनेक वर्षे शासन व पंचायत समिती प्रशासनालो निवेदन देण्यात आली. मात्र आजपर्यंत संबधित अधिकाऱ्याकडून कोणताही ठोस निर्णय घेण्यात आलेला नाही. या पार्श्वभूमीवर प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी सोमवारी जनकल्याण फौंडेशनचे राज्य सदस्य अतुल पाटील यांनी दंडवत आदोलंन केले.**

तालुक्यातील स्वयंभू देवालय (घोटवडे) येथून सकाळी १० वाजता या दंडवत यात्रेला अतुल पाटील यांनी सुरुवात केली. घोटवडे, कौलव, बरगेवाडी, सिरसे, आमजाई व्हरवडे, आवळी बुद्रुक, आणाजे, खिंडी व्हरवडे, गुडाळ, कसबा तारळे, पिरळ मार्गावरून अतुल पाटील रणरणत्या उन्हात दंडवत घालत सायकांळी राधानगरी पंचायत समिती कार्यालयात पोहचले. दरम्यान, या आंदोलनादरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून आरोग्य विभाग व पोलीस प्रशासनाचे कर्मचारी उपस्थित होते.ग्रामविकासाचा कणा असलेल्या ग्रामपंचायतीच्या कामकाजात पारदर्शकता व शिस्त निर्माण व्हावी. यासाठी ग्रामपंचायत स्तरावर बायोमेट्रीक हजेरी प्रणाली अत्यावश्यक आहे. या संदर्भात शासनाला व स्थानिक प्रशासनाला अनेकदा लेखी निवेदन देण्यात आली. प्रशासनाने हजेरी प्रणाली लागू करण्याचे आश्वासन दिले. मात्र अद्याप अमंलबजावणी केलेली नाही. त्यामुळे सामान्य जनतेच्या हितासाठी हे आंदोलन करावे लागले असे अतुल पाटील यांनी सांगितले.

**विशेषत: धार्मिकेतून देव –देवतांना दंडवत घातले जातात. मात्र सामान्य जनतेच्या प्रश्नासाठी भर उन्हातून दंडवत यात्रा काढण्याची ही बहूधा पहिलीच घटना असेल. त्यामुळे ज्या मार्गावरून दंडवत यात्रा काढण्यात आली. त्या – त्या गावात हा चर्चेचा विषय बनला.**

# कृषी उत्पन्न बाजार समितीच्या तीन संचालकांबाबत अहवाल मागविला

कोल्हापूर ता.१३ (प्रतिनिधी)–

**कोल्हापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मालकीच्या इमारतीतील जागा नातेवाईकांना भाडेकरारावर दिल्याच्या तक्रारीनंतर जिल्हा उपनिबंधक कार्यालयाने संबंधित तीन संचालकांच्या बाबत वस्तुस्थिती अहवाल तातडीने सादर करण्यांचे आदेश जिल्हा उपनिबंधक निळकंठ करे यांनी बाजार समितीचे सभापती व सचिवांना दिले आहेत.**

बाजार समितीच्या इमारतीतील दुसऱ्या मजल्यावरील सुमारे ४५०० चौरस फूट जागा संचालक सुयोग वाडकर, शेखर देसाई आणि भारत पाटील यांनी आपल्या नातेवाईकांच्या नावावर भाडेकराराने दिल्याचा आरोप आहे. या संदर्भात शिवसेना ठाकरे गटाचे उपनेते संजय पवार आणि सहसंपर्कप्रमुख विजय देवणे यांनी ९ एप्रिल रोजी जिल्हा उपनिबंधक कार्यालयाकडे तक्रार दाखल केली होती.

संबंधित संचालकांनी पदाचा गैरवापर केल्याचा आरोप असून, महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी–विक्री अधिनियमाच्या तरतुदीनुसार त्यांच्यावर फौजदारी कारवाई करून अपात्र ठरविण्याची मागणी करण्यात आली आहे. या तक्रारीनंतर जिल्हा उपनिबंधक करे यांनी तातडीने बाजार समिती प्रशासनाकडून संपूर्ण माहिती मागवली आहे.

दरम्यान संचालक शेखर देसाई यांनी आरोप फेटाळत सांगितले की, तत्कालीन सभापती सूर्यकांत पाटील यांनी शेतकरी, व्यापारी व संबंधित घटकांसाठी माफक दरात राहण्याची व जेवणाची सुविधा उपलब्ध करून देण्याची घोषणा केली होती. त्याच अनुषंगाने दुसऱ्या मजल्यावरील जागा कायदेशीर प्रक्रियेनुसार भाडेकराराने देण्यात आली आहे. या जागेचा वापर शेतकरी व व्यापाऱ्यांच्या सोयीसाठीच होणार असून सर्व प्रक्रिया नियमांनुसार पार पडल्या असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# शिराळ्यात गोरक्षनाथ यात्रा उत्साहात

**शिराळा,ता.१३ (प्रतिनिधी)–**

**'जय जय राम कृष्ण हरी'च्या अखंड गजरात गोरक्षनाथ यात्रेला यंदा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. सांगली, सातारा, कोल्हापूर जिल्ह्यांतून भाविकांच्या दिंड्या मोठ्या संख्येने दाखल झाल्याने परिसर भक्तिमय वातावरणाने न्हाऊन निघाला. पहाटेपासूनच दर्शनासाठी भाविकांच्या लांबलचक रांगा लागल्या होत्या.**



गोरक्षनाथ मंदिरात विधिवत पूजा, अभिषेक व आरती झाली. पारंपरिक वाद्यांच्या गजरात आणि टाळ-मृदुंगाच्या निनादात भाविकांनी नामस्मरण करत दर्शन घेतले. दिंड्यांमधून आलेल्या वारकऱ्यांनी भजन-कीर्तनाद्वारे वातावरण अधिकच भारावून टाकले.गोरक्षनाथ यात्रेमुळे स्थानिक व्यापारालाही मोठी चालना मिळाली असून, सर्वत्र उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे.

# कृष्णा नदीत बुडून मुलाचा मृत्यू

**कराड,ता.१३(प्रतिनिधी) –**

**कराड तालुक्यातील शेरे स्टेशन परिसरात १६ वर्षीय मुलाचा सोमवारी कृष्णा नदीत पोहताना बुडून मृत्यू झाला. समर्थ नामदेव कलसकर (वय १६, रा. शेरे स्टेशन, ता. कराड) असे त्या मुलाचे नाव आहे.**

मिळालेली माहिती अशी की, समर्थ कलसकर हा आपल्या मित्रांसोबत गावाजवळील कृष्णा नदीत पोहण्यासाठी गेला होता. दुपारी ३.३० वाजण्याच्या सुमारास तो पाण्यात उतरला असताना अचानक खोल पाण्यात गेल्याने त्याचा तोल जाऊन तो बुडाला.घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी तत्काळ नदीपात्रात शोधकार्य सुरू केले. काही वेळातच समर्थला बाहेर काढण्यात आले. मात्र त्यावेळी तो बेशुद्ध अवस्थेत होता. त्याला नदी काठावर आणून तपासले असता तो मृत झाल्याचे स्पष्ट झाले.

# खटाव तालुक्यातील सात ग्रा.पं.ची शंभर टक्के कर वसुली

**वडूज,ता.१३ (प्रतिनिधी)–**

**मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाच्या अनुषंगाने अनेक स्तरावर खटाव पंचायत समितीतर्फे उपक्रम राबविण्यात आले. सर्व विभागांशी संदर्भात विकासाचा विचार करून जनजागृती देखील करण्यात आली.**

शासन प्रशासन आणि समाज यांच्या समन्वयातून मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान यशस्वी होण्यासाठी काटेकोर प्रयत्न खटाव पंचायत समितीकडून करण्यात येत आहेत. या अंतर्गत खटाव तालुक्यातील सात ग्रामपंचायतींनी शंभर टक्के कर वसुली केली आहे. त्याच शिंदेवाडी, नवलेवाडी, फडतरवाडी बुध, काळेवाडी, अनपटवाडी, पांगरखेड या ग्रामपंचायतींचा समावेश आहे.

सदर वसुलीसाठी सरपंच व ग्रामपंचायत अधिकारी तसेच विस्तार अधिकारी माधव बोईनवाड यांनी वारंवार पाठपुरावा केला. खटाव पंचायत समितीचे गटविकास अधिकारी योगेश कदम यांनी वेळोवेळी मार्गदर्शन करून शंभर टक्के वसुली करण्यासाठी प्रयत्न केला.

कर भरणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य असून विकासासाठी तो एक भक्कम पाया आहे. उत्कृष्ट लोकशाही आणि चहूबाजूंनी विकास होण्यासाठी नागरिकांनी वेळेवर कर भरावा आणि ग्रामपंचायतीला सहकार्य करावे.

गावांच्या विकासासाठी ग्रामपंचायत सदैव कटिबद्ध आहे. त्यासाठी पंचायत समिती, जिल्हा परिषदेच्या मार्गदर्शनाखाली अहोरात्र काम करीत असल्याचे बीडीओ योगेश कदम यांनी सांगितले.

# अक्षयतृतीयेला बालविवाह होणार नाही याची दक्षता घेण्याचे आवाहन

**कोल्हापूर,ता.१३ (प्रतिनिधी)–**

**अक्षयतृतीया हा मुहूर्त शुभ मानला जात असल्याने ग्रामीण तसेच शहरी भागात या दिवशी छुप्या मार्गाने बालविवाह होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे १९ एप्रिल रोजी जिल्ह्यात कुठेही बालविवाह होणार नाही यासाठी विशेष दक्षता घेण्याचे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी सुहास वाईंगडे यांनी केले.**

भारतीय कायद्यानुसार विवाहासाठी मुलाचे वय २१ वर्षे आणि मुलीचे वय १८ वर्षे पूर्ण असणे बंधनकारक आहे. यापेक्षा कमी वयात विवाह केल्यास तो बालविवाह प्रतिबंध अधिनियम २००६ नुसार बेकायदेशीर ठरतो. या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी ग्रामीण भागात ग्रामसेवक, तर शहरी भागात बाल विकास प्रकल्प अधिकारी हे बालविवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. तसेच गावागावातील सरपंच, पोलीस पाटील आणि अंगणवाडी सेविका यांनी सतर्क राहून विवाहापूर्वी वधू-वरांचे वय तपासणे आवश्यक आहे. बालविवाह लावणे हा दखलपात्र गुन्हा असून, या प्रकरणात केवळ पालकांवरच नव्हे तर विवाह सोहळ्यात सहभागी होणारे वऱ्हाडी, भटजी, वाजंत्री, मंगल कार्यालय चालक तसेच मंडप चालक यांच्यावरही गुन्हे दाखल होऊ शकतात. दोषींना दोन वर्षांपर्यंत सश्रम कारावास आणि पाच लाख रुपये दंडाची शिक्षा होऊ शकते. जिल्हा बालविवाहमुक्त करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर कारवाई करण्यात येत असून, संशयास्पद विवाहाची माहिती तात्काळ चाईल्ड हेल्पलाईन १०९८ किंवा पोलीस विभागाचा टोल फ्री क्रमांक ११२ वर द्यावी. माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल, असेही जिल्हा महिला व बाल विकास कार्यालयामार्फत सांगण्यात आले आहे.

# चिमुकल्यावर पिटबुल श्वानाचा हल्ला

**सांगली, ता. १३(प्रतिनिधी )–**

**त्रिकोणी बागेजवळ खेळत असलेल्या सात वर्षाच्या मुलावर पिटबुल जातीच्या श्वानाने हल्ला केला. यामध्ये ऋतुराज भोसले हा जखमी झाला. हल्ल्यानंतर ऋतुराज याला सिव्हील हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल केले.**

कायदेशीरदृष्ट्या नवीन पिटबूल पाळणे किंवा विकत घेण्यावर शासनाने बंदी घातली आहे.सांगलीत काही श्वानप्रेमीकडे पिटबूल आहे. अशाच एका मालकाकडील पिटबूलने त्रिकोणी बागेजवळ सोमवारी सायंकाळी खेळत असलेल्या ऋतुराज याच्यावर हल्ला केला. त्यामुळे तो घाबरून ओरडला. ऋतुराजच्या दोन्ही डोळ्यांच्या मध्यभागी कपाळाजवळ तसेच डोळ्याच्या बाजूला खोलवर जखम झाली. तत्काळ पिटबूलला बाजूला केल्यामुळे ऋतुराज बचावला. सिव्हील हॉस्पिटलमध्ये डॉक्टरांनी तत्काळ त्याच्या जखमेवर उपचार केले. सिव्हील प्रशासनाने पोलिसांना हा प्रकार कळवला.त्यामुळे संबंधित पिटबुल मालकावर गुन्हा दाखल होण्याची शक्यता आहे.

# भाजी विक्रेत्यावर खुरप्याने हल्ला

**सांगली, ता. १३( प्रतिनिधी)–**

**शिवी दिल्याचा जाब विचारल्याच्या कारणावरुन संशयिताने एका भाजी विक्रेत्यावर खुरप्याने हल्ला केला. यामध्ये कुमार बळवंत पाटील (वय ३७, रा. विघ्नहर्ता कॉलनी, हरिपूर रस्ता, सांगली) हा जखमी झाला.**

ही घटना रविवारी सकाळच्या सुमारास हरिपूर येथे घडली. कुमार पाटील यांना संशयित सचिन तानाजी हेगडे (वय ३७, विघ्नहर्ता कॉलनी, हरिपूर) याने शिवीगाळ केली होती. त्याचा जाब पाटील यांनी विचारला असता संशयित हेगडे याने त्याच्या हातातील खुरप्याच्या सहाय्याने पाटील यांच्या उजव्या हाताच्या बोटावर वार केला. यामध्ये ते जखमी झाले.त्यांच्यावर उपचार करण्यात येत आहेत. पोलिसांनी सचिन हेगडे याच्यावर सांगली ग्रामीण पोलीस ठाण्यात मारहाणीचा गुन्हा दाखल केला आहे.

# घरासमोर लावलेली दुचाकी लंपास

**सांगली,ता.१३(प्रतिनिधी)–**

**मिरज तालुक्यातील हरिपूर येथील एका घरासमोर लावलेली दुचाकी चोरट्याने लंपास केल्याची घटना सोमवारी उघडकीस आली.**

याप्रकरणी दिपक सचिन जाधव (रा. पिंगळे मैदान, हरिपूर) यांनी सांगली ग्रामीण पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. दिपक जाधव यांनी त्यांची दुचाकी ( एमएच १० ईसी ५८०३) त्यांच्या घरासमोर लावली होती. चोरट्याने कोणाचे लक्ष नसल्याचे पाहून दुचाकीचे कुलूप तोडून ती लंपास केली असल्याचे फियोदित म्हटले आहे. पोलिसांनी चोरट्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.


## जाहीर नोटीस

१) ता. हातकणंगले पैकी मौजे खोतवाडी येथील गट नं. १०५, क्षेत्र हे . १.६१ आर, पो. ख. क्षेत्र हे .०.०४आर,आकार रू २.५० पैसे यापैकी बिगरशेती भुखंड नं. ६ चे क्षेत्र २७८.८१ चौ. मी . ची खुली मिळकत यांसी चतु:सिमा पुर्वेस :- भुखंड नं. ५ ची मिळकत, पश्चिमेस :- भुखंड नं. ७ ची मिळकत, दक्षिणेस :- श्री भगाटे यांची मिळकत व उत्तरेस :- २० फुटी रस्ता - येणेप्रमाणे चतुः सिमेतील खूली भुखंड मिळकत . २) वरील मिळकत ही ''श्री जुगल शिवनारायण बुब'' यांचे मालकी वहीवाटीची असून त्यांनी वरील मिळकतीबाबत आमच्या अशिलांशी संचकारपत्र करून संचकार दाखल रक्कम स्विकारलेली आहे. ३) सबब, सदरील मिळकतीवर कोणाचाही, कोणताही हक्क करार, तारणगहाण दस्त, बक्षिस, वारसा हक्क, कोर्ट केसेस वगैरे हक्कसंबध असतील तर तो त्यांनी सदरील नोटीस प्रसिध्द झालेपासून सात (७) दिवसांच्या आत खालील पत्त्यावरती लेखी कागदपत्रासह कळवावे. म्हणुन दिली जाहीर नोटीस सही ता . १२.०४.२०२६.

**अ‍ॅड. पंकज आ. पाटील**

**ऑफीस – ''श्री दत्त अपार्टमेंट'', गाळा नं. १, सांगली नाका, इचलकरंजी**
**मो. न. ९०२१२३७६८७**

## जाहीर नोटीस

१) ता. हातकणंगले पैकी मौजे खोतवाडी येथील क. ग.नं. ९० याचे क्षेत्र हे . ३.३३.० आर, पो.ख. क्षेत्र हे . ०.१२ आर, आकार रू ५-२० पैसे यापैकी बिगरशेती झालेला भुखंड नं. २२ चे क्षेत्र ९५.० चौ. मी . मिळकत व यावरती उभी असलेली बांधीव घर मिळकत. यांसी चतु:सिमा पुर्वेस :- भुखंड नं. २३ ची मिळकत, पश्चिमेस :- भुखंड नं. २१ ची मिळकत, दक्षिणेस :- भुखंड नं. ५९ ची मिळकत व उत्तरेस :- २० फुटी रस्ता येणेप्रमाणे चतु:सिमेतील बांधीव घर मिळकत . २) वरील मिळकत ही ''श्री सुरेश बाबू गस्ते'' यांचे मालकी वहीवाटीची असून त्यांनी वरील मिळकतीबाबत आमच्या अशिलांशी संचकारपत्र करून संचकार दाखल रक्कम स्विकारलेली आहे. ३) सबब, सदरील मिळकतीवर कोणाचाही, कोणताही हक्क करार तारणगहाण दस्त, बक्षिस, वारसा हक्क, कोर्ट केसेस वगैरे हक्कसंबंध असतील तर तो त्यांनी सदरील नोटीस प्रसिध्द झालेपासून सात (७) दिवसांच्या आत खालील पत्त्यावरती लेखी कागदपत्रासह कळवावे. म्हणुन दिली जाहीर नोटीस सही ता.१३ .०४. २०२६

**अ‍ॅड.पंकज आ. पाटील**

**ऑफीस – ''श्री दत्त अपार्टमेंट'', गाळा नं. १, सांगली नाका, इचलकरंजी**
**मो. न. ९०२१२३७६८७**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना कळविणेकरीता प्रसिध्द करणेत येते की.

जि.व. तु. कोल्हापूर ता. हातकणंगले पैकी इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील मिळकत रि.स.नं.४००/२/पै/४ क्षेत्र हे ०.३४.५० आर आकार रू.४-०९ पैसे यापैकी गुंठेवारी प्लॉट नं.४७अ याचे ७/१२ प्रमाणे क्षेत्र हे ०.००.५० आर याचे गुंठेवारी प्रमाणे क्षेत्र ४६.५० चौ. मी. व त्यावरील ई-प्रतीचे बांधकाम क्षेत्र ३४.०८ चौ. मी. याचा मालमत्ता क्र. वॉर्ड नं. १३, घर नं. १४२० यासी चतुः सिमा-पुर्वेस-रस्ता,पश्चिमेस-या रि.स.नं. पैकी महादेव कोळी यांची प्लॉट नं.४७ब ची मिळकत, दक्षिणेस बशीर मुजावर यांची प्लॉट नं. ४६ची मिळकत, उत्तरेस - श्री. परीट यांची प्लॉट नं. ४८ ची मिळकत.

वर नमूद केलेली मिळकत ही सौ. आशा व श्री. रविंद्र महादेव वरदाई, रा. इचलकरंजी यांची रजिस्टर खरेदीपत्राने घेतलेली मिळकत होय. ती त्यांनी आमचे अशिल यांना विक्री करणेचे ठरवून संचकार स्विकारला आहे. व सदर मिळकत निर्वेध, निष्कर्जी असलेबाबतचा निर्वाळा आमचे अशिलांना दिलेला आहे.

सबब सदर मिळकतीवर कोणाचाही हक्क तारण, गहाण, बोजा, दावा, पोटगी वगैरे हक्क असलेस सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ (सात) दिवसाचे आत खाली नमूद पत्त्यावर सर्व अस्सल कागदपत्रासह येवून भेटावे. मुदतीनंतर आमचे अशिल खरेदीपत्राचा व्यवहार पुरा करतील तदनंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी म्हणून दिली जाहीर नोटीस सही ता. १८/०३/२०२६.

**अ‍ॅड. वैभव विजयकुमार हावळे**

**स्टॅंडर्ड, १०/१६९, बंगला रोड, इचलकरंजी.**
**मो. ९१७५४८९३०२.**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना कळविणेत येते की,जि.व.तु.कोल्हापूर ता. शिरोळ पैकी मौजे दानोळी येथील शेतजमिन १) गट नं. १०५८ क्षेत्र ० हे. आर ३१ यासी चतु: सिमा - पुर्वेस - गट नं. १०५९ पैकी लिहून देणार यांच्या मालकीची श्री. प्रतापसिंह राजाराम ठाणेकर यांना विक्री केलेला भाग, पश्चिमेस किसन शंकर दळवी यांची-शेतजमिन, दक्षिणेस - श्री.सर्जेराव नंदीवाले यांची शेतजमिन, उत्तरेस-दानोळी- कोथळी रस्ता येणेप्रमाणे चतु:सिमेतील शेतजमिन ही प्रतापसिंह राजाराम ठाणेकर यांचे मालकी वहिवाटीची आहे. तसेच २) गट नं.१०५९ क्षेत्र ० हे - आर १५.५ यासी चतु:सिमा- पुर्वेस - याच गट नंबरपैकी १०५९ पैकी राजाराम शिवा आंबी यांची मालकीची उर्वरीत क्षेत्र, पश्चिमेस - गट नं. १०५८ ची लिहून देणार राजाराम बजरंग ठाणेकर यांना पुर्वी विकलेला भाग, दक्षिणेस - श्री. सर्जेराव नंदीवाले यी शेतजमिन, उत्तरेस - दानोळी - कोथळी रस्ता येणेप्रमाणे चतु:सिमेतील शेतजमिन ही राजाराम बजरंग ठाणेकर यांचे मालकी वहिवाटीची आहे. सदर मुलगा व वडिल ठाणेकर कुटुंबियांनी सदरच्या अनु नं.१ व अनु नं. २ च्या मिळकती आमचे अशिलांना कायमखुष खरेदी देणेचे संचकारपत्र सदर ठाणेकर यांनी संचकार दाखल रक्कम स्विकारुन ता. १०/०४/२०२६ इ. रोजी आमचे अशिलांना करुन दिले आहे व सदरच्या मिळकती निष्कर्जी व निर्जोखमी असलेला निर्वाळा सदर ठाणेकर यांनी दिला आहे. तरी सदर मिळकतीबाबत कोणाची मालकी, हक्कसंबंध,कर्ज,बोजा,पोटगी, कोर्ट कारवाई अगर अन्य प्रकारचा कोणाचाही हक्कसंबंध असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झाले पासून सात दिवसात लेखी, कागदपत्रासह, खालील पत्त्यावर आमची खात्री आमचे करुन द्यावी न पेक्षा मुदतीनंतर सदरची मिळकत निष्कर्जी व निर्जोखमी आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुरा करतील त्यानंतर कोणाचीही कसलीही तक्रार हरकत चालणार नाही. म्हणून दिली जाहीर नोटीस.

ता.१३/०४/२०२६

**अ‍ॅड.किरण आप्पासो कलाजे,**

**(मे. नोटरी पब्लिकसो, भारत सरकार) १०/६३, मराठा मंडळ बिल्डींग, मेन रोड, इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर**
**मो.नं. ९४२२६ २२९३९**

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

मिळकतीचे वर्णन :- मौजे रूई येथील गट नं ७७५ मधील बिगर शेती क्षेत्र ७३७.५४ चौ.मी.ची मिळकत यासी चतुः सिमा पूर्व अमोल पोवार यांची मिळकत व रस्ता, पश्चिम- कांबळे यांची मिळकत, दक्षिण- अशपाक मुल्ला यांची मिळकत, उत्तर -२० फुटाचा रस्ता, सदरची मिळकत ही सुरेश बसगोंडा पाटील यांची असून त्यांनी महमंद इमाम शेख व कमालसाब हासीमसाब गद्याळपटेल यांना करार पत्राने दिलेली त्या आधारे त्यांनी सदरची मिळकत ही आमच्या पार्टीस संचकार चिठ्ठी ने लिहून दिलेली असून त्यापोटी संचकार ही स्विकारलेला आहे. तरी सदर मिळकती बाबत कोणाचा कांहीही हक्क, हित संबंध, दावा तारण इत्यादी काही असलेस ही नोटीस प्रसिध्द झाले पासून ०७ दिवसांचे आत खालील पत्यावर लेखी तक्रारी नोंदवावी. म्हणून दिली नोटीस

ता.१३/०४/२०२६

**विश्वनाथ कृष्णा घाटगे**

**१०/५६३, विक्रम नगर, इचलकरंजी.**
**मो.बा. ९८२३४५८५८५**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांचे माहितीसाठी प्रसिध्द करणेत येते की,

**१.मिळकतीचे वर्णन–** इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील रि.स.नं. ६८५ /१ /ड यापैकी बिगरशेती प्लॉट नं. १० क्षेत्र ८५४.५८ चौ.मी. यावर बांधलेल्या '' महालक्ष्मी विल्हेज'' या बहुउद्देशीय इमारती मधील तळमजल्यावरील निवासी **सदनिका क्र.** २ याचे क्षेत्र ६०.४१ चौ.मी. याचे ६५० चौ.फुटाची बंदिस्त घर मिळकत याचा महानगगरपालिका मालमत्ता क्र.९/६४/६/१/२ असा नमूद असून यासी षष्ठसिमा पुर्वेस - फ्लॅट नं. १, पश्चिमेस - सरकारी रस्ता, दक्षिणेस - जिना, उत्तरेस - फ्लॅट नं. ३ ची मिळकत, वर- फ्लॅट नं. ६, खाली जमिन

२.वर नमूद मिळकत ही **श्री. विरेंद्र राचाप्पा म्हेत्रे, रा. इचलकरंजी** यांचे मालकीची कब्जावहिवाटीची असून, त्यांनी सदरची मिळकत निर्वेध, निष्कर्जी असलेचा निर्वाळा देवून, मिळकत खरेदी देणेचे ठरवून, संचकार रक्कम स्विकारुन, खरेदीपूर्व करारपत्र आमचे अशिलांचे लाभात साक्षीदारसमक्ष लिहून दिले आहे. सबब, वर नमूद केलेल्या मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्कसंबंध, तारणगहाण, दान, हिस्सा इजमेंट ॲटचमेंट, कोर्ट हुकूम, वाटणी, कर्जबोजा वगैरे हितसंबंध असलेस तो त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ (सात) दिवसाचे आत सर्व अस्सल कागदपत्रासह खालील पत्त्यावर लेखी कळवावा. मुदतीत कोणाची तक्रार अगर हरकत न आलेस सदरची मिळकत निर्वेध व निष्कर्जी आहे असे समजून आमचे अशिल खरेदीपत्राचा व्यवहार पुरा करतील. मुदतीनंतर येणाऱ्या तक्रारींचा व हरकतींचा विचार केला जाणार नाही. म्हणून दिली जाहीर नोटीस सही

ता. १३/०४/२०२६

**अ‍ॅड.राजकुमार पांडुरंग निर्मळ**

**३/३११/१, अवधुत आखाडा, इचलकरंजी,**
**मोबा.नं. ९८६०४४११५२**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः मौजे कराटे ता. पाटण येथील तसेच पाटण तालुक्यातील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविणेत येते की,

तुकडी व जिल्हा परिषद सातारा, पोट-तुकडी व तालुका पंचायत समिती पाटण व दुय्यम निबंधक साहेब पाटण यांचे हद्दीतील गाव मौजे कराटे ता. पाटण ग्रामपंचायत हद्दीतील खाली नमूद केलेली मिळकत,

**मिळकतींचे वर्णन**

भूमापन क्र. ६०/१ एकूण क्षेत्र हे. ०५ - ८२ आर, आकार रू. ०३ = ७६ पैसे या शेतमिळकतीमधील जमीनमालक श्री. तानाजी गणपत लोहार यांचे खरेदी मालकी व कब्जेवहिवाटीचे हे ०३ - ४६ आर या क्षेत्रापैकी हे ००-१४.९१ आर.

तानाजी गणपत लोहार यांचे हे ०३-४६ आर क्षेत्राच्या चतु:सिमा
पुर्वेस :-स.नं. ६०/१ पैकी नयना हरीष सूर्यवंशी यांची मिळकत व त्यापलीकडे स.नं. ६०/३, ६०/४, ६०/५ व स. नं. ६२.
दक्षिणेस :-निलेश साळुंखे यांचे स.नं. ६०/१ मधील २२ आर क्षेत्र व महेश मगर यांचे स.नं. ६०/१ मधील २० आर क्षेत्र व त्यापलीकडे स.नं. ५३ व त्यापलीकडे कराड-चिपळूण रस्ता.
पश्चिमेस- स.नं. ६०/१ मधून जमीन मालक यांनी दक्षिण उत्तर लांबीचा व पूर्व पश्चिम ५ मीटर रूंदीचा सोडलेला अंतर्गत रस्ता व त्यापलीकडे स.नं. ५२ ची मिळकत.
उत्तरेस:- स.नं. ६०/२ व त्यापलीकडे स.नं. १११.

सदर खरेदी करत असलेल्या हे. ००-१४.९१ आर क्षेत्राच्या चतु:सिमा
पुर्वेस:-स.नं. ६०/१ मधील तानाजी लोहार यांची उर्वरीत मिळकत
दक्षिणेस:-निलेश साळुंखे यांचे स.नं. ६०/१ मधील २२ आर क्षेत्र व महेश मगर यांचे स.नं. ६०/१ मधील २० आर क्षेत्र व त्यापलीकडे स.नं. ५३ व त्यापलीकडे कराड चिपळूण रस्ता.
पश्चिमेस:-स.नं. ६०/१ मधून जमीन मालक यांनी दक्षिण उत्तर लांबीचा व पूर्व पश्चिम ५ मीटर रुंदीचा सोडलेला अंतर्गत रस्ता व त्यापलीकडे स.नं. ५२ ची मिळकत.
उत्तरेस :-स.नं. ६०/१ मधील तानाजी लोहार यांची उर्वरीत मिळकत व त्यापलीकडे स.नं. ६०/२ व स.नं.१११.

वर नमूद केलेली मिळकत ही जमीनमालक तानाजी गणपत लोहार यांचे मालकीची व प्रत्यक्ष कब्जेवहिवाटीची होती व आहे. सदर जमीन मालक यांनी वर वर्णन केलेली मिळकत आजचे बाजारभावाने होणारे मोबदल्यास आमचे अशिलांना विक्री करणेचे ठरविले असून सदर मिळकत निर्वेध, निजोखमी असल्याचा भरवसा सदर जमीन मालक यांनी आमचे अशिलांस दिला आहे. सदर जमीन मालक यांनी आमचे अशिलांकडून सदर व्यवहारापोटी विसार म्हणून काही रक्कमही स्विकारली आहे.

तरी वर नमूद मिळकतीसंदर्भात कोणाचीही बोजा, पोटगी, दान, गहाण, लीज, बक्षीस, अगर कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांचे आत आमची समक्ष भेट घेऊन खात्री करून द्यावी. सदर मुदतीमध्ये कोणाचीही तक्रार हरकत न आलेस वर नमूद मिळकतीतील त्यांचा हक्क त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिला आहे असे समजणेत येईल व आमचे अशिल वर नमूद जमीन मालक यांचेकडून सदर मिळकतीचे दस्त करून घेतील. तसेच सदर मुदतीनंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस दिली. दि.०६/०४/२०२६

**अ‍ॅड.सचिन एस.देसाई**

**पाटण,ता.पाटण, जि. सातारा, एमएएच–१०६७/२००६**

## जाहीर इशारा नोटीस

इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील **जूना सि.स.नं. १२०२९ याचा नवीन टी. पी. स्कीम नं. २ फायनल प्लॉट नं.५०/९८** चे क्षेत्र ४५९.० म्हणजेच ४९३८.८४ चौ. फूट . सदरची मिळकत ही तथाकथित कागदपत्राचे / आदेशान्वये **श्री. सुनिल सिताराम महाजन, रा. इचलकरंजी** यांची नावाची नोंद पोकळ स्वरुपात झालेली आहे. याबाबत आमचे अशिल संबंधित श्री सुनिल सिताराम महाजन व मा. नगरभूमापन अधिकारीसो इचलकरंजी यांचेविरुध्द मे. उपसंचालक भूमी अभिलेख पुणे प्रदेश पुणे यांचे कोर्टात अपील दाखल केलेले आहे. दरम्यानचे काळात श्री. महाजन हे सदर नावाचा व क्षेत्राचा प्रस्तूत प्रॉपटी कार्ड पत्रकी झालेल्या नोंदीचा गैरवाजवी फायदा घेवून सदरची मिळकत त्रयस्थास खरेदी, विक्री, कर्ज बोजा इ.करणेचा प्रयत्न करत असलेबाबत आमचे अशिलांना खात्रीलायक बातमी समजली आहे. तरी वर नमूद मिळकत कोणीही खरेदी, विक्री अगर अन्य कोणत्याही प्रकारची तबदिली करु नये. याउपरही सदर मिळकतीवर कोणत्याही प्रकारचा व्यवहार झालेस आमचे अशिलांच्या कायदेशीर हिस्सेवर व हक्कावर बंधनकारक रहाणार नाही. उलट ज्याच्या लाभात तसे कोणत्याही प्रकारचे व्यवहार झालेस त्यांना निर्वेध व निष्कर्जी मालकी हक्क प्राप्त न होता, त्यांना निरनिराळया दाव्याना तोंड दयावे लागेल . कोणाचीही फसवणूक होवू नये म्हणून दिली जाहीर इशारा नोटीस. सही

ता. १३/४/२०२६.

**अ‍ॅड.दिपक मारुती कदम**

**वेताळपेठ,तारदाळ,ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर.**
**मो. नंबर ९९२२५८५२८८.**

## जाहीर इशारा वजा नोटीस

आमचे अशिल श्री. परशुराम रामचंद्र कोरवी, रा. भाग्यश्री कॉलनी, इचलकरंजी यांनी दिले माहितीवरुन, दाखवले कागदपत्राआधारे तमाम लोकांना जाहीर इशारा वजा नोटीसीने कळविणेत येते की,

१)मिळकतीचे वर्णन- मौजे खोतवाडी ग्रामपंचायत हद्दीतील शेतजमिन मिळकत गट नं. ५५ क्षेत्र हे.३.४७.०० आर, आकार रु. ४= ९५ पैसे यापैकी लिहून देणार यांचे नांवे समाईक नोंद असलेले क्षेत्र हे.१.२१.६६ आर आकार रु. १ = ७४ पैसेची मिळकत यापैकी क्षेत्र हे. ०.९० आर आकार रु. १=२९ पैसे ची शेतजमिन मिळकत यासी चतु:सिमा - पुर्वेस - इचलकरंजी सांगली रोड, पश्चिमेस - माने यांची मिळकत, दक्षिणेस- याच गट नंबरपैकी उर्वरीत मिळकत व पडाळे यांची मिळकत व उत्तरेस - भारती रुपा कांबळे वगैरे यांची मिळकत

२) वर नमूद मिळकत ही १) निलीमा बाबासो कांबळे, रा. साजणी, २) आक्काताई उर्फ कोकीळा बाबासाहेब कांबळे, रा. खोतवाडी, ३) निकेत बाबासो कांबळे रा. तारदाळ यांचे मालकीची असून त्यांनी सदर मिळकतीबाबत आमचे अशिलांचे लाभात दि. ०८/०१/२०२५ इ. रोजी संचकारपत्र लिहून देवून संचकाराची रक्कम स्विकारलेली आहे.

३)१) निलीमा बाबासो कांबळे, रा. साजणी, २) आक्काताई उर्फ कोकीळा बाबासाहेब कांबळे, रा. खोतवाडी, ३) निकेत बाबासो कांबळे रा. तारदाळ हे आमचे अशिलांशी ठरले व्यवहारापेक्षा जादा रक्कमेच्या हव्यासाने सदरची मिळकत सध्या त्रयस्थ इसमांना दाखवून खरेदी देणेबाबत अगर तत्सम व्यवहार करणेच्या प्रयत्नात असलेचे आमचे अशिलांना अलिकडेच खात्रीशिर समजून आले आहे. वस्तुतः वर कलम १ मध्ये नमूद मिळकतीबाबत करारपत्र करुन देवून संचकार रक्कम स्विकारली असताना, अशा पध्दतीने व्यवहार करणे बेकायदेशीर ठरणार आहे. आमचे अशिलांशी झाले कराराप्रमाणे मिळकत खरेदी घेणेचा अग्रहक्क आमचे अशिलांचा आहे.

४) सबब सदरचे जाहीर इशारा वजा नोटीसीने कळविणेत येते की, वर कलम १ मध्ये नमुद केलेली मिळकत खरेदी घेणेचा अग्रहक्क आमचे अशिलांचा असून १) निलीमा बाबासो कांबळे, रा. साजणी,२)आक्काताई उर्फ कोकीळा बाबासाहेब कांबळे, रा. खोतवाडी,३) निकेत बाबासो कांबळे रा. तारदाळ यांचेशी अगर त्यांचे तर्फे इसमांशी कोणीही, कोणत्याही, कसल्याही प्रकारचा तत्सम व्यवहार करु नये. तसा व्यवहार केलेस तो व्यवहार आमचे अशिलांवर तसेच वर नमुद मिळकतीवर बंधनकारक असणार नाही. म्हणून दिली जाहीर इशारा/नोटीस सही

ता.१३/०४/२०२६

**अ‍ॅड. राजकुमार पांडुरंग निर्मळ**

**३/३११/१, अवधुत आखाडा, इचलकरंजी, मो.नं. ९८६०४४११५२**

# आम.शिवाजीराव पाटील यांचे गैरसमज दूर करू

## मंत्री हसन मुश्रीफ यांचे स्पष्टीकरण

कोल्हापूर,ता.१३(प्रतिनिधी)

.................................



**माझी आणि आमदार शिवाजीराव पाटील यांची भेट झाल्यानंतर त्यांच्या मनातील सगळे गैरसमज, शंका-कुशंका आणि प्रश्न दूर होतील, असे स्पष्टीकरण वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ यांनी केले. आमदार श्री. पाटील यांना दूध संस्था नोंदणीची प्रक्रियाही सविस्तर समजावून सांगेन, असेही ते म्हणाले.**

याबाबत मंत्री हसन मुश्रीफ यांना विचारले असता श्री.मुश्रीफ म्हणाले,गोकुळ दूध संघामध्ये आजघडीला महायुतीची सत्ता आहे.यामध्ये पालकमंत्री प्रकाश आबिटकर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा आमदार म्हणून मी, जनसुराज्य पक्षाचे आमदार विनय कोरे, आमदार राजेंद्र पाटील- यड्रावकर, आमदार चंद्रदीप नरके, संजयबाबा घाटगे व इतर नेतेमंडळी आम्ही सत्तेमध्ये सहभागी आहोत. मुख्यमंत्री महोदय आणि आमची याबद्दल सविस्तर चर्चा झालेली आहे. ही सगळी माहिती आमदार शिवाजीराव पाटील यांना कळाली की त्यांच्या सगळ्या शंकांचे आणि गैरसमजांचे निरसन होईल, अशी मला खात्री आहे.चंदगडचे आमदार पाटील यांचा सोशल मीडियावर व्हिडिओ बघितला आणि मी आश्चर्यचकित झालो. कारण माझी आणि त्यांची गोकुळ दूध संघाच्या निवडणुकीबाबत दोनवेळा सविस्तर चर्चा झालेली होती. ते असे का बोलले आहेत, हे ते मला भेटल्यानंतरच समजेल.आमदार श्री.शिवाजीराव पाटील यांची जी वक्तव्ये आहेत ते पाठीमागून त्यांना कुणीतरी चुकीचे 'प्रॉम्टींग' करीत असल्यासारखे वाटते. आमदार शिवाजीराव पाटील यांना मी समजावून सांगेन की, त्यांनी कागलसह करवीर, राधानगरी या तीन तालुक्यांचा उल्लेख केलेला आहे.

> मोठा गैरसमज...
>
> **श्री.मुश्रीफ म्हणाले,आमदार शिवाजीराव पाटील यांचा मोठा गैरसमज झालेला दिसतोय.दूध संस्था नोंदणी करतानाची काय काय प्रक्रिया असते, हे सुद्धा मी त्यांना समजावून सांगेन. सरकारी अधिकारी ही कोणतीही बेकायदेशीर गोष्ट करू शकत नाहीत.महेश कदम हे सहाय्यक निबंधक-दुग्ध कधीच नव्हते. माझ्या माहितीनुसार या दूध संस्थांची नोंदणी दुग्धचे सहाय्यक निबंधक गजेंद्र देशमुख आणि प्रदीप मालगावे यांच्या काळामध्ये झालेली आहे.**

याबद्दल मा. उच्च न्यायालय आणि दुग्धविकास विभागाने एस. आय. टी. नेमलेली आहे. या सर्व चौकशीअंती ''दूध का दूध आणि पाणी का पाणी'' होईलच. न्यायालयात प्रत्यक्षात बाराशे दूध संस्थांची सुनावणी सुरू असताना, तो आकडा ३७०० सांगितल्यामुळे विनाकारण लोकांच्यात गैरसमज निर्माण होईल.

# दूधगंगा नदीचे पात्र पुन्हा कोरडे

## शेतकरी हवालदिल;नागरिकांची पाण्यासाठी भटकंती

दत्तवाड,ता.१३(वार्ताहर)-

.............................

**दत्तवाड (ता.शिरोळ) येथील दूधगंगा नदीचे पात्र आठवड्याभरातच पुन्हा कोरडे पडल्याने शेतकरी वर्ग हवालदिल झाला असून नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे.**

गेल्या दहा ते बारा दिवसांपूर्वीच दूधगंगा नदी पात्रात पाणी आले होते. सध्या उन्हाची तीव्रता मोठ्या प्रमाणात वाढल्याने पाण्याची गरज मोठ्या प्रमाणात वाढली आहे. एरवी शेतीसाठी १५ ते २० दिवसानंतर द्यावे लागणारे पाणी आता आठ दिवसात द्यावे लागत आहे. दत्तवाड, दानवाड ही दूधगंगा नदीवरील शेवटची गावे आहेत. त्यामुळे नदीपात्रात काळम्मावाडी धरणातून सोडण्यात आलेले पाणी मुळातच फार कमी प्रमाणात या शेवटच्या गावापर्यंत पोहोचते. शिवाय आलेले पाणी अडवण्यासाठी या भागात दूधगंगा नदीवर असलेले दत्तवाड -एकसंबा व दत्तवाड-मलिकवाड हे दोन्ही बंधारे लहान असल्याने येथे फारसे पाणी अडवले जात नाही त्यामुळे ही बंधारे ओव्हर फ्लो होऊन पाणी पुढे निघून जाते व जितके पाणी या बंधाऱ्यात अडवले जाते त्या पाण्याची महाराष्ट्र व कर्नाटक या दोन्ही राज्यातील दूधगंगा काठावरील दत्तवाड, दानवाड, टाकळीवाडी, घोसरवाड तसेच कर्नाटकातील सदलगा, मलिकवाड, एकसंबा आदी गावातून मोठ्या प्रमाणात पाण्याची उचल केली जाते त्यामुळे आलेले पाणी बघता बघता काही दिवसातच संपते व नदीपात्र कोरडे पडते त्यामुळे या भागातील शेतीची अवस्था फेब्रुवारी ते मे चार महिन्यात फारच बिकट होते.अधून मधून पडणाऱ्या अवकाळी पावसामुळे या भागातील ऊस शेतीला हा पाऊस वरदान ठरतो.या भागातील पाण्याची ही समस्या दूर करण्यासाठी येथे असलेल्या बंधाऱ्यांची उंची वाढवणे गरजेचे आहे,तरी प्रशासनाने याची गंभीर दखल घेऊन येथील दत्तवाड-एकसंबा व दत्तवाड-मलिकवाड या बंधाऱ्यांची उंची वाढवून पाण्याची साठवण अधिक करणे गरजेचे आहे जेणेकरून या परिसराला उन्हाळ्यातील चार महिन्यात भेडसावणारी पाण्याची समस्या कायमस्वरूपी दूर होऊ शकेल.



**दत्तवाड येथील दूधगंगा नदी पाण्याअभावी कोरडी पडल्याचे दिसत आहे.**

## थोडक्यात

### चंदूरच्या अनिकेत पाटील याची महसूल सहाय्यक पदी निवड

चंदुर,ता.१३(वार्ताहर)-

.............................

**चंदुर (ता. हातकणंगले) येथील अनिकेत बसवराज पाटील याची महसूल सहाय्यक पदी निवड झाली आहे.**



महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या महाराष्ट्र सेवा गट क परीक्षेमध्ये उत्तीर्ण होऊन त्यांची महसूल सहाय्यक पदी निवड झाली.

अनिकेतचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषदेच्या कुमार विद्या मंदिर चंदुर येथून तर माध्यमिक व उच्च माध्यमिक व्यंकटराव हायस्कूल व गोविंदराव जुनिअर कॉलेज इचलकरंजी येथून झाले तर पदवी मेकॅनिकल इंजिनिअरिंग शरद इन्स्टिट्यूट यड्राव येथे झाले. या यशामध्ये त्याला आई-वडील व भाऊ यांचे प्रोत्साहन व मार्गदर्शन लाभले. या निवडीमुळे त्याचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

### कोल्हापुरात शिवबसव जयंतीनिमित्त विविध स्पर्धांना उत्साहात सुरुवात

कोल्हापूर,ता.१३(प्रतिनिधी)

.................................

**कोल्हापूर वीरशैव लिंगायत समाज, दक्षिण महाराष्ट्र वीरशैव लिंगायत समाज आणि श्री वीरशैव अक्कमहादेवी महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने ११ ते १९ एप्रिल २०२६ या कालावधीत शिवबसव जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.**

या उत्सवांतर्गत कॅरम, पाककला, रांगोळी, मेहंदी, फॅन्सी ड्रेस, पारंपारिक वेशभूषा, स्तोत्र व श्लोक पठण, प्ले आर्ट आणि नृत्य अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमांची सुरुवात कॅरम स्पर्धेने करण्यात आली असून, उत्सवाला उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

स्पर्धेचे उद्घाटन भारतीय जनता पक्ष युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक आणि प्रा. प्रबोधिनी पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज, जगद्गुरु बसवेश्वर महाराज आणि क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या प्रतिमांचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.यावेळी कृष्णराज महाडिक यांनी मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमात समाजाचे अध्यक्ष किरण गवळी यांच्या हस्ते कृष्णराज महाडिक यांचा सत्कार करण्यात आला तर प्रा. प्रबोधिनी पाटील यांचा सत्कार स्मिता हळदे यांच्या हस्ते करण्यात आला. कॅरम स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी सत्यजित सांगावकर, उदय करपे आणि सुरेश मांजरेकर यांनी परिश्रम घेतले.

### जागृत पतसंस्थेस १२ लाखांचा नफा

कोतोली,ता.१३(प्रतिनिधी)-

.......................................

**पन्हाळा तालुक्यातील कोतोली येथील जागृत ग्रामस्थ पतसंस्था प्रगतीच्या दिशेने वेगाने झेपावत आहे. चालू आर्थिक वर्षात १२ लाख ३८ हजारांचा नफा मिळवत संस्थेने विश्वासार्हतेची भक्कम छाप पाडली आहे. अवघ्या दोन वर्षांत साडेतीन कोटींच्या ठेवींचा टप्पा पार करून संस्था आता पाच कोटींच्या दिशेने वाटचाल करत आहे.**

सुयोग्य नियोजन, काटकसरीची शिस्त आणि एकजुटीच्या बळावर संस्थेची प्रगती अधिक बहरत आहे. कर्मचारी व सभासदांच्या समन्वयातून घडलेले हे यश सामूहिक प्रयत्नांचे प्रतीक ठरत आहे. चेअरमन विजय फिरंगे यांच्या नेतृत्वाखाली संस्थेची वाटचाल नव्या उंचींकडे सुरू असून, याबद्दल उपस्थित मान्यवरांनी समाधान व्यक्त केले. यावेळी व्हा.चेअरमन गणपती चौगुले, प्रकाश तांबवेकर, सचिन पाटील, रघुनाथ फिरंगे तसेच कर्मचारी उपस्थित होते.

### डॉ.आंबेडकर जयंतीनिमित्त संविधान प्रतिमेचे शाळांना वाटप

बिद्री,ता.१३(प्रतिनिधी)-

............................

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त बोरवडे (ता. कागल) येथील सम्यक क्रांती विचार मंच शाहूनगर यांच्यावतीने संविधान प्रतिमेचे वाटप करण्यात आले. परिसरातील प्राथमिक व माध्यमिक शाळा, ग्रामपंचायत व मुरगुड पोलीस स्टेशन यांना या प्रतिमेचे वाटप करण्यात आले.**

यावेळी बोलताना भारतमाता हायस्कूलचे मुख्याध्यापक एस. पी. पाटील म्हणाले, संविधान हा लोकशाहीचा आत्मा असून ते चिरकाल टिकणारे आहे. संविधानानुसार वाटचाल करणाऱ्या देशाची प्रगती होते. त्यामुळे शालेय विद्यार्थ्यांनी भारताच्या संविधानाचा अभ्यास करून ते आत्मसात करणे गरजेचे आहे. यावेळी विचार मंचचे अध्यक्ष किशोर कांबळे,उपाध्यक्ष निलेश कांबळे, पोलीस पाटील गौतम कांबळे, अनिल कांबळे,भिकाजी कांबळे, अभिलाष कांबळे, सातापा कांबळे, दिपक जयदिप, अक्षय कांबळे, तिलक कांबळे यांच्यासह शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते.

# भांडवलदार व सरकारच्या धोरणांविरोधात व्यापक लढ्याची गरज-शेट्टी

सरूड,ता.१३(प्रतिनिधी)-

.................................

**शेती आणि शेतकरी यांना भांडवलदार व सरकारच्या धोरणांपासून वाचवण्यासाठी समाजातील सर्व घटकांनी एकत्र येऊन व्यापक लढा उभारण्याची गरज आहे, असे प्रतिपादन माजी खासदार राजू शेट्टी यांनी केले. ते शाहुवाडी येथील संकल्प सिद्धी हॉलमध्ये आयोजित ''शेती आणि शेतकरी वाचवा'' राज्यस्तरीय परिषदेत बोलत होते.**

राजू शेट्टी यांनी सरकार व भांडवलदार यांच्यात संगनमत असल्याचा गंभीर आरोप करत विविध प्रकल्प हे भांडवलदारांच्या फायद्यासाठी राबवले जात असल्याचे सांगितले.शक्तीपीठ महामार्गासारखे प्रकल्प धार्मिक मुद्दा पुढे करून शेतकऱ्यांच्या जमिनी ताब्यात घेण्यासाठी वापरले जात असल्याचा आरोप त्यांनी केला. सुमारे ७० हजार कोटींच्या या प्रकल्पाला विरोध करण्यात येणार असून तो होऊ देणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.

यावेळी माजी आमदार सत्यजित पाटील यांनीही शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी सर्व पक्ष एकत्र आल्याचे सांगितले.शेतकरी वैफल्यग्रस्त होत असून त्यांच्या मुलांमध्ये बेरोजगारी, भूक आणि असुरक्षितता वाढत असल्याची चिंता त्यांनी व्यक्त केली.सध्याची व्यवस्था जनतेचे ऐकत नसून ती निर्भीड झाली असल्याची टीकाही त्यांनी केली. परिषदेत शेतकऱ्यांच्या संरक्षणासाठी विविध ठराव मंजूर करण्यात आले. त्यामध्ये जंगली जनावरांचा बंदोबस्त,जंगलतोड थांबवणे, केमिकल व सौर ऊर्जा प्रकल्प तसेच गॅस प्लांट थांबवणे, रस्ते रुंदीकरणातील दलाली रोखणे, आयात-निर्यात धोरणातील त्रुटींमुळे होणारी शेतकऱ्यांची लूट थांबवणे, परदेशी मालापासून शेतीमालाचे संरक्षण करणे आणि उत्पादन खर्चाच्या किमान दीडपट हमीभाव देणे यांसारख्या मागण्यांचा समावेश होता.कार्यक्रमात मुख्य संयोजक कॉ.अतुल दिघे, भाई भारत पाटील, शेतकरी नेते अशोक जाधव, किशोर ढमाले, पुरुषोत्तम शर्मा, राजेंद्र भावके, उद्धव शिंदे, माजी आमदार संपतराव पवार-पाटील यांच्यासह अनेक मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. परिषदेला शेतकरी उपस्थित होते.



**शाहूवाडी येथे आयोजित परिषदेत शेतकऱ्यांना संबोधित करताना माजी खासदार राजू शेट्टी ,व्यासपीठावर प्रमुख मान्यवर.**

## कुरूंदवाडात आज महापुरूषांच्या विचारांची मिरवणूक

कुरुंदवाड,ता.१३(प्रतिनिधी)

.................................

**येथील विश्वरत्न महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती महामहोत्सव समिती यांच्यावतीने १४ एप्रिल रोजी सायंकाळी ४ वाजता बहुजन महापुरुषांच्या विचारांची मिरवणूक काढण्यात येणार आहे,अशी माहिती विश्वरत्न महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती महामहोत्सव समितीच्यावतीने अध्यक्ष अनिकेत गोरे, आयर्न ढाले, कुणाल कांबळे, यशराज मदाळे यांनी दिली आहे.**

या कार्यक्रमात प्रतिष्ठित नागरिक,सर्व समाज बांधव सहभागी होणार आहेत.

# चौंडेश्वरी कॉलनीत पायाभूत सुविधा देण्यास प्रयत्नशील

## प्रकाश आवाडे

तारदाळ,ता.१३(वार्ताहर)-

.................................

**चौंडेश्वरी कॉलनीच्या माध्यमातून तारदाळमध्ये एक जणू नवे आदर्श गाव वसले आहे. संस्थेच्या ४६ एकर जागेमध्ये ६५० घरे उभी राहणार असताना त्यासाठी रस्ते, गटारी, पथदीप आदी पायाभूत सुविधा देण्यासाठी प्रयत्नशील आहे, असे वक्तव्य माजी मंत्री प्रकाश आवाडे यांनी केले.**

तारदाळ येथे देवांग समाजाच्या अधिपत्याखालील श्री चौंडेश्वरी सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या वतीने उभारण्यात आलेल्या कै. सदाशिवराव सातपुते उद्यानाचे उद्घाटन माजी मंत्री प्रकाश आवाडे यांनी फीत कापून केले. यावेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.



**चौंडेश्वरी कॉलनी येथील सदाशिवराव सातपुते उद्यानाच्या उद्घाटन प्रसंगी प्रकाश आवाडे, सानिका आवाडे व इतर.**

प्रकाश आवाडे यांनी संस्थेचे चेअरमन महेश सातपुते, व्हाईस चेअरमन शशिकांत हावळ, सचिव, संचालक मंडळ, सभासद यांच्या समन्वयातून सर्वसोयींनीयुक्त कॉलनी साकारत असून हे गावासाठी भूषणावह आहे, असे गौरवोद्गार काढले.येत्या काही महिन्यात संस्थेच्या प्रवेशद्वारात हायमास्ट दिवे उभारण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.स्वागत व्हाईस चेअरमन शशिकांत हावळ यांनी केले. प्रास्ताविक करताना चेअरमन महेश सातपुते म्हणाले की, या परिसरात गृहनिर्माण संस्थेच्या माध्यमातून सर्व अद्यावत सुविधा दिल्या आहेत. संस्थेच्या परिसरातील रस्त्यांसाठी आमदार राहुल आवाडे, जिल्हा परिषद सदस्या सानिका आवाडे यड्रावकर पाटील यांनी निधी देऊन या परिसराचा कायापालट करावा, अशी अपेक्षा व्यक्त केली. ज्येष्ठ संचालक श्री.कुडचे यांचा वाढदिवसा निमित्त सत्कार करण्यात आला. याप्रसंगी देवांग समाजाचे उपाध्यक्ष संजय अनिगोळ,डी. एम. कस्तुरे,विठ्ठलराव डाके, पतसंस्थेच्या अध्यक्षा सातपुते,गृहनिर्माण संस्थेचे सर्व संचालक, समाजाचे पदाधिकारी, सभासद व नागरिक उपस्थित होते. आभार संचालक दयानंद लिपारे यांनी मानले.

## शिक्षण आणि संविधानाच्या बळावरच समाजाचा खरा विकास-प्रा.नितीन पाटील

हुपरी,ता.१३(वार्ताहर)-

.................................

**महात्मा जोतिराव फुले आणि विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महामानवांनी देशाला शिक्षणाचा आणि समतेचा विचार दिला. याच शिक्षणाच्या आणि संविधानाच्या बळावर समाजाचा खऱ्या अर्थाने विकास शक्य आहे, असे प्रतिपादन प्रा. नितीन बानुगडे-पाटील यांनी केले.**

हुपरी येथील हुतात्मा स्मारक क्रीडांगणावर महामानवांची संयुक्त जयंती उत्सव समिती व भीमगर्जना युवक संघटनेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या प्रबोधनात्मक व्याख्यानावेळी ते बोलत होते.महात्मा जोतिराव फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती उत्सवाचे औचित्य साधून या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आम.अशोकराव माने, पोलीस निरीक्षक सत्यवान हाके,आरपीआयचे जिल्हाध्यक्ष सतीश माळगे,दौलतराव पाटील, सुभाष कागले, रफिक मुल्ला,धर्मवीर कांबळे, किरण कांबळे, भीमराव संघमित्रा, विद्याधर कांबळे, बाळासाहेब कंगणे,राहुल फुले,विनोद शिंगाडे आदी मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. किशोर मानकापुरे यांनी केले, तर आभार धर्मवीर कांबळे यांनी मानले.


श्रीहरी
शुक्रवार, ता. १०/०४/२०२६ पासून
दुपारी १ व ४ वाजता
मस्त रोमँटीक हिंदी चित्र
मस्तानी
जबदस्त रोमँटीक हिंदी चित्र
७ वा.
A
लव स्टोरी
प्रौढांसाठी

श्रीदत्त
शुक्रवार, ता. १० पासून
रोज ४ खेळ १*४*७ व १० वाजता
मस्त रोमँटीक इंग्रजी चित्रपट
हायस्ट बिडर
A
फक्त प्रौढांसाठी
A

पंचवटी
DOLBY DIGITAL PLUS 7.1
गर्दीचा ३ रा आठवडा
ॲडव्हान्स बुकिंग सकाळी 7 वाजल्यापासून सुरू राहील
book my show
पंचवटी वॉटसअॅप ग्रुप
संपर्क : 9623150103
रोज ३ खेळ
* दुपारी १२ व ४ आणि रात्री ९ वा.





भाग्यरेखा चित्रमंदिर इचलकरंजी
नवीन डॉल्बी डिजिटल साऊंड सिस्टीम
गर्दीचा ४ था आठवडा
११.१५ - ३.१५ - ७.१५ वा.
खास कमी केलेल्या दरात
ति.दर रू. ५०



गुरु
शुक्रवार ता.१० पासून
ऑनलाईन बुकींग book my show
रोज ४ खेळ १२.३०*३.३०*६.३० व ९.३० वा.
धुरंधर विसरा येत आहे त्यापेक्षाही जबरदस्त सुडाने पेटलेली प्रेमकथा



RK CINEMA
3 SCREEN MULTIPLEX
राधाकृष्ण सिनेमा
3 स्क्रीन मल्टिप्लेक्स
REAL 3D EFFECTS & DOLBY ATMOS SOUND
ONLY IN RADHAKRISHNA MULTIPLEX
7447440070
book my show


" धुरंधर 2" - हिंदी ( A )
09:45 AM, 11:00 AM
12:15 PM, 02:00 PM
04:30 PM, 06:15 PM
08:45 PM, 09:45 PM
10:30 PM
" सुपर डुपर " ( मराठी )
04:00 PM, 07:00 PM
" भूत बंगला " ( हिंदी )
PAID PREVIEW SHOW
16th APRIL 2026
10:00 PM
आता कोणताही शो पहा 100/-* पासून पुढे

फोर्च्युन सिनेप्लेक्स
इचलकरंजी
Now Book Tickets on book my show
OR Via www.fortuneshahgroup.com
अधिक माहितीसाठी संपर्क
+91 88 88 01 51 11


धुरंधर २ (HIN) (A)
11.00am, 01.30, 03.30, 06.00, 08.30, 10.30pm
सुपर डुपर (MAR) (U/A)
02.00, 07.30pm
प्रोजेक्ट हेल मेरी (HIN) (U/A)
11.00am, 04.30, 10.00pm
आता पहा कोणताही शो फक्त 100 पासून पुढे

# सातार्‍याला वाढत्या अतिक्रमणांचा विळखा

## नगरसेवकांकडून प्रशासनाच्या गलथान कारभाराचा पंचनामा

सातारा,ता.१३(प्रतिनिधी)–

**सातारा शहराला चहुबाजूने अतिक्रमणाचा विळखा पडला आहे. शहरातील अतिक्रमण हा विषय आता इतका गंभीर बनला आहे की त्याचे पडसाद नगर पालिकेच्या पहिल्या सर्वसाधारण सभेत प्रथमच उमटले आहेत. नगरसेवकांनी प्रशासना विरोधात दंड थोपटले आहेत. नागरिकांच्या प्रश्नावर प्रथमच नगरपालिकेच्या इतिहासात नगरसेवकांनी एक संघपणे आवाज उठवल्याचे दिसून आले आहे.**



रस्त्यावरील व रस्त्याकडेला झालेले व्यावसायिकांच्या अतिक्रमणामुळे नागरिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. हतबल झालेले नागरिक या अतिक्रमणाला आता कंटाळलेले आहेत. अतिक्रमणाची शहराला लागलेली वाळवी पाहता ती मुळापासून दूर करणे हे आता प्रत्येकाचे कर्तव्य आहे. राजकीय मंडळी व प्रशासनाची अभद्रयुती होते तेव्हाच अतिक्रमणाचा कर्करोगाप्रमाणे फैलाव होतो याची प्रचिती सातारा शहरातील नागरिक सध्या अनुभवत आहेत.जिकडे तिकडे चोहीकडे अतिक्रमण वाढत असल्याने शहराला बकालतेचे स्वरूप प्राप्त झाले आहे. सर्वसामान्य नागरिकांना याचा मात्र नाहक त्रास सहन करावा लागत आहे. नियम व कायदे हे फक्त सर्वसामान्य नागरिकांनीच पाळावयाचे आणि व्यावसायिकांनी मात्र धुडगूस घालावयाचा असा काही खेळ सातार्‍यामध्ये सुरू आहे त्याला प्रथमच नगरसेवकांनी आवाज उठवून ब्रेक लावण्याची कामगिरी केली आहे. शहरातील अतिक्रमणे वाढीला जबाबदार कोण याबाबत सभागृहात झालेली चर्चा पाहता आता या प्रवृत्तींचा नायनाट होणे गरजेचे आहे असा मतप्रवाह सर्वसामान्य नागरिकांमधून उमटत आहे. सातार्‍यातील सर्व भागात विशेषता चांदणी चौक,मोती चौक, राधिका चौक, राधिका रोड, देवी चौक, पोवई नाका, गोडोली नाका, एसटी स्टँड परिसर, नेताजी सुभाष चंद्र बोस चौक परिसरात वाढलेली अतिक्रमणे विशेषत: फुटपाथवरील व्यावसायिकांची अतिक्रमणे व रस्त्यावरील फेरीवाले हे प्रथम दूर करण्यासाठी नगरसेवकांनी प्रशासनावर दबाव वाढवावा अशी जनतेची अपेक्षा आहे.याच अतिक्रमण करणार्‍या व्यवसायिकां बरोबरच बिल्डर लॉबी यांचाही धुमाकूळ शहरातील विविध भागात अनुभवायला मिळतो.अनेक भागात उभ्या राहत असलेल्या मोठमोठ्या अपार्टमेंटमध्ये पार्किंगची पुरेसी सोय न केल्यामुळे प्लॉटधारक आपली वाहने रस्त्यावर उभी करून ये जा करणार्‍या नागरिकांसाठी व वाहन चालकांसाठी अडथळा ठरत आहेत. अनेकदा यामुळे वाद–विवादाचे प्रसंग घडत आहेत.मुळात शहरातील आतील भागातील अरूंद रस्ते त्यात रस्त्यावरील लावलेली वाहने हे वाहतूक कोंडीला निमंत्रण देत आहेत. अर्थात या सर्व गोष्टींना भ्रष्ट यंत्रणा जबाबदार आहे. सध्या सातारा नगरपालिकेत भाजप प्रणित सत्ता असली तरी या सत्तेवर दोन्ही राजांचे वर्चस्व आहे. श्रीमंत छत्रपती खा.उदयनराजे भोसले व सार्वजनिक बांधकाम मंत्री ना. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी मनावर घेतले तर सातारा शहरातील अतिक्रमणे हा विषय कायमस्वरूपी निकालात निघेल अशी चर्चा सातारकरांमध्ये होत आहे.

सातारा शहरातील अतिक्रमणे बोकाळलेली आहेत यास भ्रष्ट यंत्रणा जबाबदार आहे. त्यात राजकीय आश्रयदात्यांची भर पडली आहे. मतांच्या बेरजेच्या राजकारणापायी शहराला अतिक्रमणाचा विळखा पडत आहे.रस्त्यावर अथवा फुटपाथवर व्यवसाय करणार्‍यांना ना शिस्त,ना नियम त्यामुळे सोकावलेल्या या व्यवसायिकांनी संपूर्ण शहराला घेरले आहे.सर्वसामान्य सातारकर मात्र यामुळे त्रस्त आहे. सातारा शहरातील नगरसेवकांनी याबाबत आवाज उठविला व प्रशासनाचा भ्रष्ट यंत्रणेचा पंचनामा केला यावरून या प्रश्नाची गंभीरता लक्षात येते.

– **श्रीरंग काटेकर.**




माळवाडी (ता.पलूस) येथील मुख्य चौकातील अतिक्रमण हटवल्याने चौकाने घेतलेला मोकळा श्वास.

# माळवाडीतील मुख्य चौकाने घेतला मोकळा श्वास

### अतिक्रमण हटवले : सरपंच अश्विनी साळुंखे यांचा पुढाकार

भिलवडी,ता.१३(वार्ताहर)–

**माळवाडी (ता.पलूस) येथील मुख्य चौकामध्ये असणारे अतिक्रमण सरपंच सौ.अश्विनी साळुंखे यांच्या पुढाकाराने व राजेंद्र रूपटक्के आणि संदीप काटे यांच्या पाठपुराव्याने काढण्यात आले आहे.**

चौकातील वाहतूक कोंडी पाहता हा चौक अतिक्रमणमुक्त व्हावा यासाठी माळवाडी येथील राजेंद्र रूपटक्के आणि संदीप काटे यांनी सरपंच सौ. अश्विनी साळुंखे यांच्याकडे अनेक वेळा निवेदन दिले व सातत्याने या गोष्टीचा त्यांनी पाठपुरावा केला.त्यांच्या या पाठपुराव्यामुळे सरपंच सौ.अश्विनी साळुंखे यांनी अखेर माळवाडीचा चौक अतिक्रमण मुक्त केला. रस्त्याकडेला असणारी दुकाने त्यांनी ग्रामपंचायतीने बांधण्यात आलेल्या सुसज्ज इमारतीमध्ये स्थलांतरित केली व अतिक्रमणामध्ये अडकलेली जागा मोकळी करून घेतली त्या ठिकाणी मुरूम आणि माती याचा वापर करून सपाटी करण करून घेतले. आणि अतिक्रमण मुक्त झालेल्या जागेमध्ये सुसज्ज असे स्टेज उभारणीचे काम सुरू आहे. माळवाडीला सांस्कृतिक कार्यक्रम होण्यासाठी जागा उपलब्ध नव्हती परंतु अतिक्रमण मुक्त झालेल्या जागेमुळे त्या ठिकाणी सांस्कृतिक कार्यक्रम होण्यासाठी जागा उपलब्ध झाली आहे.त्यामुळे या निर्णयाचे स्वागत माळवाडी परिसरातून होत आहे.

### आर्थिक व्यवस्थापन विषयावर मार्गदर्शन कार्यक्रम

ईश्वरपूर,ता.१३(प्रतिनिधी)–

**येथील आयबीएफतर्फे लघु व मध्यम उद्योगांसाठी 'आर्थिक व्यवस्थापन, शिस्त व अनुपालन' या विषयावर मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले आहे. गुरूवार ता. १६ रोजी सकाळी ७.४५ वाजता गायत्री गेस्ट हाऊस, आरआयटी कॉलेज, राजारामनगर येथे हा कार्यक्रम होणार आहे. अध्यक्ष विकास राजमाने यांनी ही माहिती दिली.**

यावेळी चार्टर्ड अकाऊंटंट राहुल झाड व कंपनी सेक्रेटरी अनुजा पाध्ये या मार्गदर्शन करणार आहेत.लघु व मध्यम उद्योग क्षेत्रातील उद्योजकांनी या मार्गदर्शन सत्राचा लाभ घ्यावा,असे आवाहन करण्यात आले आहे.

# जिल्ह्यात राष्ट्रवादी पक्ष बळकट करा

## -निशिकांत भोसले

ईश्वरपूर,ता.१३(प्रतिनिधी)–

**राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीतील कार्यकर्त्यांनी खचून न जाता पुन्हा नव्याने सांगली जिल्ह्यामध्ये पक्ष बांधणीसाठी व बळकट करण्यासाठी सुरुवात करावी. पक्षश्रेष्ठींचे आदेश, पक्ष कार्यक्रम, पक्षाचे विचार, ध्येय धोरण व पक्षाची शिस्त या चौकटीमध्ये राहून प्रत्येक पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी पक्षाचा विस्तार वाढवायला हवा.**

संघटनात्मक कामाला प्राधान्य देणार्‍या पदाधिकारी कार्यकर्त्यांचा पक्षाकडून निश्चितच सन्मान होईल, लवकरच राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या राष्ट्रीय अध्यक्षा व महाराष्ट्रराज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रावहिनी पवार या सांगली जिल्ह्याचा दौरा करणार असल्याची माहिती राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी, सांगली जिल्हा (ग्रामीण) चे जिल्हाध्यक्ष निशिकांत भोसले–पाटील यांनी दिली.



राष्ट्रवादीच्या बैठकीप्रसंगी अजित पवार यांच्या प्रतिमेस अभिवादन करताना निशिकांत भोसले–पाटील व पदाधिकारी

राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी , सांगली जिल्हा (ग्रामीण)च्या जिल्हा कार्यकारणी, जिल्हा सेल अध्यक्ष, जिल्हा महिला अध्यक्षा,जिल्हा युवक अध्यक्ष, तालुका स्तरावरील अध्यक्ष व विधानसभा अध्यक्ष या पदाधिकार्‍यांची महत्त्वपूर्ण बैठक सांगली येथील खरे सांस्कृतिक भवन येथे उत्साहात पार पडली. या बैठकीस जिल्ह्यातील सर्व तालुका व विधानसभा स्तरावरील पदाधिकारी तसेच कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सदर बैठकीत पक्ष संघटना अधिक सक्षम करण्यासाठी विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. मे २०२६ मध्ये सांगली जिल्ह्यातील आठही विधानसभा मतदारसंघांतील एकूण २४८२ बूथ अध्यक्षांसाठी पक्षीय प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय या बैठकीत घेण्यात आला.

यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या आटपाडी तालुका अध्यक्ष पदी शरद तुकाराम नांगरे यांची तर राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी ओबीसी सेलच्या सांगली जिल्हा अध्यक्षपदी आकाश रावसाहेब माळी यांची निवड करण्यात आली. मान्यवरांच्या हस्ते निवडपत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. स्वागत व प्रास्ताविक पदवीधर सेलचे अध्यक्ष प्रा. दत्तात्रय पाटील यांनी केले तर आभार सामाजीक न्याय सेलचे अध्यक्ष संदीप ठोंबरे यांनी मानले.

यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे माजी आमदार व जिल्हा कार्याध्यक्ष विलास जगताप, माजी आमदार व जिल्हा कार्याध्यक्ष राजेंद्रआण्णा देशमुख,राष्ट्रवादी महिला कॉंग्रेस पार्टी अध्यक्षा साधनाताई कांबळे, तैसिन आत्तार, अनिल पाटील, हर्षवर्धन देशमुख, निलेश येसुगडे, जिल्हा उपाध्यक्ष धैर्यशील मोरे, हणमंतराव कदम, शंकर गायकवाड, जिल्हा सरचिटणीस तम्मानगौडा रवी–पाटील,नरेंद्र दिक्षित, तात्यासाहेब नलवडे, जीवन पाटील, रणजीत माने, चिटणीस राजेश लोखंडे, सचिव दिपक मगदूम विविध तालुक्याचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# बिल्डर्स असोसिएशन सातारा सेंटरचा पदग्रहण सोहळा उत्साहात

सातारा,ता.१३(प्रतिनिधी)–

**बिल्डर्स असोसिएशन सातारा सेंटरचा पदग्रहण सोहळा नुकताच संपन्न झाला. यावेळी सातारा सेंटर चेअरमनपदी कौस्तुभ मोरे, सेक्रटरीपदी निलेश शिंदे, व्हाईस चेअरमनपदी हर्षद वालावलकर, ट्रेझररपदी शरद जाधव यांची निवड करण्यात आली.**

नुतन पदाधिकार्‍यांनी मावळते चेअरमन संतोषकुमार जगताप आणि त्यांच्या टीमच्या हस्ते पदभार स्विकारला. नवनिर्वाचित टीम मध्ये जनरल कौन्सिल मेम्बर म्हणून रामदास जगताप, सचिन देशमुख, संतोषकुमार जगताप व कार्यकारिणी सदस्य म्हणून अजय खटावकर, विश्वास नारकर, मिलींद वाईकर, रणजित ढगे, सचिन राजगे, प्रशांत बर्गे,युवराज सावंत, सुधाकर भोसले,चारूदत्त शिंदे, स्वप्निल माने,राजेंद्र फाळके, शंभुराज पाटील, विकास जाधव,शिवाजी ढाणे, महेश पटेल, तेजस जगताप यांची निवड करण्यात आली आहे.




बिल्डर्स असोसिएशन सातारा सेंटरच्या पदग्रहण सोहळ्याप्रसंगी उपस्थित मान्यवर.(छाया–राहुल देशपांडे)

बिल्डर्स असोसिएशन नॅशनल वाईस प्रेसिडेंट ( वेस्ट झोन ) महेश मुद्दा, महाराष्ट्र राज्य चेअरमन प्रकाश मेंडा, स्टेट सेक्रेटरी राम मराठे, किशोर पंजाबी यांच्या हस्ते सर्वांचा सत्कार करण्यात आला.

नुतन पदाधिकार्‍यांना मंत्री छ. शिवेंद्रराजे भोसले,खास.छ. उदयनराजे भोसले,नगराध्यक्ष अमोल मोहिते, उपनगराध्यक्ष ॲड. डि.जी.बनकर यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी अनेक संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुधाकर भोसले, विवेक ठोके यांनी तर आभार निलेश शिंदे यांनी मानले.

# प्रत्येक ग्रामपंचायतीवर भगवा फडकला पाहिजे

## खास.धैर्यशील माने

शिराळा,ता.१३(प्रतिनिधी)–

**शिराळा तालुक्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीवर भगवा फडकला पाहिजे तसेच प्रत्येक ग्रामपंचायतीचा सरपंच शिवसेनेचा असला पाहिजे, असे प्रतिपादन खासदार धैर्यशील माने यांनी केले. ते शिवसेना शिराळा विधानसभा यांच्यावतीने आयोजित नूतन कार्यकारिणी निवड व बूथ लेवल प्रतिनिधी मार्गदर्शनपर कार्यक्रमात बोलत होते.**

यावेळी मंचावर शिवसेनेचे संपर्कप्रमुख आमदार सुहास बाबर उपस्थित होते.मतदार यादीच्या विशेष पुनर्निरीक्षणाबाबत मार्गदर्शन करताना आमदार सुहास बाबर यांनी बीएलओच्या कार्यपद्धतीसह बीएलए यांच्या जबाबदार्‍यांवर सविस्तर मार्गदर्शन केले.




शिवसेनेच्या कार्यक्रमप्रसंगी बोलताना खास.धैर्यशील माने.

यावेळी नगराध्यक्ष पृथ्वीसिंग नाईक यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत शिराळा नगरपंचायतीचे बांधकाम सभापती राजसिंह पाटील यांनी केले. त्यांनी कार्यक्रमाची पार्श्वभूमी स्पष्ट करत मतदार यादी पुनर्निरीक्षणातील जबाबदार्‍यांचे महत्त्व अधोरेखित केले. याप्रसंगी आनंदराव पवार, गौरवभाऊ नायकवडी, कोल्हापूर जिल्हा प्रमुख रवींद्र माने, विश्वप्रतापसिंह नाईक, अवधूत गायकवाड,दीपक गायकवाड यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमात शिराळा तालुक्यातील नूतन कार्यकारिणीचा सत्कार करून त्यांना नियुक्ती पत्रांचे वितरण करण्यात आले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. प्रमोद पाटील यांनी केले.

# कुंभारीत पाझर तलाव फुटून चार कोटींचे नुकसान

## ७० हेक्टर जमिनीचे नुकसान : चाळीसहून अधिक विहिरी बुजल्या

जत,ता.१३(प्रतिनिधी)–

**जत तालुक्यातील कुंभारी येथील गट नं ५७२ मधील चाळीस वर्षांपूर्वीचा गावालगतच्या चव्हाण वस्ती जवळ असलेला पाझर तलाव शनिवारी मध्यरात्री फुटून या भागातील सुमारे चार कोटींचे नुकसान झाले आहे. या घटनेमुळे कुंभारीतील साठ ते सत्तर हेक्टर जमिनीचे अतोनात नुकसान झाले आहे.तर तलवाचे एक कोटीचे नुकसान झाले आहे.**

दरम्यान, ही घटना घडताच जतचे माजी आमदार विक्रमदादा सावंत यांनी थेट शेतकर्‍यांच्या बांधावर जाऊन पाहणी करत त्यांना धीर दिला.कुंभारीच्या हिवरे रस्त्यावरील चव्हाण वस्ती येथे चाळीस वर्षांपूर्वी पाझर तलावाची उभारणी करण्यात आली आहे. या तलावाच्या मुख्य बांधामध्ये घूस व सायाळ यांनी केलेल्या छिद्रांमुळे बांध कमकुवत झाला होता. शिवाय संबंधित विभागाने याची अलीकडच्या काळात कुठलीही देखभाल दुरुस्ती न केल्याने तलावास गळती लागून तलावाचा बांध अचानक फुटला. दीड तास पाणी वाहून कोसारी तलाव क्रमांक एक पर्यंतची शेती या पाण्यात वाहून गेली आहे. विशेष म्हणजे साठ ते सत्तर विहिरी गाळाने जमीनदोस्त झाल्या आहेत. वेगवान पाण्याच्या प्रवाहामुळे शेतातील ऊस, मका तसेच विविध बागायती पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. इतकेच नव्हे तर अनेक शेतातील सुपीक माती वाहून गेल्याने शेतीची उर्वरित क्षमता देखील मोठ्या प्रमाणावर कमी झाली आहे. काही ठिकाणी तर पिकांसह जमिनीची वरचे थरच वाहून गेल्याचे चित्र दिसून येत आहे. या दुर्घटनेत अंदाजे ६० ते ७० हेक्टर क्षेत्रातील शेती बाधित झाली. यात पाण्याचे स्रोतही नष्ट झाले आहेत. भविष्यातील शेतीसाठीही गंभीर अडचणी निर्माण झाल्या आहेत.शेतकर्‍यांच्या आयुष्यभराच्या मेहनतीवर पाणी फिरले असून त्यांना मोठा आर्थिक फटका बसला आहे.



तलाव फुटल्याने झालेल्या नुकसानीची पाहणी करताना माजी आम. विक्रम सावंत व इतर मान्यवर.

### पुण्याच्या अधिकार्‍यांनी केली पाहणी

रविवारी सकाळी जलसंधारण पुणेआणि जत मधील अधिकार्‍यांनी या तलावाच्या नुकसानीची पाहणी केली. यावेळी सभापती अर्चना पाटील, नाथाभाऊ पाटील, शेतकरी उपस्थित होते. हा तलाव तातडीने दुरुस्ती करून शेतकर्‍यांना मदत केली जाईल असे त्यांनी सांगितले. कृषी आणि महसूल विभागाने देखील पंचनामे पूर्ण केले आहेत. पिके आणि जमीन दुरूस्ती यासाठी तातडीने मदत मिळावी अशी मागणी सभापती अर्चना पाटील यांनी केली. यावेळी शेतकरी नानासाहेब सूर्यवंशी, प्रभाकर जाधव,सरपंच कृष्णा जाधव, उपसरपंच अजित सूर्यवंशी, काकासो शिंदे, महादेव सूर्यवंशी, भानुदास जाधव,सोपान जाधव,निलेश बामणे,राम मंगसुळी, अशोक जाधव यांच्यासह नुकसानग्रस्त शेतकरी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान, गावकर्‍यांनी संबंधित विभागाच्या दुर्लक्षामुळे ही दुर्घटना घडल्याचा आरोप केला. तलावाच्या बांधामध्ये घूस व सायाळ यांनी केलेल्या छिद्रांमुळे बांध कमकुवत झाला होता.याकडे संबंधित विभागाच्या अधिकार्‍यांनी दुर्लक्ष केल्याने ही दुर्दैवी घटना घडली असल्याचे आरोप त्यांनी केला.

- **पाझर तलाव फुटल्याने सुमारे ४ कोटींचे नुकसान**
- **७० हेक्टर शेती पूर्णपणे बाधित**
- **४० हुन अधिक विहिरी गाळाने बुजल्या**
- **ऊस, मका व बागायती पिकांचे मोठे नुकसान**

## थोडक्यात



खासदार धनंजय महाडीक यांचा सत्कार करताना सम्राट महाडीक, राहुल महाडीक व अन्य मान्यवर.

### शासनाच्या जनकल्याणाच्या योजना तळागाळापर्यंत पोहोचवा

#### खास.धनंजय महाडीक

ईश्वरपूर,ता.१३(प्रतिनिधी)–

**शासनाच्या जनकल्याणकारी योजना तळागाळापर्यंत प्रभावीपणे पोहोचवणे हे भारतीय जनता पार्टीच्या प्रत्येक कार्यकर्त्याचे कर्तव्य असल्याचे प्रतिपादन राज्यसभा खासदार धनंजय महाडीक यांनी केले.**

तांबवे येथे आयोजित पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाभियान शिबिरात ते बोलत होते.यावेळी भाजप सांगली जिल्हाध्यक्ष सम्राट महाडीक,आमदार सत्यजितभाऊ देशमुख,माजी आमदार पृथ्वीराज देशमुख, सांगली जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक राहुल महाडीक, चिमण डांगे, क्रांती सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन शरदभाऊ लाड, जत नगरपालिकेचे नगराध्यक्ष डॉ. रवींद्र आरळी यांची प्रमुख उपस्थिती होती. शिबिरात जिल्हा सरचिटणीस डॉ. सचिन पाटील, जिल्हा उपाध्यक्ष सुरेंद्र चौगुले, जि.प. सदस्य जयराज पाटील, जगन्नाथ माळी, सौ. विद्याताई पाटील, पंचायत समिती सदस्य समर्थ पाटील, शुभम पाटील, प्रदीप कांबळे, वनश्री दूध संघाचे संचालक उद्धव जाधव आदी उपस्थित होते.

### इंद्रप्रस्थ नागरी पतसंस्थेस ५ कोटी ८२ लाखांचा नफा

ईश्वरपूर,ता.१३(प्रतिनिधी)–

**सांगली इंद्रप्रस्थ नागरी सहकारी पतसंस्थेस नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात संस्थेस ५ कोटी ८२ लाखांचा नफा झाल्याची माहिती संस्थेचे चेअरमन संग्रामसिंह पाटील यांनी दिली.**



पतसंस्थेने १२५ कोटी ६४ लाख रूपयांच्या ठेवीचा टप्पा पार केला असल्याचे त्यांनी सांगितले इंद्रप्रस्थ पतसंस्थेचे संस्थापक मार्गदर्शक दिलीपराव पाटील यांच्या मार्गदर्शनामुळे संस्थेची १५० कोटी रूपयांच्या ठेवीकडे यशस्वी वाटचाल सुरू आहे. १०८ कोटी ५६ लाख रूपयांचा कर्ज पुरवठा केला असून संस्थेचा एकूण व्यवसाय २३४ कोटी २० लाख रूपयांचा झाला आहे. सद्या संस्थेच्या सांगली जिल्हा कार्यक्षेत्रात सांगली, तासगांव, आष्टा, शिराळा, मणेराजूरी, पलूस व इस्लामपूर शहरामध्ये दोन अशा आठ शाखा सद्या कार्यरत आहेत.

### विनायक शिंदेचे संचालकपद अपात्र करण्यास घाई का?

सांगली,ता.१३(प्रतिनिधी)–

**शिक्षकांचे संघटन मजबूत करणार्‍या विनायकराव शिंदे यांचे शिक्षक बँकेतील संचालक पद अपात्र करणार्‍या सत्ताधारी संचालकांचा जाहीर निषेध शिक्षक संघाच्या जिल्ह्याच्या बैठकीत करण्यात आला. शिंदेंना अपात्र करण्याची संचालकांना एवढी घाई का झाली आहे, असा सवाल यावेळी जिल्ह्यातून आलेल्या शिक्षक कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.**

**जिल्हा शिक्षक संघाच्या बैठकीत शिक्षकांचा सवाल**

आरबीआयच्या कायद्यानुसार १० वर्षापेक्षा अधिक कालावधी असणार्‍या संचालकाचे पद रद्द करण्याचा अधिकार सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, पुणे यांनाच आहे. संचालक मंडळाला नाही.विद्यमान संचालकाला मुदत संपेपर्यंत अपात्र करता येत नाही. मात्र यानंतरच्या निवडणुकांसाठी त्यांचा अर्ज अपात्र होऊ शकतो.यावेळी शिक्षक बँकेचे व्हाईस चेअरमन फत्तु नदाफ,संतोष जगताप,सौ.अनिता काटे, संचालक अजितराव पाटील, शिवाजी जाधव, शरद चव्हाण, शामगोंडा पाटील, गांधी चौगुले,सुधाकर पाटील, संजय काटे आदी उपस्थित होते.



# महासत्ता इचलकरंजी आरोग्य



मंगळवार
१४ एप्रिल २०२६




# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आरोग्यविषयक विचार

**अध्यक्ष महोदय,** या अर्थसंकल्पातील सार्वजानिक आरोग्यावरील तरतद किती तोकडी आहे ते पहा. एकूण अर्थसंकल्पिय खर्चाच्या अवघी अडीच टक्के! आमची खेडी पाण्यासाठी आक्रोश करत आहेत. शेकडो गावांना पाणी परवठ्याची कोणतीही व्यवस्था नाही. आमची खेडी म्हणजे निव्वळ उकीरडे झाले आहेत. त्यांना गाव म्हणणेच चूक आहे.ग्रामीण भागात सांडपाण्याची व्यवस्था करणे अत्यंत आवश्यक आहे. मलेरियाने, इतर आजारांनी शेकडो लोक मरण पावताहेत. ग्रामीण भागात क्वचितच एखादा दवाखाना दिसतो आहे. औषध वाटपासाठी आणि वैद्यकीय उपचारासाठी कोठेही कसलीही सविधा दृष्टोत्पत्तीस येत नाही. पिण्याच्या पाण्याअभावी, वैद्यकीय मदतीअभावी शेकडो लोक मरताहेत.

दि. २ मार्च १९३८ रोजी त्यावेळच्या मंबई प्रांताच्या ऍसेम्ब्लीमध्ये डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी केलेले हे भाषण ! बाबासाहेब आंतरराष्ट्रीय कीर्तीचे अर्थतज्ञ होते,समाजशास्त्रज्ञ होते. त्यांनी सार्वजानिक आरोग्याचे सामाजिक प्रगतीतील स्थान नेमके ओळखले होते आणि म्हणनच सार्वजानिक आरोग्याच्या संदर्भातील आपली भमिका अधिक विस्ताराने विविध अभ्यासांचे संदर्भ देताना विविध अभ्यासांचे संदर्भ देत ते अनेकवेळा मांडताना दिसतात.

देशभरातील दलित पददलित जनसमह हा बाबासाहेबांच्या विचारांचा केंद्रबिंद राहिलेला आहे आणि या जनसमहाला सखी समाधानी करण्याची क्षमता असणारा सार्वजानिक आरोग्याचा विषय त्यांच्या जिव्हाळ्याचा होता आणि म्हणनच या वंचित समाजगटाला सार्वजानिक आरोग्य सविधा परवण्यासंदर्भात ते वेळप्रसंगी आक्रमक होताना दिसतात.

सार्वजानिक आरोग्यासाठीची आर्थिक तरतद अत्यंत अपरी आहे, असे आपण विधीमंडळात सांगत असताना अर्थमंत्री मात्र हसताना दिसतात आणि बाबासाहेबांचा राग अनावर होतो, माझे सन्माननीय मित्र,मंत्रीमहोदय हसताहेत.त्यांनी हसलेच पाहिजे.ते दुसरं काय करु शकतात? असे बाबासाहेब संतापाने म्हणतात. त्यावर दुसरा एक सदस्य खोडकरपणे बोलतो,मग त्यांनी रडावे का ?

यावर बाबासाहेब म्हणतात,होय त्यांनी रडायला हवे. त्यांना रडताना पहायची माझी इच्छा आहे कारण त्यांचे अश्रू त्यांच्या भावना सांगतील, या प्रश्नाबद्दल असणारी त्यांची सहानभती दाखवतील. पण असे संवेदनाशन्य हस आपणाला कोठे घेऊन जाईल ?

बाबासाहेबांची ही प्रतिक्रिया त्यांचा सार्वजानिक आरोग्यविषयक जिव्हाळा स्पष्ट करते.या जिव्हाळ्यातनच सार्वजानिक आरोग्यासंदर्भातील अनेक प्रश्नांवर आपल्याला आजही थक्क करणारी,काळाच्या पढे जाणारी सस्पष्ट भमिका बाबासाहेब घेताना दिसतात.संततीनियमन हा असाच एक महत्वाचा प्रश्न.आज सहजतेने प्रत्येकाने स्वीकारलेला हा विषय स्वातंत्र्यपर्व काळातील एक अत्यंत वादग्रस्त विषय होता.१९२० सालापासन र.धों.कर्वे यांनी संतती नियमनाची प्रचार आपल्याकडे सरु केला होता खरे;पण रधो अक्षरशः आगीतन चालत होते. १९२१ साली मार्गारेट सँगरने अमेरिकन बर्थ कन्ट्रोल लीग स्थापन केली होती. १९३५ साली ती भारतात आली होती आणि संततीनियमनासंदर्भात ती म.गांधींना भेटली होती; पण माल्थसपासन म.गांधीजीं पर्यंत सर्वांची भमिका एकच होती. संततीनियमनाची आवश्यकता त्यांना मान्य होती ; पण त्यासाठीच्या कृत्रिम उपायांना त्यांचा विरोध होता. आत्मसंयमन हा त्यावरील सर्वोत्तम उपाय वाटत होता. एक किंवा दोन अपत्यप्राप्तीनंतर विवाहांतर्गत ब्रम्हचर्य पाळणे हाच गांधीजींच्या संततीनियमनाचा मार्ग होता. डॉ. आंबेडकरांनी या विषयावर घेतलेली भमिका गांधी आणि माल्थसच्या भमिकेपेक्षा अधिक व्यवहार्य आहे. एकमेकांवर प्रेम करणारे दोन तरुण जीव पती-पत्नी या नात्याने एकत्र रहात असताना आत्मसंयम आणि ब्रम्हचर्य या गोष्टी अत्यंत अव्यवहार्य आहेत, असे बाबासाहेबांचे स्पष्ट मत होते.

सर्वसामान्य माणसं वासनेला बळी पडतात हे उघड्या डोळ्यांना दिसणारे वास्तव नाकारण्यात काय अर्थ ?

१० नोव्हेंबर १९३८ रोजी मंबई प्रांताच्या विधीमंडळात बाबासाहेबांच्या वतीने संतती नियमनविषक ठराव श्री. पी. जे. रोहम यांनी मांडला. या ठरावात बाबासाहेबांची संततीनियमनविषयक भमिका सविस्तरपणे येते. या प्रश्नाचा बाबासाहेबांनी सर्व बाजंनी विचार केला आहे हेही आपल्याला जाणवते. कुटंब नियोजनाची कृत्रिम साधने वापरणे पाश्चात्य समाजासाठी योग्य आहे;पण आपला समाज हा अध्यात्मिक समाज आहे, त्यामळे आत्मसंयमन आणि ब्रम्हचर्य यांचे महत्व त्याला उमजते अशी अनेकांची भमिका होती. मंबई विधिमंडळातील एक सहकारी श्रीमती सरोजिनी मेहता यांनी वाटलेली पत्रके बाबासाहेब उधृत करतात.केवळ जग हे माया आहे ही व यासारखी वाक्ये पोपटपंची सारखी म्हटल्याने कोणी अध्यात्मिक होतो का?असा रास्त प्रश्न विचारुन



स्त्री-परुष संबंधांतील वास्तव बाबासाहेब मांडतात आणि लोकसंख्या नियंत्रणासाठीची व्यवहार्य भमिका घेण्याची विनंती करतात.

संतती नियमनाच्या अभावाचे चटके बाबासाहेबांनी स्वतःच्या जीवनात घेतले होते. ते स्वतः त्यांच्या माता-पित्यांचे चौदावे अपत्य होते.

कुटंबाच्या अवाजवी आकारामळे बसणारे दारिद्र्याचे चटके त्यांनी सोसले होते. मांजरपाटाचे शर्ट, फाटलेला कोट, चपला नसणे, अनेकवेळा खिशात दिडकीही नसणे अशा अवस्थेत त्यांना शिक्षण घ्यावे लागले होते. बाबासाहेबांना स्वतःला पाच मले झाली होती. त्यातील चार मत्य पावली. राजरत्नाच्या वेळी तर बीबीसाहेब धाय मोकलन रडले. या पाच बाळंतपणामळे त्यांच्या प्रिय रमाबाईंची प्रकृती खालावली. त्यातच १९३५ साली त्यांचे निधन झाले.

बाबासाहेब अत्यंत हळवे होते. आपल्या मुलांच्या मृत्यूबद्दल त्यांनी लिहिले आहे, आमच्या चार लहानग्यांचे अंत्यविधी करण्याचे दुर्दैव आम्हांवर ओढवले या विचारांनीच मला गदमरायला होते. माझा लहानगा राजरत्न तर फारच गोजिरा होता. त्याच्या जाण्याने माझे आयुष्य काट्याचे बन झाले आहे.

पण महापरुष आपली दःखे कवटाळन बसत नाहीत. समाजाच्या विशाल दुःखाशी त्यांची नाळ जोडतात आणि नव्या परिवर्तनासाठी संघर्षरत होतात.

अतिरेकी जन्मदर हाच आपल्या समाजातील वाढत्या दारिद्र्याचे, बालमृत्य आणि माता मृत्यचे कारण आहे हे बाबासाहेबांनी नेमके हेरले होते आणि म्हणनच बाबासाहेबांनी म्हटले आहे- आपल्याला मल होऊ द्यावे अथवा नाही हा निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य प्रत्येक स्त्रीला असले पाहिजे आणि कोणत्याही कारणासाठी जर एखाद्या स्त्रीला मल होऊ देण्याची इच्छा नसेल तर तिला ती गर्भधारणाच टाळता येण्याची सविधा असली पाहिजे.

प्रत्येक गोष्ट काटेकोरपणे तपासन पाहणारा बाबासाहेबांमधला समाजशास्त्रज्ञ संततीनियमनावरील या चर्चेत आपल्याला ठळकपणे दिसतो. बालविवाह बंद होऊन मलींच्या विवाहाचे वय वाढल्याने आपोआपच लोकसंख्या नियंत्रण होईल, त्यासाठी संततीनियमनाची गरज नाही,असे काहींना वाटत होते; पण १९३१च्या जनगणनेवरील श्री. पी. के. वत्तल यांचे जननदरासंबंधीचे अभ्यासपर्ण संशोधनच बाबासाहेबांनी सभागृहासमोर ठेवले आहे, वीस वर्षांच्या नंतर लग्न झालेली मलगी वीस वर्षांच्या आत लग्न झालेल्या मलीपेक्षा कमी मलांना जन्म देते आणि वीस वर्षांनंतर लग्न झालेल्या मुलीला मलीला झालेली मले वीस वर्षांच्या आत लग्न झालेल्या मुलीच्या अपत्यांपेक्षा जगण्याची शक्यता जास्त असते.

सर्व्हायवल रेट असा शब्दप्रयोग बाबासाहेबांनी वापरला आहे. म्हणजेच केवळ मलीच्या लग्नाचे वय वाढन लोकसंख्या नियंत्रण होणार नाही, त्यासाठी संतती नियमनाच्या पध्दतीच वापराव्या लागतील, हे बाबासाहेब सप्रमाण सिध्द करतात.

देशांतर-स्थलांतर, संपत्तीचे समान वाटप किंवा स्त्री आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी झाल्याने आपोआप लोकसंख्या नियंत्रण होणार नाही. त्यासाठी संततीनियमन साधनांचा आधार घ्यावाच लागेल, हे बाबासाहेब सोदाहरण स्पष्ट करतात.

संतती नियमनामळे आपल्या वंशाची, धर्माची लोकसंख्या कमी होऊन आपले बळ घटेल असा भयगंडही अनेक मलतत्ववाद्यांच्या मनात घर करुन बसला आहे.

जननदर नव्हे तर सर्व्हायवल रेट महत्वाचा आहे, हे आंबेडकर स्पष्ट करतात. वाढत्या जन्मदरासोबत बालमृत्यदर व मातामृत्यदरही वाढतो. महायध्दांमध्ये कमी जननदर असणाऱ्या राष्ट्रांनी अधिक जननदर असलेल्या राष्ट्रांवर कुरघोडी केली या इतिहासापासन धडा घेण्यास बाबासाहेब सांगतात. आधनिक यध्दांना माणसे लागत नाहीत, आधनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने यध्दे खेळली जातात आणि मळात लोकसंख्या नियंत्रणामळे दारिद्र्य कमी झाले की यध्दखोरी आपोआपच कमी होते. ऐश्वर्य, संपत्ती, प्रतिष्ठा, संस्कृती या गोष्टी लोकसंख्येवर नव्हे, तर गणवत्तेवर अवलंबन असतात,हे सांगताना बाबासाहेब आपल्याकडील पारशी समाजाचे उदाहरण देतात.

लोकसंख्या नियंत्रणाचे महत्व विशद करताना बाबासाहेबांनी अनेक देशांचे दाखले दिले आहेत. एक तृतीयांश अमेरिकन नागरिकांना कमी प्रतीच्या अन्नावर गजराण करावी लागते हे त्यावेळच्या अमेरिकन अध्यक्ष रुझवेल्ट याचे उद्गार आंबेडकरांनी उधृत केले आहेत. आपल्यापेक्षा कमी जननदर असलेल्या अमेरिकन जनतेला परेसे अन्न मिळत नाही, यापासन आपण बोध घ्यायला हवा.

प्रत्येक विषयातील बाबासाहेबांचा सक्ष्म अभ्यास ठायी ठायी दिसन येतो.मंबईचे उदाहरण देत बाबासाहेब सांगतात, मंबईला दर माणशी दररोज एक पिंट(समारे अर्धा लिटर) दूधाची गरज आहे पण प्रत्यक्षात अवघे सव्वा तोळा दध मिळते

संतती नियमनावरील हा बिनसरकारी ठराव विधिमंडळात मांडताना डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वतंत्र मजर पक्षाचे मंबई विधानसभेतील नेते होते. त्यांचे १४ सहकारीही विधानसभेवर होते. हा ठराव मतदानासाठी मांडताना बाबासाहेब म्हणाले होते, मंबई हे भारताचे प्रवेशव्दार आहे. याच प्रवेशव्दारातन संतती नियमनाची ही चळवळ या प्रांतात प्रवेशली आहे. या प्रांतात ही चळवळ फोफावायला हवी. आपले नाव अमर होईल अशी कृती करण्याची संधी व्यक्तीला क्वचितच लाभते.आपल्या प्रांतिक सरकारला ही संधी संतती नियमनाच्या चळवळीने दिली आहे. आमचे प्रांतिक सरकार ही संधी हातातन दवडणार नाही.

परंपरेची पगडा असणाऱ्या विधिमंडळाला बाबासाहेबांची ही कालदर्शी नजर उमजली नाही आणि संततीनियमनाचा हा ठराव ५२ विरुध्द १ एवढ्या प्रचंड फरकाने फेटाळला गेला पण त्यानंतर १३ वर्षांनी म्हणजे १९५१ साली भारत सरकारला बाबासाहेबांनी दाखवलेल्या वाटेनेच जावे लागले आणि पहिल्या पंचवार्षिक योजनेत कुटंबनियोजन धोरणाचा अवलंब करण्यात आला.

अर्थात बाबासाहेबांना आपल्या जनतेच्या शहाणपणाबद्दल परेपर खात्री होती आणि म्हणन ते १९३८ सालीच म्हणाले होते,आपले हित कशात आहे हे आपल्या देशातील अडाणी माणसालाही चांगले कळते.संततीनियमनाच्या साधनांच्या शोधाबद्दल व त्यांच्या उपलब्धतेबद्दल माहिती मिळताच ते त्याचा परेपर वापर करतील यात मळीच शंका नाही.इतिहासतज्ञ, समाजशास्त्रज्ञ,विधिज्ञ, पुरातत्वशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ म्हणून बाबासाहेबांना आपण सारेच ओळखतो पण सार्वजानिक आरोग्याच्या क्षेत्रातील त्यांचे महत्वपर्ण योगदान लक्षात घ्यावयाची गरज आहे. फेब्रुवारी १९२७ मध्ये मंबई विधिमंडळात दारु प्रश्नावर बोलताना भारतातील विविध प्रांतात दर डोई दारुवर होणाऱ्या खर्चाचे आकडेच उधृत केले आहेत आणि इतर प्रांताच्या तलनेत मंबई प्रांतात दारुवरील दरडोई खर्च अडीचपट आहे, हे सांगितले आहे. प्रत्यक्ष खपापेक्षा जास्त दारुचे परवाने का दिले जात आहेत असा जाब त्यांनी सरकारला विचारला आहे.दारुचे व्यसन सर्वसामान्यांच्या बरबादीचे प्रमख कारण आहे आणि म्हणनच बाबासाहेब प्रांतिक सरकारलो खडसावतात,जनतेची उन्नती हे सरकारचे उद्दिष्ट असले पाहिजे. तम्ही त्यांना भिकारी बनव नका.जनतेला भिकेस लावणारे सरकार अखेरीस स्वतःच भीक माग लागते.

बाबासाहेबांचे हे जहील शब्द सर्वसामान्यांविषयी असलेल्या कळवळ्यातन आले आहेत.

१९३६ साली स्वतंत्र मजर पक्षाची स्थापना बाबासाहेबांनी केली. कामगारांच्या कामाचे तास व किमान वेतन ठरविण्यासोबतच आजारी रजा, वृध्दत्व पेन्शन, अपघात नकसान भरपाई इतर आरोग्य सविधा या साऱ्या गोष्टे पक्षाच्या ध्येयधोरणाच्या प्रमख घटक होत्या.

स्त्री कामगारांना गरोदरपणात हक्काची पगारी सट्टी मिळावी, प्रसतिपर्व आणि प्रसतिपश्चातही विश्रांती मिळावी आणि साऱ्याची आर्थिक जबाबदारी सरकारने घ्यावी, ही बाबासाहेबांची इच्छा होती.मजर मंत्री असताना मॅटर्निटी बेनेफिट ऍक्ट लाग होण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले.

सार्वजनिक आरोग्य हा खरे म्हणजे आंतरविद्याशाखीय समज असणाऱ्या प्रज्ञावंतांचा विषय. आणि म्हणनच इतिहास, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, कायदा, राज्यशास्त्र या सारख्या विषयात गती असणारे बाबासाहेब जेव्हा सार्वजनिक आरोग्यावर बोलू लागतात तेव्हा ते रुढ अर्थानेही समाजाचे खरेखरे डॉक्टर आहेत याची खात्री पटते. नाहीतरी एका माणसाच्या दखण्याचा इलाज कोणा डॉक्टरच्या क्लिनिकमध्ये होऊ शकत असेल पण समाजाच्या सामहिक दखण्यांसाठीची वाट सामाजिक,आर्थिक आणि राजकीय परिवर्तनातूनच गवसत असते.

-डॉ.प्रदीप आवटे

# Neuroplasticity बदलणाऱ्या मेंदूची आश्चर्यकारक कहाणी

**डॉक्टर,** आता माझ्या वयात काही नवीन शिकणं शक्य आहे का?
हा प्रश्न मी कित्येकदा ऐकला आहे.
शाळकरी मलांपासन ते ७० वर्षांच्या आजोबांपर्यंत,सगळ्यांच्याच मनात कुठेतरी एक भीती असते
मेंदूची मर्यादा संपली आहे का?
या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी आपल्याला थोडं मागे जावं लागेल
इतिहासात, अनुभवांत आणि मग थेट मेंदूच्या आत.



इतिहास सांगतो: मेंद बदलतो, फक्त आपण उशिरा समजलो
आज Neuroplasticity ही आधुनिक संकल्पना वाटते,
पण माणसाने मेंदू बदलताना पाहिलं आहे शेकडो वर्षांपासन.

१९व्या शतकातील मोठा गैरसमज
१९व्या शतकात विज्ञान म्हणत होतं मेंद म्हणजे यंत्र आहे.
एकदा खराब झाला की कायमचा.
पॉल ब्रॉका यांनी मेंदचे विशिष्ट भाग विशिष्ट कामांसाठी असतात हे दाखवलं.
यातन असा निष्कर्ष काढला गेला की, एखादा भाग गेला = क्षमता कायमची गेली.

यद्धानंतर बदललेली चिकित्सा
पहिल्या आणि दुसऱ्या महायद्धानंतर हजारो सैनिक मेंदच्या जखमांसह परतले.
डॉक्टरांनी अपेक्षा सोडली होती.
पण काही महिन्यांनी त्या जखमी सैनिकांचे
* बोलणं परत आलं
* चालणं सधारलं
* स्मरणशक्ती हळूहळ परतली

Neuroplasticity चा जन्म
कॅनडाचे मानसशास्त्रज्ञ डोनाल्ड हेब यांनी १९४९ मध्ये एक साधं पण क्रांतिकारी वाक्य लिहिलं:
जे न्यूरॉन्स एकत्र सक्रिय होतात, ते एकमेकांशी जोडले जातात.
याच वाक्यावर Neuroplasticity उभी आहे.
आज आपण जाणतो
* मेंदूतील पेशींची संख्या नव्हे
* तर त्यांच्यातील जोड महत्त्वाची असते

मेंद आतन कसा शिकतो?
मेंदूतील न्यरॉन्स म्हणजे छोट्या दिव्यांसारखे.
जेव्हा आपण एखादी गोष्ट पन्हा-पन्हा करतो
* काही दिवे वारंवार पेटतात
* त्यांच्यातील जोड मजबत होते
* सिग्नल वेगाने जातो
न वापरलेले मार्ग हळहळ बंद होतात.
शिकणं म्हणजे नवीन रस्ते/ जोड तयार करणं.

आजी, स्मार्टफोन आणि संयम
६५ वर्षांच्या आजीला स्मार्टफोन शिकवताना नातवाला त्रास झाला.
आजी म्हणायच्या,
माझ्या मेंदचं वय झालंय.
पहिले काही दिवस चका, चिडचिड, थकवा येत होता .
पण रोज फक्त १५ मिनिटं फोनचा वापर केला गेला.
तीन महिन्यांनी आजीला व्यवस्थित फोन वापरायला येव लागला, आता ती स्वतः खालील गोष्टी करू शकते.
* व्हिडिओ कॉल करणे
* फोटो काढणे
* आवाजाचे मेसेज पाठवणे
मेंद बदलला.वयाने नाही तर सरावाने.

स्ट्रोकनंतर पन्हा उभा राहिलेला माणस
५० वर्षांच्या रुग्णाला स्ट्रोक झाला.
उजवा हात-पाय निकामी झाला .
फिजिओथेरपी सरू झाली.
हळूहळू लहान हालचाली येव लागल्या. मेंदूचा खराब भाग शांत झाला,
इतर भागांनी जबाबदारी घेतली.
आज तो स्वतः चालतो अगदीच पर्वीसारखा नाही पण आधाराशिवाय चालतो.
हा चमत्कार नाही.**(क्रमशः)**

-डॉ.वैभव चव्हाण
मो.९३७१८४७६६७



**उन्हाळ्यात दिवसभर येणाऱ्या घामामुळे कंटाळला आहात?**

**वर्षाच्या** बाराही महिने शरिराला घाम येतो. शरिरात साचून राहिलेले विषरी घटक घामावाटे बाहेर पडून जातात. उन्हाळा ऋतूला सुरुवात झाल्यानंतर नेहमी पेक्षा खूप जास्त घाम येतो. सतत येणाऱ्या घामामुळे अंग चिकट झाल्यासारखे वाटते आणि काखेत घामाची खूप जास्त दुर्गंधी येते. घामाच्या दुर्गंधीमुळे काहीवेळा महिलांचा आत्मविश्वास कमी होऊन जातो. ट्रेन किंवा रिक्षामधून फिरताना घामामुळे कपडे खूप जास्त ओले होऊन जातात. काहीवेळा सतत येणाऱ्या घामामुळे काखेत घाणीचा चिकट थर जमा होतो आणि काख पूर्णपणे काळी दिसू लागते. काखेत वाढलेला काळेपण कमी करण्यासाठी महिला सतत काहींना काही करत असतात. घामाची दुर्गंधी घालवण्यासाठी महागडे डीओ किंवा परफ्यूम वापरले जातात, पण याचा सुगंध जास्त वेळ टिकून राहत नाही. तसेच केमिकल युक्त डीओ किंवा परफ्यूमचा वापर केल्यामुळे त्वचेचे नुकसान होण्याची जास्त शक्यता असते. म्हणनच आज आम्ही तुम्हाला उन्हाळ्यात सतत येणाऱ्या घामापासन सुटका मिळवण्यासाठी तुरटीचा वापर कशा पद्धतीने करावा, याबद्दल जाणून घेऊया सविस्तर माहिती

प्रत्येक घरात कायमच तुरटी उपलब्ध होते. तुरटीचा वापर केल्यामुळे पाण्यातील विषाणू नष्ट होतात. त्याप्रमाणे त्वचा आणि शरिरासाठी सुद्धा केला जातो. तुरटीमध्ये सल्फर नावाचे घटक असते. सल्फरमध्ये बॅक्टेरिया नष्ट करण्याची क्षमता असते. त्यामुळे तुरटीचा वापर करावा. काखेत वाढलेला काळेपणा कमी करण्यासाठी तुरटीचा वापर करावा. यासाठी अंघोळ करताना तुरटी पाण्यात भिजवून काखेत लावावी. आठवडाभर नियमित काखेत तुरटी लावल्यामुळे काळेपणा कमी होण्यास मदत होईल. यामुळे दिवसभरात सतत येणाऱ्या घामाच्या धारा नियंत्रणात राहण्यास मदत होते. उन्हाळ्यात सतत घाम येत असल्यास अंघोळीच्या पाण्यात तुरटी मिक्स करून अंघोळ करावी. तुरटी काखेत किंवा मानेवर वाढलेला काळेपणा कमी करण्यासाठी सुद्धा फार महत्वाचे ठरते. मानेवर वाढलेला काळेपणा कमी करण्यासाठी दोन आठवड्यांपर्यंत मानेवर तुरटी लावावी. तुरटी लावून हलक्या हाताने मसाज करून नंतर पाण्याने त्वचा स्वच्छ करून घ्या. तुरटीमध्ये असलेले पोटॅशिअम आणि ॲल्युमिनिअम युक्त घटक आढळून येतात. यामुळे शरीर स्वच्छ होते.काखेत वाढलेले काळे डाग कमी करण्यासाठी तुरटीचा फेसपॅक बनवून लावावा. यासाठी वाटीमध्ये तुरटी पावडर घेऊन त्यात लिंबाचा रस मिक्स करा. तयार केलेला फेसपॅक संपूर्ण चेहऱ्यावर लावून काहीवेळ तसेच ठेवा. यामुळे काळे डाग कमी होण्यासोबतच पिंपल्समधील घाण स्वच्छ होण्यास मदत होते. आठवड्यातून दोनदा किंवा तीनदा तुरटीचा फेसपॅक लावल्यास त्वचा उजळदार होईल. तुरटी लावल्यानंतर चेहरा कोरडा पडण्याची शक्यता असते.

# उन्हाळ्यात सब्जा बिया खाव्यात की नाही?

**उन्हाळा** ऋतूला सुरुवात झाल्यानंतर आहारात बदल केला जातो. वाढत्या उष्णतेचा परिणाम शरिरावर होऊ नये म्हणन वेगवेगळ्या पौष्टिक पदार्थांचे सेवन केले जाते. कधी थंड दूध, ताक, दही, लस्सी प्यायली जाते तर कधी बाजारात विकत मिळणारे पॅक बंद सरबत प्यायले जातात. शरिराला आतन थंडावा देणाऱ्या पदार्थांचे सेवन करण्याचा सल्ला कायमच दिला जातो. अशावेळी सब्जाचे सेवन केले जाते. सब्जा खाल्ल्यामुळे शरिराला खप जास्त फायदे होतात. यामध्ये असलेले गुणकरी घटक शरिरात वाढलेली उष्णता कमी करतात आणि आरोग्य सुधारण्यास मदत होते. सब्जा बिया फालुदा, सरबत किंवा विविध फळांपासून बनवलेली पेय बनवण्यासाठी केला जातो. उन्हाळ्यात वाढते पित्त आणि पोटाच्या सर्व समस्यांपासून आराम मिळवण्यासाठी सब्जा बियांचे पाणी किंवा पेय बनवून प्यायली जातात.



सब्जा बियांचे सेवन केल्यामुळे पचनक्रिया सधारते, शरिरातील उष्णता कमी होते आणि शरीर हायड्रेट राहण्यास मदत होते. पण सब्जा बियांचे सेवन केल्यामुळे प्रत्येक व्यक्तीला फायदे होतीलच असे नाही. आरोग्यासंबंधित गंभीर समस्या आणि काही विशेष प्रकृती असलेल्या लोकांच्या आरोग्यासाठी सब्जा बियांचे सेवन करणे धोक्याचे ठरू शकते. याचे उलटे परिणाम शरीरावर होऊ शकतात. म्हणूनच आज आम्ही तुम्हाला कोणत्या व्यक्तींनी सब्जा बियांचे अजिबात सेवन करू नये? सब्जा खाण्याची योग्य पद्धत? याबद्दल जाणून घेऊया सविस्तर माहिती.


उन्हाळा ऋतूला सरुवात झाल्यानंतर अनेकांच्या शरीरात पित्त वाढते, छातीत जळजळ होणे किंवा आंबट ढेकर येणे इत्यादी पचनसंबंधित समस्या वाढू लागतात. पचनक्रिया बिघडल्यानंतर वारंवार उलट्या, मळमळ किंवा डोक दुखण्याची जास्त शक्यता असते. अशावेळी एक ग्लास पाण्यात अर्धा चमचा सब्जा बिया टाकून काहीवेळ भिजत ठेवा. त्यानंतर सब्जा बियांचे पाणी प्यावे. या बियांच्या सेवनामुळे पोटाच्या आतमध्ये संरक्षक कवच तयार होते, ज्यामुळे लिव्हरमधून अनावश्यक पित्त तयार होत नाही.

उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये शरीरात वाढलेली उष्णता कमी करण्यासाठी सब्जा बियांचे सेवन करावे. कोणत्याही फळांचा रस बनवल्यानंतर त्यात भिजवलेल्या सब्जा बिया मिक्स करून प्यायला जातात. यामुळे पोटात वाढलेली उष्णता कमी होऊन जळजळ थांबते. हातापायांची आग होणे, डोळे जळजळणे किंवा खूप घाम येणे इत्यादी सर्व समस्यांपासन आराम मिळवण्यासाठी सब्जा बियांचे सेवन करावे. या बिया शरीरात वाढलेली उष्णता शोषून घेतात.

लहान मुलांनी सब्जा बियांचे सेवन अजिबात करू नये. लहान मुलांना सब्जा बिया व्यवस्थित गिळता येत नाहीत, ज्यामुळे त्या घशात किंवा श्वसननलिकेत अडकण्याची भीती असते. त्यामुळे लहान मलांना सब्जा बिया खाण्यास देऊ नये. याशिवाय कमी रक्तदाबाचा त्रास असलेल्या व्यक्तींनी सब्जा बियांचे सेवन अजिबात करू नये. सब्जा बियांमध्ये असलेले जास्त फायबर लहान मुलांच्या पचनक्रियेवर परिणाम करते. वारंवार पोट फुगणे किंवा गॅस, आतड्यांचे आजार इत्यादी समस्यांनी त्रस्त असलेल्या लोकांनी सब्जा बियांचे सेवन करणे टाळावे.

# उन्हाळ्यात माठातले पाणी का प्यावे?

**उन्हाळ्याच्या** दिवसांत थंडगार पाणी पिण्याचा आनंदच काही वेगळा असतो. सर्वांनाच तहान खप लागते, घसा कोरडा उन्हाळ्यात पडतो अशावेळी थंड पाणी कधी पोटात जाते असे होते. माठात ठेवलेले पाणी थंड असते. याचे काही आरोग्यदायी फायदेसद्धा आहेत. पण फ्रिजमधले थंड पाणी पिण्याऐवजी तर तम्ही माठातले पाणी प्यायला सरूवात केली तर तमच्या तब्येतीच्या समस्या कमी होतील.



उन्हाळ्याच्या दिवसांत माठातले पाणी प्यायल्याने गॅस, अपचन यांसारख्या समस्या दर होतात. पोटाशी संबंधित समस्या असल्यास माठातले पाणी एक उत्तम पर्याय आहे.शरीरातील टॉक्सिन्सबाहेर काढण्यासाठी नियमित माठातले पाणी प्यावे. ज्यामळे त्वचा साफ आणि ग्लोइंग होण्यास मदत होते. हे एक नॅच्यरल डिटॉक्स वॉटरप्रमाणे काम करते.

फ्रिजचे पाणी खप थंड असल्यामळे घसा दुखण्याचाही धोका असतो तर काहीजणांना कफसद्धा होतो. तर माठातलं पाणी शरीरासाठी उत्तम मानले जाते. हे पाणी प्यायल्याने घश्याला कोणताही त्रास होत नाही आणि इम्यनिटीही वाढते.माठातले पाणी प्यायल्याने शरीर शद्ध होण्यास मदत होते. माठातले पाणी प्यायल्याने शरीरातील विषारी तत्व बाहेर निघन इम्यन सिस्टिम चांगली राहण्यास मदत होते.

माठ दर दिवसांनी व्यवस्थित आतन, बाहेरून, खालच्या बाजने वरच्या बाजने व्यवस्थित स्वच्छ करा. जास्त जने पाणी पिणे टाळा, माठात रोजच्या रोज ताजे पाणी भरत राहा. पाणी नेहमी झाकून ठेवा. माठाला असलेला पाण्याचा नळही स्वच्छ करा. माठामध्ये जास्त दिवस पाणी स्टोर करून ठेऊ नये. यामळे शरीरसंबंधित समस्या उद्भवण्याची शक्यता असते.

# कागल काँग्रेसतर्फे आम.पाटील यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

**से. कापशी,ता.१३(वार्ताहर)– कागल तालुका काँग्रेस पक्षाच्या वतीने तालुक्यातील विविध गावांमध्ये काँग्रेसचे विधान परिषदचे गटनेते, मा.गृहराज्यमंत्री कोल्हापूर जिल्हा, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष आमदार सतेज उर्फ बंटी पाटील यांचा ५४ वा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा करण्यात आला.**



आम.सतेज पाटील यांच्या वाढदिवसानिमीत्त सत्कार करताना अॅड.दयानंद नानासाहेब पाटील–नंद्याळकर यांच्यासह इतर काँग्रेस पदाधिकारी.

काँग्रेसचे तालुकाध्यक्ष अँड.दयानंद नानासाहेब पाटील–नंद्याळकर यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा किसान काँग्रेस अध्यक्ष सागर कोंडेकर, कागल शहर काँग्रेसचे नेते ईगल प्रभावळकर, महिला नेत्या सौ. दिपाली आवळे यांच्या सहकार्याने वाढदिवस संयोजन समिती मार्फत विविध कार्यक्रम आयोजित केले होते.विद्या मंदिर भडगांव, न्यु इग्लिश स्कूल भडगाव तसेच अंगणवाडी येथील मुलांना खाऊ वाटप करण्यात आला.यावेळी युवक काँग्रेस अध्यक्ष अमर चौगले, रणजित पांडुरंग खतकर, प्रकाश चौगले, उमेश सुतार, समाधान सुतार, रोहित चौगले, रोहन नारे, दिपक कुभांर, सौरभ सुतार उपस्थित होते.गोरंबे येथे तालुका किसान काँग्रेसचे अध्यक्ष रणजीत पाटील यांच्या नेतृत्वाखाली ग्राम काँग्रेस कमिटी, गोरंबे तसेच युवक कार्यकर्ते यांनी राबविलेल्या शालेय विद्यार्थ्यांना खाऊ व वह्या वाटप उपक्रम संपन्न केला.यावेळी स्वराज्य युवा फाउंडेशन किसन काँग्रेस उपाध्यक्ष संदिप चौगुले, अवधूत गायकवाड, शरद वास्कर शुभम गायकवाड, राघव आसबे उपस्थीत होते.

कागल येथे सौ.व श्री ईगल प्रभावळकर यांच्याकडून कागल मधील मतिमंद विद्यालयातील मुलांना भोजन देण्यात आले.तसेच कागल ग्रामीण रुग्णालय येथील रुग्णांना फळेवाटप करण्यात आले.नंद्याळ येथे तालुका पर्यावरण काँग्रेस अध्यक्ष राजेंद्र शिंदे, अजय कांबळे, शिवराज पाटील यांच्याकडून वृक्षारोपण, शालेय विद्यार्थी, ग्रंथालयास थोरांची चरित्र, पुस्तके, वृक्ष रोपे भेट देण्यात आली.

तालुका सरचिटणीस राहुल घराळ यांच्या नेतृत्वाखाली ग्राम काँग्रेस कमिटी, सिद्धनेर्लीमार्फत कुमार कन्या विद्या मंदिर विद्यार्थ्यांना खाऊ व वह्या वाटप करण्यात आल्या. यावेळी कृष्णात हजारे, स्वप्निल चव्हाण,विनायक घराळ, सुधीर घराळ, रावसाहेब घराळ,किरण पाटील, तानाजी निकम उपस्थित होते.कापशी येथे शहराध्यक्ष संतोष पाटील, तालुका सरचिटणीस सिद्धार्थ कांबळे यांचे कडून लहान मुलांची पळण्याची स्पर्धा आयोजित केली होती.

दरम्यान सायंकाळी कागल तालुक्यातील पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्यासह गणेश पाटील, बाबुराव पाटील , प्रा. सुरजकुमार सातवेकर प्रमोद वाडकर, प्राध्या.सौ ज्योती सातवेकर, कु.शानवी सातवेकर, अनिल संपकाळ, प्रकाश सावंत, प्रकाश पार्टे, प्रा.तुकाराम पाटील, प्रवीण माळी, विशाल तिरळे, तानाजी आडुरे,सचिन घाटगे ,राजेंद्र बागल यांनी आम. सतेज पाटील यांची बावडा निवासस्थानी भेट घेऊन वह्या, तैलचित्र देऊन अभिष्टचिंतन केले.

# भरदिवसा घरफोडी करणारे चोरटे जेरबंद

## लाखांचा मुद्देमाल जप्त : सीसीटीव्हीच्या आधारे एलसीबीची कारवाई

**कोल्हापूर ता.१३(प्रतिनिधी) पिंपळगाव (ता. भुदरगड) येथे भरदिवसा घरफोडी करून सोन्या–चांदीचे दागिने लंपास करणाऱ्या दोन सराईत चोरट्यांना स्थानिक गुन्हे शाखेच्या (एलसीबी) पथकाने अवघ्या काही तासांत अटक केली. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे संशयितांची अचूक ओळख पटवत पोलिसांनी सापळा रचून ही कारवाई केली.**

आरोपींकडून सोन्या–चांदीचे दागिने, रोख रक्कम आणि गुन्ह्यात वापरलेली दुचाकी असा एकूण १५ लाख १० हजार ६४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.अविनाश गंगाधर सुतार (वय २८, रा. कनाननगर, नागाळा पार्क, कोल्हापूर) आणि रजत रामचंद्र खिलारे (वय ३०, रा. कनाननगर, कोल्हापूर) अशी अटक केलेल्या संशयितांची नावे आहेत. सुतार याच्यावर घरफोडी व चोरीचे चार, तर खिलारे याच्यावर घरफोडीचे तीन गुन्हे विविध पोलीस ठाण्यांत दाखल असल्याची माहिती तपासात पुढे आली आहे. पिंपळगाव येथील महादेव शिवराम चव्हाण (वय ७०) यांच्या बंद घरावर चोरट्यांनी डोळा ठेवून १२ एप्रिल रोजी सकाळी ११ ते १२ या वेळेत घरफोडी केली होती. कोणाच्या लक्षात येऊ नये यासाठी घराची कौले काढून चोरट्यांनी आत प्रवेश केला. घरातील तिजोरी फोडून त्यांनी सोन्या–चांदीचे दागिने लंपास केले. या प्रकारामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. याप्रकरणी भुदरगड पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला.भरदिवसा झालेल्या या घरफोडीची दखल घेत पोलीस अधीक्षक योगेश कुमार गुप्ता यांनी तातडीने तपासाला गती देण्याचे आदेश दिले. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुशांत चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक सागर वाघ यांच्या पथकाने समांतर तपास सुरू केला. पथकाने घटनास्थळी जाऊन पाहणी केली तसेच परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले. या फुटेजमध्ये दोन संशयित युवक गावात फिरताना दिसून आले. त्यावरून त्यांच्या हालचालींचा मागोवा घेत तपास अधिक खोलवर नेण्यात आला.

तपासादरम्यान या संशयितांची ओळख पटविण्यात पोलिसांना यश आले. दोघेही कोल्हापुरातील कनानगर परिसरातील सराईत गुन्हेगार असल्याची माहिती समोर आली. त्यानंतर पोलिसांनी त्यांच्या हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवले. दरम्यान, चोरीतील दागिने विक्रीसाठी आरोपी सोमवारी सकाळी जयंती नाला परिसरात येणार असल्याची खात्रीशीर माहिती पोलिसांना मिळाली.या माहितीच्या आधारे पोलिसांनी जयंती नाला परिसरात सापळा रचला. संशयित तेथे येताच पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले.

# मोकाट बैलाच्या हल्ल्यात वृद्ध जखमी; रुग्णवाहिकेचेही नुकसान

**निपाणी,ता.१३(प्रतिनिधी)– शहरात मोकाट जनावरांचा उपद्रव मोठ्या प्रमाणात वाढला असून नागरीकांवर हल्ले होण्याचे प्रकार वाढतच चालले आहेत. मोकाट बैलाच्या हल्ल्यात वृद्ध गंभीर जखमी झाल्याची घटना जामदार प्लॉट निपाणी येथे रविवारी सायंकाळी घडली. तसेच दोन बैलांच्या झुंजीत रुग्णवाहिकेचे ६० ते ७० हजारांचे नुकसान झाले आहे.सुरेश विजापूरे असे जखमी वृद्धाचे नाव आहे.**

सदर वृद्ध वॉकिंग करण्यासाठी दररोज या परिसरात येतात.नेहमीप्रमाणे ते रविवारी सायंकाळी वॉकिंगला जात असताना मरगुबाई मंदिराजवळ बैलाने पाठीमागून त्यांच्यावर जोरदार हल्ला केला. या हल्ल्यात त्यांच्या तोंडाला गंभीर दुखापत झाली.सध्या त्यांच्यावर खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.तसेच रात्री ९.३० वाजण्याच्या सुमारास या भागातच दोन बैलांच्या झुंजीत राष्ट्रकर्म संघटनेच्या रुग्णवाहिकेचे जवळपास ६० ते ७० हजारांचे नुकसान झाले आहे.यापूर्वीही मोकाट जनावरांचे हल्ले नागरिकांवर झाले आहेत.यामध्ये काहीना जीव गमवावा लागला आहे.त्यामुळे पालिका प्रशासनाने तात्काळ लक्ष देऊन या मोकाट जनावरांचा बंदोबस्त करण्यात यावा अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

# बेडवरून पडल्याने महिलेचा मृत्यू

इचलकरंजी,ता.१३–

**इचलकरंजीतील मंगल नंदकिशोर मुसळे (वय ५३) या राहत्या घरी बेडवरून पडल्याने गंभीर जखमी झाल्या होत्या.**

गुरुवारी (दि. ९) पहाटे घडलेल्या या घटनेनंतर त्यांच्यावर उपचार सुरू होते. मात्र सोमवारी (दि. १३) दुपारी सीपीआर रुग्णालयात त्यांचा मृत्यू झाला. या घटनेची नोंद पोलीसांत झाली आहे.

*** कोल्हापूर ता.१३ (प्रतिनिधी)** हातकणंगले तालूक्यातील रेंदाळ येथे रविवारी (दि. १३) रात्री साडेनऊच्या सुमारास दुचाकी घसरल्याने मधुकर गोविंद पाटील (वय ६१) आणि गजानन बापू करवते (वय ६२, दोघे रा. रेंदाळ) जखमी झाले. प्राथमिक उपचारानंतर त्यांना पुढील उपचारासाठी सीपीआर रुग्णालयात हलविण्यात आले.

# राष्ट्रीय सेवा शिबिरातून नेतृत्वगुण,संघ भावना,आत्मविश्वास वाढीस मदत

## अण्णासाहेब जोल्ले : बोरगाव येथे एनएसएस शिबिराचे उद्घाटन

**बोरगाव,ता.१३ (वार्ताहर)– राष्ट्रीय सेवा योजना (एन.एस. एस.) शिबिरातून नेतृत्वगुण, संघ भावना, व आत्मविश्वास वाढीस मदत होते. ग्रामीण भागातील समस्या समजून घेऊन त्या सोडविण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रेरित करणे हा महत्त्वाचा उद्देश असून,शिबिरातून विद्यार्थ्यांच्यात सेवा मनोभाव वाढणार असल्याचे मत जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष अण्णासाहेब जोल्ले यांनी व्यक्त केले.**



बोरगाव येथेएनएसएस शिबिराचे उद्घाटन करताना जिल्हा बँकेचे अध्यक्ष अण्णासाहेब जोल्ले,आमदार शशिकला जोल्ले, शेजारी डॉ. श्रद्धानंद महास्वामीजी,नगरसेवक शरद जंगटे व अन्य.

बोरगाव येथे जोल्ले शिक्षण संस्थेच्या छत्रपती शिवाजी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय नांगनूर निपाणी व मौलाना अब्दुल कलाम आझाद बीएसडब्ल्यू एमएसडब्ल्यू महाविद्यालय नानदी यांच्या संयुक्त विद्यमानाने विशेष वार्षिक शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.५ दिवस चालणाऱ्या या शिबिराचे उद्घाटन डीडीसीसी बँकेचे अध्यक्ष अण्णासाहेब जोल्ले व आम. शशिकला जोल्ले यांच्या हस्ते करण्यात आले.त्याप्रसंगी ते बोलत होते.

सदलगा गीताश्रमाचे डॉ. श्रद्धानंद महास्वामीजी,अरण्य सिद्धेश्वर महाराज व शांतानंद प्रसाद महाराज यांचा सानिध्य लाभले.

कार्यक्रमास हाल शुगर संचालक नगरसेवक शरद जंगटे, जवाहरचे संचालक शितल अम्मान्नावर, अभियंता राज शेखर हिरेमठ, अजित तेरदाळे, बी.के. महाजन ,जितेंद्र पाटील, राजू भदरगडे, बंडू माळी, दऱ्याप्पा हवलदार, फिरोज अपराज, प्राचार्य आप्पासाहेब अक्कोळे, भरत जंगटे, संजू महाजन , भूपाल महाजन, शंकर गुरव, महावीर चोकावे, रावसाहेब चोकावे, बबन रेंदाळे, भरत पाटील, महादेव ऐदमाळे, यांच्यासह शिबिरार्थी शाळेचे पदाधिकारी भाजप कार्यकर्ते व शहरवासीय उपस्थित होते.

# शासकीय गोदाममधील हमालांचे काम आंदोलन

**सांगली, १३(प्रतिनिधी )– जिल्हाधिकारी सांगली यांच्या नियंत्रणा खालील जिल्ह्यातील ११ शासकीय अन्न धान्य गोदाम आणि २ उप गोदामात एकूण १४० हमाल काम करित आहेत, हे सर्वजण सांगली माथाडी मंडळाचे नोंदणीकृत हमाल असून, सांगली जिल्हा हमाल पंचायत चे सभासद आहेत.या हमालांना जानेवारी , फेब्रुवारी , मार्च २०२६ या तीन महिन्यांत केलेल्या कामाची मजुरी वेतन अद्याप मिळालेले नसल्याने १० एप्रिल पासून कामबंद आंदोलन सुरू केले असल्याची माहिती कामगार नेते विकास मगदुम यांनी दिली.**

जिल्ह्यातील जनतेला अन्नधान्य पुरवठा करण्याऱ्या यंत्रणे मधील महत्त्वाचा घटक असलेल्या हमालानाच गेल्या तीन महिन्यांपासून हमालांना मजुरी मिळाली नसल्याने हमाल व त्यांचे कुटुंबावर उपासमारीची वेळ आली आहे. माथाडी कायद्यातील तरतुदींनुसार दरमहा ५ तारखे पुर्वी मालकांनी हमालांची हमाली मजुरी माथाडी मंडळात जमा करणे बंधन कारक आहे. तरी गेल्या दोन वर्षांपासून हमालांना दरमहा मजुरी कधीच मिळत नाही. गेल्या तीन महिन्यांपासून पासुनची हमाली मजुरी मिळावी, तसेच गेल्या तीन वर्षातील तसेच २००८ ते २०१४ मधील महागाई निर्देशांक नुसार वाढलेल्या मजुरी दरवाढीतील फरकाची रक्कम मिळावी,२०२१–२०२२ मधील आत्मनिर्भर, एपीएल आणि आनंदाचा शिधा वाटप हमाली मजुरी मिळावी, पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी,या करिता जिल्ह्यातील सर्व शासकीय धान्य गोदाम मधील हमालांनी सांगली जिल्हा हमाल पंचायत चे नेतृत्वाखाली कामबंद आंदोलन सुरू केले असल्याची माहिती कामगार नेते विकास मगदुम यांनी दिली.

# शिराळा एमआयडीसी रस्त्यासाठी ७ कोटींचा निधी मंजूर – खा. माने

शिराळा,ता.१३ ( प्रतिनिधी)–

**शिराळा न्यायालयापासून ते एमआयडीसीमध्ये जाणारा मुख्य रस्ता व त्यावरील एका पुलाच्या कामासाठी विशेष रस्ता अनुदान योजनेतून नगरविकास खात्याकडून ७ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असल्याची माहिती खा. धैर्यशील माने यांनी दिली.**

यापूर्वी एमआयडीसी अंतर्गत रस्त्यांसाठी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून दिला होता. आता शिराळा न्यायालयपासून (मोरणा हॉस्पिटल) ते एमआयडीसीमध्ये जाणारा मुख्य रस्ता आणि त्यावरील पुलाच्या कामासाठी नगरविकास खात्याकडून ७ कोटी रुपये मंजूर झाले आहेत. शिराळा एमआयडीसीमध्ये अनेक प्रकल्प सुरू आहेत. इथल्या नागरिकांच्या मागणीनुसार सातत्याने पाठपुरावा करून या रस्त्याला निधी मिळवून घेतला आहे. शिराळा शहर ते एमआयडीसी या दोन्हींना जोडणारा प्रमुख रस्ता असल्याने वाहतुकीसाठी चालना मिळणार आहे. सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत इथून पुढील बाबींची तांत्रिक पूर्तता होऊन या रस्त्याचे काम लवकरच सुरू होणार आहे. या पुढील काळातही शिराळा तालुक्याला प्राधान्यक्रमाने वेगवेगळ्या पातळीवर निधी देण्यासाठी कटिबद्ध आहे. असे माने यांनी सांगितले.

# श्री गंगा ग्रामीण पत संस्थेला १ कोटी ७५ लाख निव्वळ नफा

**चंदूर, ता.१३ येथील श्री गंगा ग्रामीण बिगरशेती सहकारी पत संस्थेला चालू आर्थिक वर्ष सन २०२५–२०२६ ला १ कोटी ७५ लाख रुपयाचा निव्वळ नफा झाल्याची माहीती चेअरमन विजय मलकापूरे यानी दिली.**



सन २०२५–२६ या आर्थिक वर्षात संस्थेकडे ४८ कोटी ३४ लाख इतक्या ठेवी जमा असून सभासदांना ४३ कोटी २३ लाख इतके कर्ज वाटप केले आहे. तसेच चालु आर्थीक वर्षात एन.पी.ए प्रमाण ० % राखण्यास यशस्वी झाले आहे.

या वेळी व्हा चेअरमन बाबासाहेब कु. आंबी, इचलकरंजी शाखा चेअरमन संजय खोत व शाहूनगर शाखा चेअरमन दिलीप नि. पाटील तसेच सर्व संचालक बाळासाहेब म्हा. पाटील, अजय अ. मेंडगुदले, दादासो आ. परीट, लिंगाप्पा आ. पुजारी, विजय पोवार तसेच संचालिका सौ. विद्या प्र. पाटील व सौ. कविता पाटील, तज्ञ संचालक बळीराम आ. कदम, बाबासाहेब निकम, सल्लागार बसगोंडा पाटील, शकिल मैंदर्गी सेक्रेटरी महादेव मा. कुंभार.

संस्थेचे मार्गदर्शक दशरथ मलकापूरे यांचे मार्गदर्शन लाभले व यावेळी कर्मचारी व सभासद उपस्थित होते.

# ए.आय.-बायोमेकॅनिक्सचा योग्य समन्वय गरजेचा-डॉ.सुदीप काळे

## डी. वाय.पाटील कॉलेज मध्ये राष्ट्रीय परिषद संपन्न

**कोल्हापूर ता.१३(प्रतिनिधी)– फिजिओथेरपीस्ट हा आरोग्य सेवेतील अविभाज्य घटक बनला आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेचा (ए. आय.) वापर आरोग्य सेवेत वाढत असून फिजीथेरेपीमध्येही त्याचा वापर अपरिहार्य आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि बायोमेकॅनिक्स यांच्या एकत्रित वापर व समन्वय यामुळे आरोग्यसेवा अधिक प्रभावी, अचूक आणि रुग्णकेंद्रित होऊ शकेल असा विश्वास तेरणा कॉलेज ऑफ फिजीओथेरपी, नवी मुंबईचे विभाग प्रमुख डॉ. सुदीप काळे यांनी केले.**



डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ फिजिओथेरपी येथे आयोजित फिजिओसेतू २०२६ या राष्ट्रीय परिषदेत प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. डॉ. काले म्हणाले, फिजिओथेरपिस्ट आरोग्यसेवेमधील अविभाज्य घटक बनला आहे. समन्वयित आणि संघभावनेवर आधारित आरोग्यसेवा पद्धतीमुळे परस्पर सहकार्य वाढते, उपचार पद्धतींचे प्रमाणीकरण होते आणि रुग्णसेवा अधिक प्रभावी व गुणवत्तापूर्ण होते.प्राचार्य डॉ. अमृतकुंवर एस. रायजादे यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले.

कृष्णा कॉलेज ऑफ फिजिओथेरपीचे बाल फिजिओथेरपी प्रमुख डॉ. मंदार मालवाडे यांनी बालविकासातील संवेदन प्रक्रियेचे महत्त्व, मुलांमधील संवेदन समस्या हाताळण्याचे उपाय यावर तर के. एल. ई. इन्स्टीट्युट स्पोर्ट्स फिजिओथेरपीचे विभागप्रमुख डॉ. बसवराज मोतिमठ यांनी स्नायू व खेळाशी संबंधित दुखापतींवर टेपिंग तंत्र याबाबत मार्गदर्शन केले. डी वाय पाटील कॉलेज ऑफ फिजिओथेरपी पुण्याचे प्राचार्य डॉ. तुषार पालेकर, महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ फिजिओथेरपी, लातूरचे प्राचार्य डॉ. सुभाष खत्री, कृष्णा कॉलेज ऑफ फिजिओथेरपी कराडचे अधिष्ठाता डॉ. जी वर्धराजुलू, डॉ. अरुण माहिया, केएलई कॉलेज ऑफ फिजिओथेरपी हुबळीचे प्राचार्य डॉ. प्रशांत मुकन्नावार, सिम्बॉयसिस कॉलेज संचालक डॉक्टर अपूर्व शिंपी, भारती विद्यापीठ सांगलीच्या डॉ. स्नेहा कटके, डॉ. उमाजली दामके, डॉ. रिंकले मालानी, डॉ. नितेश बंसल, डॉ. संतोष मेतगुड, डॉ. प्रियांशू राठोड, डॉ. लोपादास, हिमानी त्यागी यांनीही या परिषदेत वेगळ्या विषयावर मार्गदर्शन केले

परिषदेत ५० हून अधिक संस्थांचे ७५० हून अधिक प्रतिनिधी उपस्थित होते. डॉ. संजय डी. पाटील, आमदार सतेज डी. पाटील, विश्वस्त ऋतुराज पाटील, पृथ्वीराज पाटील, तेजस पाटील, कुलगुरू डॉ. राकेशकुमार शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.

महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

ई–निविदा सूचना

अ. उ. दा. संवसु मंडल, कराड अंतर्गत **"Engaging Skilled/Semi Skilled/ Unskilled Manpower on Outsourcing Basis at EHV O&M Circle, Karad"** या कामाकरिता नामांकित कंत्राटदारांकडून ई–निविदा मागविणेत येत आहेत. निविदा **आर. एफ. एक्स. क्रमांक ७०००३९५८६.** नोंदणीकृत कंत्राटदार विहित नमुन्यातील कोरी निविदा प्रत **http://srmetender.mahatransco.in** या वेबसाईटवरून डाऊनलोड करून घेवू शकतील.

**(१) कोरी निविदा डाऊनलोड करणेची मुदत:** १४.०४.२०२६ ते २९.०४.२०२६ **(२) निविदा स्वीकारणेची अंतिम तारीख व वेळ:** २९.०४.२०२६ सकाळी १०.०० वाजेपर्यंत **(३) निविदा उघडणेची तारीख व वेळ:** २९.०४.२०२६ सकाळी १०.३० वाजता **टेक्निकल बीड** व २९.०४.२०२६ दुपारी १३.०० वाजता **कमर्शिअल बीड** (उपलब्धतेनुसार).

जादा माहितीसाठी **www.mahatransco.in** या वेबसाईटवर पहावे. कोणतेही कारण न दाखविता एखादी अथवा सर्व निविदा नाकारण्याचा हक्क खाली सही करणार यांनी राखून ठेवला आहे.

**अधीक्षक अभियंता,**
**अउदा संवसु मंडल, कराड**

# प्रवाशांना आरक्षण तिकीटासाठी

## कोल्हापूर, इचलकरंजीला मारावे लागतात हेलपाटे

**पेठ वडगाव,ता.१३ – येथील बसस्थानकात लांब पल्ल्याच्या गाड्यांसाठी आरक्षण तिकीट कक्ष सुरू करावा, अशी मागणी छावा युवा संघटनेने केली आहे. याबाबतचे निवेदन कोल्हापूर विभाग नियंत्रक अधिकारी,अभय ज्योती प्रकाशराव देशमुख यांना देण्यात आले.**

शहरात मोठी बाजारपेठ, नामवंत शाळा, महाविद्यालये, बँका, हॉस्पिटल असल्याने विद्यार्थी व प्रवाशांची मोठी वर्दळ असते. सध्या वडगावमधून पुणे, मुंबई, नाशिक, शिर्डी यांसारख्या प्रमुख मार्गांवर एसटी महामंडळाची बस सेवा चांगल्या प्रकारे सुरू आहे. मात्र या गाड्यांचे आगाऊ तिकीट आरक्षित करण्यासाठी इचलकरंजी किंवा कोल्हापूर बसस्थानकावर जावे लागते.

यामध्ये प्रवाशांचा वेळ आणि पैसा खर्च होऊन मोठी गैरसोय होत आहे. ही अडचण दूर करण्यासाठी बसस्थानकाच्या नवीन इमारतीमध्ये तात्काळ स्वतंत्र आरक्षण कक्ष सुरू करावा, अशी मागणी छावा युवा संघटनेचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष शिवश्री रामदास गांजवे यांनी केली आहे.

**इचलकरंजी महानगरपालिका, इचलकरंजी. जि. कोल्हापूर.**
**पशुशल्य चिकित्सक विभाग**
**ई–निविदा सुचना क्र. /२०२५–२०२६**

इचलकरंजी महानगरपालिका पशुशल्य चिकित्सा विभागाकडून इचलकरंजी हद्दीतील प्राणी क्लेष कायद्यातील नमूद तरतूदीप्रमाणे भटक्या कुत्र्यांचे निर्बीजीकरण करणेबाबत (संख्या ५०००) ई–निविदा मागविण्यात येत आहेत.

सदर ई–निविदा **http://mahatenders.gov.in** या संकेत स्थळावर दि. १४/०४/२०२६ सकाळी ११ वाजलेपासून दि.२९/०४/२०२६ रोजी दुपारी ११.०० वाजेपर्यंत पहावयास मिळेल. भरलेल्या निविदा सादर करणेची अंतीम तारीख दि.२९/०४/२०२६ दुपारी ३.०० वाजेपर्यंत राहील. प्राप्त निविदा दि.०४/०५/२०२६ रोजी दुपारी ४.०० वा. उघडणेत येतील. निविदासंबंधी सर्व अटी शर्ती / माहिती घनकचरा व्यवस्थापन विभागाकडे कार्यालयीन कामकाजाचे दिवशी व वेळेत म.न.पा. नोटीस फलकावर तसेच उपरोक्त संकेतस्थळावर पहावयास मिळतील.

**सही/–**
**उपायुक्त,**
इचलकरंजी, महानगरपालिका

**हातकणंगले नगरपंचायत, हातकणंगले**
ता.हातकणंगले जि.कोल्हापूर
**वार्षिक निविदा जाहीर सूचना क्र. ०१**
**सन २०२६-२०२७**

हातकणंगले नगरपंचायत ता. हातकणंगले जि. कोल्हापूर पाणी पुरवठा व आरोग्य विभागाकडील सन २०२६–२०२७ करिताची वार्षिक निविदा (०७) कामे मक्त्याने पूर्ण करून घेण्यासाठी नोंदणीकृत, अनुभवी व पात्र मक्तेदाराकडून वैध नोंदणी व परवाना प्रमाणपत्र, जी.एस.टी.प्रमाणपत्र, पॅन कार्ड, बयाना रक्कम पावती, परिशिष्ठ अ संविदेमध्ये पदाधिकाऱ्यांचा समावेश नसलेबाबतचे प्रमाणपत्र, अनुभव समर्थनार्थ कागदपत्रे, मक्तेदार EPF नोंदणी प्रमाणपत्र (जर १० पेक्षा कमी कर्मचारी असतील तर स्वयंघोषणापत्र) इ. आवश्यक कागदपत्रे व रु.५००/– स्टँप पेपरवर निविदेसोबत सादर केलेली कागदपत्रे योग्य व बरोबर असलेचे इकडील नमुन्यात स्वयंघोषणापत्र इ. कागदपत्रासह जाहीर निविदा मागविणेत येत आहे. सदर वार्षिक निविदा मधील कामे तसेच निविदा संबंधी सर्व अटी व शर्तीची सविस्तर माहिती कार्यालयीन वेळेत हातकणंगले नगरपंचायत कडील संबंधित विभागाकडे व नोटीस बोर्डावर दि. १४/०४/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजलेपासून ते दिनांक. २१/०४/२०२६ सायं ०४.०० वाजेपर्यंत उपलब्ध होईल व निविदा सादर करणेची अंतिम मुदत दिनांक. २१/०४/२०२६ सायं ०४.०० वाजेपर्यंत पाहता येतील व सादर ही करता येतील.

**स्वाक्षरी /–**
**(वि.वि.पाटील) मुख्याधिकारी**
**हातकणंगले नगरपंचायत**



## बुमराहच्या प्रभावहीन गोलंदाजीमुळे मुंबईची चिंता वाढली

**नवी दिल्ली,ता.१३–**

**भारताचा सर्वात धोकादायक वेगवान गोलंदाज, जसप्रीत बुमराहचा आयपीएलमध्ये पूर्वीसारखा प्रभावी दिसत नाही. वैभव सूर्यवंशीने बुमराहच्या गोलंदाजीवर दोन षटकार मारले असले तरी, इतर फलंदाजांनीही त्याच्याविरुद्ध मोठे फटके मारण्याचे कौशल्य विकसित केले आहे. यामुळेच बुमराह धावा देत आहे, पण विकेट्ससाठी तो आतुर झालेला दिसतो.**

मुंबई इंडियन्सच्या लसिथ मलिंगाने इंडियन प्रीमियर लीगवर वर्चस्व गाजवले होते, ज्यानंतर बुमराहनेही आपले नाव कमावले. पण आता फलंदाज इतके हुशार झाले आहेत की ते बुमराहविरुद्ध सहज खेळतात, धावा करतात आणि त्याला विकेट्स देत नाहीत. आरसीबीविरुद्ध विराट कोहली सुरुवातीला त्याच्याविरुद्ध सावधपणे खेळला, पण अखेरच्या षटकांमध्ये टिम डेव्हिडने त्याच्या षटकात एक चौकार आणि एक षटकार मारला. परिणामी, बुमराहने चार षटकांत ३५ धावा दिल्या आणि त्याला एकही विकेट मिळाली नाही. सलग पाच सामन्यांमध्ये बुमराहला एकही विकेट घेता आलेली नाही. या काळात त्याला पंजाब, दिल्ली, केकेआर, राजस्थान आणि आता आरसीबीच्या फलंदाजांविरुद्ध कठीण आव्हानांना सामोरे जावे लागले आहे.

## गुजरात व चेन्नईच्या सामन्यांची अदलाबदल

**मुंबई,ता.१३–**

**भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने आयपीएल २०२६ च्या वेळापत्रकात महत्त्वपूर्ण बदलांची घोषणा केली आहे. अहमदाबादमधील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमुळे गुजरात टायटन्स आणि चेन्नई सुपर किंग्ज यांच्यातील दोन सामन्यांच्या ठिकाणांची अदलाबदल करण्यात आली आहे.**

२६ एप्रिलचा सामना पूर्वी अहमदाबादमध्ये होणार होता, परंतु तो चेन्नईच्या एम.ए. चिदंबरम स्टेडियमवर खेळवला जाईल. तो दुपारी ३:३० वाजता सुरू होईल. तर चेन्नईत होणारा सामना आता अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर खेळवला जाईल. हा सामना संध्याकाळी ७:३० वाजता सुरू होईल.

२६ एप्रिलला अहमदाबादसह इतर भागांत महानगरपालिका निवडणुका होणार आहेत. सुरक्षेच्या कारणास्तव आणि मतदानाच्या दिवशी होणारी गर्दी लक्षात घेता बीसीसीआयने हा निर्णय घेतला आहे.

आयपीएल २०२६ चे २० सामने खेळले गेले आहेत. राजस्थान रॉयल्सने आतापर्यंत चार सामने खेळून ते सर्व जिंकले असून आठ गुण मिळवले आहेत. पंजाब किंग्ज चारपैकी तीन सामने जिंकून सात गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहे. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू चारपैकी तीन सामने जिंकून सहा गुणांसह तिसऱ्या स्थानावर आहे. दिल्ली कॅपिटल्स, गुजरात टायटन्स आणि लखनौ सुपर जायंट्स यांच्याकडे सध्या प्रत्येकी चार गुण आहेत. सनरायझर्स हैदराबाद, मुंबई इंडियन्स आणि चेन्नई सुपर किंग्ज यांनी चारपैकी प्रत्येकी फक्त एकच सामना जिंकला आहे. या तिन्ही संघांकडे प्रत्येकी दोन गुण आहेत. कोलकाता नाइट रायडर्स तळाशी असून, त्यांनी अद्याप एकही सामना जिंकलेला नाही.

# सिनरला माँटे कार्लो मास्टर्सचे विजेतेपद

**नवी दिल्ली, ता.१३ –**

**यानिक सिनरने कार्लोस अल्काराजचा सलग सेट्समध्ये पराभव करत, पहिल्यांदाच माँटे कार्लो मास्टर्सचे विजेतेपद पटकावत आपल्या स्पॅनिश प्रतिस्पर्ध्याकडून जागतिक क्रमवारीतले पहिले स्थान पुन्हा मिळवले.**

सिनरने अल्काराजचा ७-६५, ६-३ अशा फरकाने पराभव केला. गेल्या महिन्यात इंडियन वेल्स आणि मियामी येथील विजयांसह सनशाइन डबल पूर्ण केल्यानंतर, या वर्षातील हे त्याचे तिसरे १००० विजेतेपद ठरले.

२४ वर्षीय सिनर हा नोव्हाक जोकोविच आणि राफेल नदाल यांच्या पंक्तीत जाऊन बसला आहे. सलग चार १००० विजेतेपदे जिंकणारा तो केवळ तिसरा टेनिसपटू ठरला आहे. गेल्या हंगामाच्या अखेरीस त्याने पॅरिसमध्येही विजेतेपद मिळवले होते.

सिनर आणि अल्काराज यांच्यातील हा पहिलाच सामना होता. त्याने आपले सलग १७ सामने जिंकले आहेत. २०१५ मध्ये जोकोविचने केलेल्या कामगिरीनंतर, एकाच हंगामातील पहिले तीन १००० विजेतेपद जिंकणारा तो पहिलाच पुरुष टेनिसपटू ठरला आहे.अल्काराजने मातीच्या कोर्टवरआपले सलग १७ सामने जिंकले होते.वादळी वाऱ्यात सिनरने मारलेला फोरहँड शॉट कोर्टच्या बाहेर गेल्याने त्याने २-० अशी आघाडी घेतली, पण पुढच्याच गेममध्ये हळूहळू लय सापडल्याने त्या इटालियन टेनिसपटूने सर्व्हिस ब्रेक केली.

पाचव्या गेममध्ये त्या स्पॅनिश टेनिसपटूने एक ब्रेक पॉइंट आणि ४-४ अशा बरोबरीच्या स्थितीत आणखी तीन ब्रेक पॉइंट वाचवले, पण टाय-ब्रेकमध्ये सिनरच्या अधिक सातत्यपूर्ण खेळाचा फायदा झाला, जो त्याने सेट पॉइंटवर अल्काराजने डबल फॉल्ट केल्यावर जिंकला. दुसऱ्या सेटच्या सुरुवातीला अल्कारजने एक सनसनाटी रॅली जिंकून सिनरची सर्व्हिस ब्रेक केली, पण दुसऱ्या मानांकित टेनिसपटूने आपल्या प्रतिस्पर्ध्यावर दबाव कायम ठेवला आणि ३-१ ने पिछाडीवर असताना पुनरागमन करत शेवटचे पाच गेम जिंकून आपल्या कारकिर्दीतील सर्वात मोठे माँटे कार्लो विजेतेपद पटकावले.



''आम्ही इथे शक्य तितके जास्त सामने खेळण्याच्या उद्देशाने आलो होतो, जेणेकरून पुढे येणाऱ्या इतर मोठ्या स्पर्धांपूर्वी आम्हाला खेळाबाबत योग्य प्रतिक्रिया मिळेल. आजचा सामना आमच्या दोघांच्याही अत्यंत उच्च दर्जाच्या खेळाचे प्रदर्शन करणारा ठरला,'' असे सिनर म्हणाला. ''आज थोडे वारे वाहत होते, हवा थोडी थंड होती. या स्पर्धेच्या नेहमीच्या वातावरणापेक्षा आजची परिस्थिती थोडी वेगळी होती. सामन्याचा निकाल अप्रतिम लागला आहे. पुन्हा एकदा जागतिक क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर पोहोचणे माझ्यासाठी खूप मोलाचे आहे... या विशिष्ट प्रकारच्या कोर्टवर एखादे मोठे विजेतेपद जिंकल्याचा मला खूप आनंद आहे; यापूर्वी मी असे कधीच केले नव्हते आणि त्यामुळेच हे विजेतेपद माझ्यासाठी खूप महत्त्वाचे ठरते.''

## खंडोबाला नमवून दिलबहार अंतिम फेरीत

**कोल्हापूर ता. १३(प्रतिनिधी)–**

**पूर्वार्धात फेबिन गिब्सने नोंदवलेल्या एकमेव गोलच्या जोरावर दिलबहार तालीम मंडळने खंडोबा तालीम मंडळला नमवून अंतिम फेरीत प्रवेश केला. लॅमखोलेन दौंगेल सामनावीर ठरला. या पराभवामुळे गतसालातील उपविजेत्या खंडोबाचे यंदाच्या स्पर्धेतील आव्हान संपुष्टात आले. मंगळवारी सामन्याला सुट्टी आहे. बुधवारी १५ रोजी दुपारी चार वाजता वेताळमाळ तालीम मंडळ आणि दिलबहार तालीम मंडळ यांच्यात विजेतेपदासाठी लढत होईल.**

छत्रपती शाहू स्टेडियमवर सोमवारी उपांत्य फेरीतील दुसरा सामना दिलबहार आणि खंडोबा संघादरम्यान झाला.

१२व्या मिनिटाला फेबिन गिब्सने डी बाहेरून मारलेल्या फटक्यावर चेंडू थेट गोलजाळ्यात शिरला अन् दिलबहारने १-० गोलची आघाडी घेतली.दिलबहारकडून गोलची आघाडी वाढवण्यासाठी खोलवर चढाया झाल्या.

उत्तरार्धात गोलची परतफेड करून सामना बरोबरीत आणण्यासाठी खंडोबाच्या खेळाडूंनी वेगवान खेळ केला. त्यांनी गोलक्षेत्रात चढाया केल्या पण मोक्याच्या क्षणी दिशाहीन फटाक्यांमुळे गोल करण्यात अपयश आले. अनेकदा सोप्या संधी मिळूनही त्याचे गोलमध्ये रुपांतर करता आले नाही. दुसऱ्या बाजूला पूर्वार्धातच मिळालेली १-० गोलची आघाडी टिकवण्यासाठी दिलबहारने बचात्वामक धोरण अवलंबले. दरम्यान, दिलबहारच्या गंधर्व घाटगे याला नियमबाह्य खेळाबद्दल दोनवेळा येलो कार्ड झाल्याने मुख्यपंच निरंजन कामते यांनी घाटगेला रेडकार्ड दाखवून मैदानाबाहेर घालविले. अखेर पूर्वार्धात १२व्या मिनिटाला मिळालेली १-० गोलची आघाडी अखेरपर्यंत कायम राखत दिलबहारने सामना जिंकून अंतिम फेरी गाठली.



## मुंबईसमोर मोठे संकट; रोहित शर्मा पंजाब विरुध्द खेळण्याबाबत साशंकता

**मुंबई,ता.१३–**

**आयपीएलमध्ये सलग पराभवांचा सामना करणाऱ्या मुंबई इंडियन्ससमोर आणखी एक मोठे संकट उभे ठाकले आहे. संघाचा अनुभवी फलंदाज रोहित शर्माला हॅमस्ट्रिंगची दुखापत झाली असून, १६ एप्रिल रोजी वानखेडे स्टेडियमवर पंजाब किंग्जविरुध्द होणाऱ्या सामन्यात त्याच्या खेळण्याबाबत साशंकता निर्माण झाली आहे.**

रविवारी वानखेडे स्टेडियमवर रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूविरुद्ध खेळल्या गेलेल्या सामन्यात फलंदाजी दरम्यान रोहितला दुखापत झाली. डावातील सहावे षटक सुरू असताना रोहितल त्रास जाणवू लागल्याने फिजिओची मदत घेतली. फिजिओशी प्रदीर्घ चर्चा केल्यानंतर त्याने खेळ सुरू ठेवण्याचा प्रयत्न केला, मात्र रासीख सलामचा एक चेंडू खेळल्यानंतर त्याला अधिक वेदना होऊ लागल्या. अखेर १३ चेंडूंत १९ धावांवर असताना रोहितने रिटायर्ड हर्ट होऊन मैदान सोडण्याचा निर्णय घेतला. तो पुन्हा फलंदाजीसाठी मैदानात उतरू शकला नाही.या सामन्यात मुंबईला १८ धावांनी पराभव स्वीकारावा लागला.

वृत्तानुसार, रोहित शर्माच्या दुखापतीचे गांभीर्य तपासण्यासाठी त्याच्या विविध वैद्यकीय चाचण्या (स्कॅन्स) केल्या जाणार आहेत. या चाचण्यांच्या अहवालानंतरच तो पंजाबविरुद्धच्या सामन्यात उपलब्ध असेल की नाही, याचा अंतिम निर्णय घेतला जाईल. अद्याप मुंबई इंडियन्सच्या व्यवस्थापनाकडून त्याच्या दुखापतीबाबत अधिकृत प्रसिद्धीपत्रक जारी करण्यात आलेले नाही. शेर्फेन रदरफोर्डने सांगितले की, त्याला हॅमस्ट्रिंगचा त्रास असावा असे वाटते, परंतु मी डगआउटमध्ये असल्याने मला त्याबाबत अधिकृत किंवा सविस्तर माहिती नाही.

यंदाच्या हंगामात रोहित शर्मा चांगल्या लयीत असल्याचे पाहायला मिळाले आहे. त्याने कोलकाता नाईट रायडर्सविरुद्ध ७८ धावांची धडाकेबाज खेळी करत २२१ धावांचे लक्ष्य गाठण्यात मोलाची भूमिका बजावली होती. आतापर्यंत खेळलेल्या चार सामन्यांत त्याने १३७ धावा केल्या आहेत. एकीकडे रोहितची वैयक्तिक कामगिरी समाधानकारक असली, तरी मुंबई इंडियन्ससाठी हा हंगाम खडतर ठरत आहे. चार सामन्यांपैकी केवळ एक सामना जिंकलेला मुंबईचा संघ गुणतालिकेत आठव्या स्थानावर फेकला गेला आहे. मुंबईचा पुढील प्रतिस्पर्धी असलेला पंजाब किंग्सचा संघ सात गुणांसह गुणतालिकेत दुसऱ्या स्थानावर असून सध्या जबरदस्त फॉर्ममध्ये आहे. अशा स्थितीत रोहित शर्मासारखा अनुभवी खेळाडू संघात नसल्यास, मुंबई इंडियन्ससाठी पुनरागमन करणे मोठे आव्हान ठरेल. आता सर्वांचे लक्ष रोहितच्या मेडिकल रिपोर्टकडे लागले आहे.



# स्वामी परिवार केवळ एक कुटुंब नसून,तो संस्कारांचा वटवृक्ष

### शिवाचार्य महाराजांचे उद्‌गार

**इचलकरंजी,ता.१३–**

**जवाहर को-ऑप. क्रेडीट सोसायटीचे चेअरमन व ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते शंकरराव शिवराम स्वामी यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेला अमृतमहोत्सवी सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात झाला.**

गुरुवर्य ज्ञानभास्कर सद्‌गुरू श्री.ष.ब्र. १०८ महादेव शिवाचार्य महाराज, वाई (ब्राह्मणशाही श्रीक्षेत्र, ता.वाई, जि. सातारा) यांच्या हस्ते या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.

यावेळी शिवाचार्य महाराज म्हणाले, स्वामी परिवार केवळ एक कुटुंब नसून, तो संस्कारांचा वटवृक्ष आहे. या वटवृक्षाच्या सावलीत समाजकल्याणाची अनेक बीजे रुजली आहेत. आजच्या काळात नात्यांमध्ये दुरावा आणि स्वार्थ वाढत असताना, स्वामी परिवाराने जपलेला एकोप्याचा वारसा समाजासाठी दीपस्तंभ ठरतो. अमृतमहोत्सव हा केवळ ७५ व्या वयाचा टप्पा नसून, तो आयुष्यभराच्या सत्कर्मांचा आणि लोकहिताच्या सेवाभावाचा सुवर्णक्षण आहे.

यानंतर गुरुवर्यांनी आपल्या आशिर्वचनातून अत्यंत भावपूर्ण शब्दांत मार्गदर्शन केले. शंकरराव स्वामी यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि अखंड समाजसेवेची शक्ती लाभो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना. त्यांच्या कार्यातून समाजात सद्‌भावना, एकोपा आणि सेवा वृत्ती अधिक वृद्धिंगत होवो. स्वामी परिवाराने जपलेली परंपरा ही केवळ कुटुंबापुरती मर्यादित न राहता, समाजकल्याणाची प्रेरणा देणारी ठरो. प्रत्येक घरात प्रेम, विश्वास आणि परस्पर सहकार्य वाढावे, हीच खरी अमृतमहोत्सवाची फलश्रुती आहे,असे आशिर्वचन त्यांनी दिले. त्यांच्या या शब्दांनी संपूर्ण सभागृहात एक आध्यात्मिक आणि प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले.

माजी नगराध्यक्षा अ‍ॅड. सौ. अलका स्वामी यांनी, मनोगतात शंकरराव स्वामी हे समाजासाठी कार्य करणारे खरे नेतृत्व आहे. कुटुंब कल्याणाबरोबरच समाजकल्याणाचा ध्यास घेऊन कार्य केले ते समाजासाठी प्रेरणादायी ठरेल.

महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महासंघाचे अध्यक्ष अशोकराव स्वामी यांनी आपल्या भावनिक मनोगतात आठवणींना उजाळा दिला. स्व. मल्लया स्वामी (दादा ) यांच्यासोबत घालवलेले क्षण, त्यांचे मार्गदर्शन आणि संस्कार आज पुन्हा नव्याने अनुभवत असल्यासारखे वाटते, असे त्यांनी सांगितले.

ते पुढे म्हणाले, शंकरराव स्वामी यांच्यासोबतचा प्रवास हा केवळ कुटुंबीय नव्हे, तर सामाजिक दृष्टिकोनातूनही अत्यंत महत्त्वाचा आहे.त्यांनी नेहमीच एकोप्याला, परंपरेला आणि समाजसेवेला प्राधान्य दिले.

या प्रसंगी शंकरराव स्वामी यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास जहांगीर पटेकरी, नगरसेवक सुनील पवार, वसंतराव मुळीक यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, स्वामी कुटुंबीय, मित्रपरिवार व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### अमृतमहोत्सवी सोहळ्यात शंकरराव स्वामी यांच्या कार्याचा गौरव



**शंकरराव स्वामी यांच्या अमृत महोत्सवी सोहळ्यात सत्कार करतान ज्ञान भास्कर सद्‌गुरू महादेव शिवाचार्य महाराज, सोबत माजी नगराध्यक्षा अ‍ॅड . अलका स्वामी, वस्त्रोद्योग महासंघाचे अध्यक्ष अशोकराव स्वामी, जहांगीर पटेकरी, सुनील पवार, वसंतराव मुळीक व स्वामी कुटुंबीय.**

# प्रा. संजय मंडलिक यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव

### विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती

**मुरगूड ता.१३ (प्रतिनिधी)–**

**शुभेच्छांच्या वर्षावात माजी खासदार प्रा.संजय मंडलिक यांचा वाढदिवस उत्साहात साजरा झाला. दिवसभर मंडलिक यांच्या निवासस्थानी शुभेच्छा देण्यासाठी जिल्ह्यातील हजारो कार्यकर्त्यांनी उपस्थिती लावली. विविध क्षेत्रातील मान्यवरांनी मंडलिक यांचे अभिष्टचिंतन केले. तर अनेक मान्यवरांनी दूरध्वनीद्वारे प्रा. मंडलिक यांना शुभेच्छा दिल्या.**

कोल्हापूर येथील लोकनेता या त्यांच्या निवासस्थानी मोठ्या संख्येने या विविध क्षेत्रातील मान्यवरांनी प्रत्यक्ष भेटून शुभेच्छा देऊन अभिष्टचिंतन केले. तसेच अनेक मान्यवरांनी दुरध्वनीद्वारे शुभेच्छा देवून अभिष्टचिंतन केले. यामध्ये लोकसभा सभापती ओम बिर्ला, खा. धैर्यशिल माने, माजी खा.निवेदीता माने, आ. राजेश क्षीरसागर, चंद्रदिप नरके, राजेंद्र पाटील-यड्रावकर, अशोकराव माने, माजी आ. राजेश पाटील, माजी आ. राजश्री जाधव, राजूबाबा आवळे, समरजितसिंह घाटगे, सत्यजित कदम, नाथाजी पाटील, अखिलेशराज घाटगे, वैभव नायकवडी, अर्जून आबिटकर, शारंगधर देशमुख, ऋतुराज क्षीरसागर, कोल्हापूर महानगरपालिकेचे शिवसेना पक्षाचे सर्व नगरसेवक तसेच व्ही. बी. पाटील, मुरलीधर जाधव, शेतकरी संघाचे चेअरमन बाबासाहेब शिंदे,शिक्षक नेते दादा लाड, बाबासो हिंदूराव पाटील, भूषण पाटील, मधूकर जांभळे, सदासाखरचे व्हा. चेअरमन आनंदराव फराकटे व सर्व संचालक मंडळ, सुनिल मोदी, संजय पवार, भैया माने, विजय बलुगडे, बाबासाहेब पाटील-आसुर्लेकर, पनोरीकर सरकार, रघुनाथ पाटील, दत्तात्रय उगले, सोनाळी, निलेश पाटील, बाबा पार्टे, महेश चौगले, मदन भंडारी, बाबा नांदेकर, आसिफ फरास,अतुल जोशी, प्रताप कोंडेकर, निलेश देसाई, मुरगूडच्या उपनगराध्या रेखाताई मागंले व सर्व नगरसेवक, निवृत्त डीवायएसपीसतिश माने,जीवन साळोखे, धनाजी कलिकते, रविंद्र साळुंखे, रवि सावडकर, आणूर, दलित मित्र एस. आर. बाईत(सुरुपली), दयानंद पाटील (निढोरी), शितल फराकटे, वर्षा पाटील म्हाकवेकर आदिनी शुभेच्छा दिल्या.दरम्यान, मुरगूड ग्रामीण रुग्णालयातील रुग्णांना फळे वाटप व बालवाडीतील मुलांना खाऊ वाटप अशा विविध उपक्रमांनी मंडलिक यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला.यावेळी मुरगूड ग्रामीण रुग्णालयाचे सर्व आरोग्य सेवक, सेविका हजर होते.



**वाढदिवसानिमित माजी खासदार प्रा.संजय मंडलिक यांचे अभिष्टचिंतन करताना विविध क्षेत्रातील मान्यवर.**

# स्व. विक्रमसिंह घाटगे यांना शाहू कारखाना कार्यस्थळी अभिवादन

**कागल,ता.१३ (प्रतिनिधी)–**

**शाहू साखर कारखान्याचे संस्थापक, सहकार क्षेत्रातील जाणते नेतृत्व आणि सहकार महर्षी स्व.विक्रमसिंह घाटगे यांच्या अकराव्या स्मृतीदिनानिमित्त कागल येथील श्री छत्रपती शाहू साखर कारखाना कार्यस्थळी त्यांना अभिवादन करण्यात आले.**

कारखान्याच्या प्रधान कार्यालयाच्या प्रांगणातील स्व. राजे विक्रमसिंह घाटगे यांच्या पुतळ्याचे पूजन शाहू उद्योग समूहाचे अध्यक्ष समरजितसिंह घाटगे यांच्या हस्ते झाले. यावेळी राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या पुतळ्यास तसेच कागल संस्थानाचे भूतपूर्व अधिपती श्रीमंत जयसिंगराव घाटगे यांच्या प्रतिमेसही पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.दरम्यान, कसबा बावडा कागलवाडी येथील स्व.घाटगे यांच्या समाधीस्थळी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

याप्रसंगी राजे विक्रमसिंह घाटगे को-ऑप बँकेच्या अध्यक्षा नवोदितादेवी घाटगे, कारखान्याचे उपाध्यक्ष अमरसिंह घोरपडे, ज्येष्ठ संचालक वीरकुमार पाटील, संचालिका रेखाताई पाटील, सुजाता तोरस्कर, कार्यकारी संचालक जितेंद्र चव्हाण तसेच शाहू समूहातील विविध संस्थांचे पदाधिकारी व सभासद, शेतकरी उपस्थित होते.

### अभिवादनसाठी दिवसभर रीघ

स्मृतीदिनानिमित्त दिवसभर राजकीय, सामाजिक, कला, क्रीडा, कृषी व सहकार क्षेत्रातील मान्यवरांसह सभासद शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून स्व.विक्रमसिंह घाटगे यांच्या पुतळ्यास अभिवादन केले. परिसरात आदर, कृतज्ञता आणि स्मरणभावनेचे वातावरण निर्माण झाले होते.यामध्ये जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा शिल्पा खोत, पंचायत समितीच्या सभापती सुवर्णा पाटील, जि. प. सदस्या शिवानी भोसले,जिल्हा बँकेचे संचालक प्रताप उर्फ भैया माने, बाजार समितीचे माजी सभापती कृष्णात पाटील,कागलचे उपनगराध्यक्ष जयवंत रावण यांच्यासह नगरसेवक भगवानराव काटे यांच्यासह मान्यवरांचा समावेश होता.



**श्री.छत्रपती शाहू सहकारी साखर कारखान्यावर स्व. विक्रमसिंह घाटगे यांच्या स्मृतीदिनानिमित्त अभिवादनवेळी समरजितसिंह घाटगे,नवोदितादेवी घाटगे, अमरसिंह घोरपडे,वीरकुमार पाटील, रेखाताई पाटील, सुजाता तोरस्कर,कार्यकारी संचालक जितेंद्र चव्हाण तसेच इतर.**